अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

आजचा सामना




दिल्ली कॅपिटल्स् वि.लखनौ सुपरजाएंट्स्

वेळ : ७.३० वा. स्थळ : अहमदाबाद

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. १४ मे २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २२४ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

# सोलापूर जेल ओव्हरपॅक! मिशन 'कोंबाकोंबी'



✔ सुराज्य/धनंजय मोरे

**सोलापूर जिल्हा कारागृहामधील गर्दीचे चित्र भयावह आहे. इथली जेल अक्षरश: 'ओव्हरपॅक' झाली आहे. कारागृहाची क्षमता १४१ कैद्यांची असताना अत्यंत दाटीवाटीत सध्या स्थितीत तब्बल ३८२ कैद्यांचा रहिवास येथे आहे. क्षमतेपेक्षा तिप्पट कैदी आत आहेत. दररोज येथे कैद्यांचे 'इनकमिंग' सुरुच आहे. कैद्यांची क्षमता आणि प्रत्यक्ष असणाऱ्या कैद्यांची संख्या हे प्रमाण पाहता कारागृहात मिशन 'कोंबाकोंबी' अशीच खरीखुरी परिस्थिती आहे.**




सोलापूर जिल्हा कारागृहात जास्तीत जास्त कच्चे कैदी असतात. यामध्ये खून,खुनीहल्ला, बलात्कार व इतर गुन्ह्यातील न्यायालयीन कोठडी मिळालेल्या कैद्यांची संख्या अधिक आहे. या कैद्यांच्या संख्येत वरचेवर वाढच होत आहे. कारागृहात कैद्यांची संख्या पुरूष कैद्यांची क्षमता १२७ अशी आहे. तर महिला कैद्यांची संख्या १४ आहे. अशी एकूण १४१ कैद्यांची क्षमता जिल्हा कारागृहात आहे.

कैद्यांच्या दाटीवाटीमुळे जिल्हा कारागृह प्रशासनही चिंतेत आहे. मात्र जिल्हा कारागृहात कच्चे कैदी असल्यामुळे या कैद्यांची न्यायालयीन प्रक्रिया विलंबाने सुरु असल्याने कारागृह प्रशासनाला कोणताही निर्णय घेता येत नसल्याचा बोलबाला आहे. ज्या कैद्यांना सक्तमजुरीची शिक्षा होते. अशा शिक्षा झालेल्या कैद्यांना मध्यवर्ती कारागृहात पाठविले जाते. पुणे, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, ठाणे अशा ठिकाणी मध्यवर्ती कारागृहे आहेत. शिक्षा लागलेल्या कैद्यांना मध्यवर्ती कारागृहात लोहारकाम, सुतारकाम, टेलरकाम, मोचीकाम अशा वेगवेगळ्या प्रकारची कामे असतात. ज्या कैद्यांकडे जी कला आहे. त्या कलेचे काम त्या कैद्याला दिले जाते. त्या कामाची त्या कैद्याला शासनाकडून मोबदला दिला जातो. पुणे येथील येरवडा कारागृहात विविध प्रकारे कैद्यांना कामे दिली जातात.

जिल्हा कारागृहात कच्चे कैदी असल्यामुळे अशा कैद्यांना वेगवेगळ्या प्रकारची कामे मिळत नाहीत. जिल्हा कारागृहातील किचनमध्ये काम करण्यासाठी कैद्यांचा उपयोग करून घेतला जातो. ज्या कैद्यांना किचनमधील काम जमते, अशा कैद्यांना किचनमध्ये काम करण्यास दिले जाते. किचनमध्ये काम करणाऱ्या कैद्यांकडून सर्व कैद्यांच्या स्वयंपाकाची कामे करून घेतली जातात. किचनमध्ये काम करणाऱ्या कच्च्या कैद्यांना सुद्धा शासनाकडून मानधनाच्या स्वरुपात मोबदला दिला जातो. सध्या जिल्हा कारागृहात असे १० ते १२ कैदी आहेत.

या कामांवर इतर पोलिस कर्मचारी नेमण्यात आहे आहेत. ही कामे जिल्हा कारागृह अधीक्षक हरिभाऊ मिंड यांच्या मार्गदर्शनाखाली होतात. सध्याच्या कारागृहात, कारागृह अधीक्षक हरिभाऊ मिंड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रदीप बाबर व इतर अधिकारी कारागृहाची एकूणच जबाबदारी पार पाडत आहेत.

## क्षमतेपेक्षा तिप्पट आत! दररोज वाढताहेत कैदी!

" जिल्हा कारागृहात सध्या ३५६ पुरूष आणि २६ महिला कैदी यांचा समावेश असलेल्या सध्याच्या जुन्या कारागृहाला येत्या ऑक्टोबरमध्ये नवीन पॅरलल कारागृहाची जोड मिळेल. नव्या कारागृहामुळे इथल्या सध्याच्या कारागृहावरचा ताण कमी होणार आहे. नवीन कारागृहात ४ बॅरेक असून यात २४० कैदी बसू शकतील एवढी क्षमता आहे. सध्या क्षमतेपेक्षा तिप्पट कैदी असले तरी सर्वांना योग्य त्या सुविधा पुरविल्या जात आहेत. गर्दीमुळं त्यांच्या आरोग्यावर परिणाम होणार नाही, याची दक्षता घेतली जात आहे.

**- हरिभाऊ मिंड, अधीक्षक, जिल्हा कारागृह, सोलापूर**

### नवीन कारागृह फक्त पुरुष कैद्यांसाठीच

नवीन कारागृहाच्या इमारतीचं काम सुरु आह. या कारागृहात चार बॅरेकची सोय असून या बॅरेक मध्ये २४० कैदी बसू शकतात. त्यामुळे सध्याच्या जिल्हा कारागृहातील कैद्यांचा लोड कमी होवू शकतो. नवीन कारागृहातील ४ बॅरेक हे फक्त पुरुष कैद्यांसाठीच आहेत.

- **कारागृहात ४० शौचालये :** जिल्हा कारागृहात कैद्यांसाठी प्रत्येक बॅरेकमध्ये तीन ते पाच शौचालये आहेत. जवळपास १५ शौचालये आहेत. तर कॉमन शौचालयाची संख्या २५ आहे. महिला कैद्यांसाठी सात स्वतंत्र शौचालये आहेत. महिला कैद्यांची संख्या तुलने कमी आहे. कारागृहात एकूध ४० शौचालये
- **पाणीपुरवठ्यावर विशेष लक्ष :** जिल्हा कारागृहाला सध्या महानगरपालिकेकडून पाणीपुरवठा होतो. सध्या कारागृहात कैद्यांची तिप्पट संख्या पाहता जिल्हा कारागृह प्रशासनाने पुन्हा दोन बोअर मारून घेतल्या आहेत. त्यामुळे महानगरपालिकेचे पाणी नाही आले तर कैद्यांसाठी दोन बोअरद्वारे पाणीपुरवठा केला जातो. सध्या जिल्हा कारागृह प्रशासन कैद्यांना पाणी कमी पडू नये यासाठी प्रयत्नशील आहे.
- **उपाययोजन आवश्यक :** जिल्हा कारागृहात झालेली कैद्यांची गर्दी प्रत्येकाच्या आरोग्यावर परिणाम करणारीच आहे. एखाद्या कैद्यास संसर्गजन्य आजाराची लागण झाल्यास तो आजार इतरांनाही होवू शकतो. या बाबत कारागृह प्रशासनाने उपाययोजना करणे गरजेचे आहे. आजारी कैद्यांना शासकीय रूग्णालयात उपचारासाठी नेले जाते.
- **नवीन कारागृह ऑक्टोबर पर्यंत सुरू होणार :** जिल्हा कारागृह प्रशासनाने गेल्या अनेक वर्षापासून नवीन कारागृहासाठी शासनाकडे पाठपुरावा केला. नवीन कारागृहाचे बांधकाम पूर्ण झाले असून सध्या ड्रेनेज पाइप लाइनचे काम सुरू आहे. बाथरुमची सुध्दा काम सुरू आहेत. नवीन कारागृहाचे काम येत्या आक्टोबरपर्यंत पूर्ण होईल, असे अपेक्षित आहे.

# मुंबईत धुळीच्या वादळाचे तांडव!

**सर्वत्र हाहाकार घाटकोपरमध्ये लोखंडी होर्डिंग कोसळून आठ ठार, ५९ जण जखमी**



✔ मुंबई/वृत्तसंस्था

अवकाळी पावसाने वैशाख वणव्याचा तोरा उतरलेला असतानाच याच अवकाळी पावसाने सोमवारी मुंबईसह राज्याच्या अनेक जिल्ह्यांमध्ये धुमाकूळ घातला. अक्षरशः तांडव सुरू होते. मुंबई आणि ठाण्याला गारांच्या पावसाने झोडपून काढले. पाऊस येण्याअगोदर मुंबई आणि ठाण्यात धुळीचे वादळ आल्याने नागरिकांमध्ये एकच घबराट पसरली. शहरात सर्वत्र सार्वजनिक ठिकाणांहून लोकांच्या किंकाळ्या ऐकू आल्या. मुंबईतील वादळामुळे घाटकोपरजवळ पेट्रोल पंपावर मोठे लोखंडी होर्डिंग कोसळून आठजणांचा मृत्यू झाला असून ५९ जण गंभीर जखमी झाले आहेत. आतापर्यंत ६७ जणांना बाहेर काढण्यात यश आले आहे. धुळीचे वादळ आणि गारांच्या पावसामुळे मुंबईकरांचे अतोनात हाल झाले. वादळी वाऱ्यांमुळे दृश्यमानता कमी झाल्यानंतर मुंबई विमानतळाचा रनवे बंद करण्यात आला.



डोंबिवली आणि कल्याण भागात दुपारपासून आभाळ भरून आले. त्यापाठोपाठ वादळाला सुरुवात झाली. अर्धा-पाऊण तासाच्या वादळानंतर रिमझिम सरी बरसायला सुरुवात झाली. (पान ८ वर)

### ताशी १०० किमी वेगाचा वादळी वारा

हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार पाऊस बरसणार असल्याची चाहूल लागली होती. वातावरण पाहून अनेकांनी घराची वाट धरली. कारण या उन्हाळ्यात कोणाकडे छत्री असण्याचा प्रश्नच नव्हता. दरम्यान, दुपारी ताशी १०० किमी वेगाने वादळी वारा वाहत होता. त्यामुळे धूळ आणि कचरा लोकांच्या घरात गेला. दरम्यान, हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार पालघर आणि ठाणे जिल्ह्यातील काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने हजेरी लावली.

# नीरा कालव्यातून पाणी सोडण्याला ५ दिवसांचा अल्टिमेटम

## तोंडचं पाणी पळालेल्या शेतकऱ्यांची फलटणच्या कार्यालयावर धडक

✔ सुराज्य/फलटण

उन्हाळ्याच्या सध्य स्थितीत पाण्याची भयावह टंचाई निर्माण झाली आहे. पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याचा प्रश्न गहन बनला आहे. नीरा उजव्या कालव्याचं पाणी आवर्तनामध्ये अर्ध्यावरच बंद करण्यात आल्यानं माळशिरस, सांगोला, पंढरपूर आणि फलटण या चार तालुक्यातील शेतकऱ्यांच्या तोंडचं पाणी पळालं आहे. या स्थितीत आज सोमवारी या संबंधित शेतकऱ्यांनी फलटण इथल्या नीरा कालवा विभागाच्या कार्यालयावर धडक मारली. पाणी सोडणं अर्ध्यावरच काम बंद केलं याबद्दल या विभागाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारत धारेवर धरले.

दरम्यान, निरा कालव्यातून पाणी सोडण्याला पाच दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला असून सहाव्या दिवशी पाणी न सोडण्यास येत्या १९ मेला पुन्हा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा संतप्त शेतकऱ्यांनी निरा कालवा विभाग प्रशासनाला दिला आहे.

भाजपचे विधान परिषदेचे आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली तसेच माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत हे आज शेतकऱ्यांनी हे आंदोलन केलं.

सोलापूर जिल्ह्याच्या सीमेवर असणाऱ्या धर्मपुरी येथे मोहिते-पाटील आणि उत्तम जानकर समर्थक जमले. तद्नंतर वाहनाने हे सर्व आंदोलक फलटण येथील नीरा कालवा विभागाच्या कार्यालयावर पोचले. त्या ठिकाणी बराच वेळ आंदोलक थांबले होते. प्रशासनाची बाजू ऐकून घेण्याबरोबरच प्रशासनाला इशारा देऊन शेतकऱ्यांनी आंदोलन संपविले.

ऐन उन्हाळ्यात शेतातील बागायती पिके व फळबागा तसेच माणसांसह पशु-प्राणी यांनी पाण्याची अत्यंत गरज आहे. अशावेळी उन्हाळी सिंचन आवर्तनादरम्यान गळतीची घटना घडल्याने चालू आवर्तनात खंड पडला आहे. परिणामी हजारो शेतकरी धास्तावले आहेत. याच शेतकऱ्यांचा आवाज मोहिते पाटील यांनी धडक मोर्चाच्या रूपाने फलटण येथे नेला. येत्या दोन दिवसात दुरुस्ती करून आवर्तन सुरु करा अन्यथा धरणावर जाऊन दरवाजे उघडू, असा इशारा उत्तम जानकर यांनी अधिकाऱ्यांना दिला आहे. एकंदर माढा लोकसभेची निवडणूक झाली असली तरी आज पुण्यात मतदान होत असताना या मोर्चाचा फायदा विरोधकांना मिळू शकणार आहे.



### लाभधारक शेतकऱ्यांना हवंय तातडीनं पाणी पण...

निरा कालवा प्रशासनाच्या सांगण्यानुसार, तेथील गळती दुरुस्तीसाठी नीरा उजवा कालव्यातून माळशिरस, सांगोला व पंढरपूर तालुक्यातील उन्हाळी आवर्तन बंद केले आहे. दुरुस्तीनंतर पुन्हा या भागातील शेतकऱ्यांना ठरल्याप्रमाणे पाणी दिले जाणार आहे.मात्र, तातडीने दुरुस्ती करून तातडीने पाणी देण्याची मागणी आंदोलकांची होती.

### आवर्तनात विस्कळीतपणा, शेतकऱ्यांमध्ये असंतोष

नीरा उजवा कालवा कि.मी. ४९/९०० सेवा पथकाकडील बाजूस घळ पडून गळती लागली होती. त्यामुळे पाणी वाया जाऊ लागल्याने हे आवर्तन थांबवल्याची प्रशासनाचे म्हणणे आहे. गळती लागल्याने कालवा विसर्ग कमी करून गळती रोखण्यास अंशतः यश आले होते. परंतु, गळती पूर्णपणे रोखली गेली नाही. सध्या तीव्र दुष्काळाची स्थिती असल्याने पाण्याच्या आवर्तनात विस्कळीतपणा आल्यामुळे माळशिरस, सांगोला व पंढरपूर नीरा उजवा कालवा लाभधारक शेतकऱ्यांमधे असंतोष पसरला आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




आश्रयासाठी फुटपाथ नंतर होर्डिंग् पण धोकादायक झालेत!

| कल्याण |
|---|
| ---- |

| मुंबई |
|---|
| --- |

# वसुलीसाठी तगादा; जवळ्यातील कर्जदाराची आत्महत्या



✔ **सांगोला :** पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जाच्या थकीत हप्त्याच्या वसुलीसाठी सतत तगादा लावून त्रास दिल्यामुळे वैतागून थकीत कर्जदाराने आत्महत्या केली. सांगोला तालुक्यातील जवळा येथे हा प्रकार घडला. याप्रकरणी पतसंस्थेच्या दोघा अधिकाऱ्यांसह चौघाजणांविरुद्ध सांगोला पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

कमलेश दीपक राऊत (वय ३०, रा. जवळा) असे आत्महत्या केलेल्या थकीत कर्जदार तरुणाचे नाव आहे. त्याचा भाऊ वैभव दीपक राऊत याने यासंदर्भात दिलेल्या फिर्यादीनुसार फॅबटेक सहकारी पतसंस्थेच्या घेरडी शाखेतील अधिकारी अमोल सावंत (वय३५) व ऋत्विक पवार (वय ३८, रा. घेरडी, ता. सांगोला) तसेच आनंदा खरजे (वय ४५, रा. हंगिरगे, ता. सांगोला) आणि चंद्रकांत भगत (वय ३०, रा. वाढेगाव, ता. सांगोला) यांची नावे आरोपी म्हणून निष्पन्न झाली आहेत. मृत कमलेश राऊन याने फॅबटेक पतसंस्थेतून व्यावसायिक अडचणींमुळे कर्ज घेतले होते. परंतु कर्जाचे हप्ते थकल्यामुळे मागील महिन्यापासून थकीत कर्जवसुलीसाठी पतसंस्थेकडून सतत तगादा लावण्यात आला होता. सतत छळ आणि धमक्यांमुळे वैतागलेल्या कमलेश याने जवळा गावात विलास गावडे यांच्या शेतात पत्र्याच्या शेडमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# बिहारचे माजी उपमुख्यमंत्री सुशील कुमार मोदींचे निधन

✔ **नवी दिल्ली :** बिहारचे माजी उपमुख्यमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते सुशील कुमार मोदी यांचे सोमवारी (१३ मे) निधन झाले. ते ७२ वर्षांचे होते. दिल्लीतील एम्स रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते कर्करोगाने त्रस्त होते आणि त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यांच्या निधनामुळे बिहारमध्ये शोककळा पसरली आहे.



सुशील कुमार मोदी हे बिहारमधील भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांपैकी एक होते. दरम्यान, बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी एक्सवर पोस्ट करून सुशील कुमार मोदी यांच्या निधनाची माहिती दिली आणि दु:खही व्यक्त केले. सम्राट चौधरी यांनी म्हटले की, बिहारचे माजी उपमुख्यमंत्री आणि माजी राज्यसभा खासदार श्री सुशील कुमार मोदी यांना त्यांच्या निधनाबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली. बिहार भाजपाचे हे कधीही भरून न येणारे नुकसान आहे.

सुराज्य सोलापूर

१५७/१५८ औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर ४१३००३




पाहिजेत

- **मुख्य उपसंपादक : पद १**
  - किमान पदवीधर
  - वृत्तपत्रातील कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव
  - सोलापूर जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय, आर्थिक ज्ञान
- **उपसंपादक : पद २**
  - किमान पदवीधर
  - वृत्तपत्रातील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव
- **शहर वार्ताहर : पद ४**
  - सोलापूर शहरातील सामाजिक, राजकीय ज्ञान
  - बिटवरील कामाचा किमान २ वर्षाचा अनुभव
- **सहाय्यक जाहिरात व्यवस्थापक : पद २**
  - किमान पदवीधर
  - वृत्तपत्र जाहिरात विभागातील कामाचा ५ वर्षाचा अनुभव
- **मार्केटींग एक्झिक्युटीव्ह (जाहिरात) : पद ३**
  - किमान पदवीधर
  - मार्केटींग क्षेत्रातील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव
  - वृत्तपत्र क्षेत्रातील जाहिरात विभागातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य
- **ऑफीस बॉय : पद ३**
  - किमान १० वी उत्तीर्ण

**खालील पत्त्यावर ८ दिवसात अर्ज करावेत.**
**Email : pmitragotri999@gmail.com**
**Whatsapp No. 8975768348**

धक्का!! सुराज्य



# तापलेलं रणांगण
# आक्रमक रणरागिणी

**मुंबई: हैद्राबाद येथे एमआयएमच्या ओवेसी बंधूंच्या विरोधात रणशिंग फुंकणाऱ्या भाजपच्या नवनीत राणा आक्रमक भाषणासाठी प्रसिद्ध आहेत. शिवसेना ठाकरे गटाच्या राज्यसभा सदस्या व प्रवक्त्या प्रियांका चतुर्वेदी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र श्रीकांत शिंदे यांच्यावर गद्दारीवरून जिव्हारी लागणारी टीका केली. शिवसेनेच्या सुषमा अंधारे विरोधकांचा यथेच्छ समाचार घेतात.**



काँग्रेसच्या यशोमती ठाकूर व प्रणिती शिंदे, शिंदे गटाच्या शीतल म्हात्रे व ज्योती वाघमारे या महिला नेत्यांनी प्रचाराची धुरा प्रभावीपणे सांभाळली आहे. भाजपच्या अमरावती मतदारसंघातील उमेदवार नवनीत राणा यांनी हैदराबादमध्ये ओवेसी यांना आव्हान दिले. त्यामुळे सध्या १५ मिनिटे विरुद्ध १५ सेकंद असा हा वाद रंगला आहे. चार दिवसांपूर्वी ठाकरे गटाच्या राष्ट्रीय प्रवक्त्या प्रियंका चतुर्वेदी यांनी मुख्यमंत्री शिंदे व त्यांचे खासदार चिरंजीवांना डिवचले. त्यामुळे शिंदे गट चांगलाच संतप्त झाला होता. सुप्रिया सुळे यांच्या बारामती मतदारसंघातील मतदान झाले असल्याने त्या इतर टप्यातील प्रचारासाठी मैदानात उतरल्या आहेत. त्यांनी अहमदनगरचे उमेदवार नीलेश लंके यांना दम देणाऱ्या अजित पवार यांना इशारा दिला आहे. भाजपच्या बीड येथील उमेदवार पंकजा मुंडे यांची भाषणे गाजली. पण बीडमध्ये लढत असल्याने मुंडे या मतदारसंघातच अडकून पडल्या. सोलापूरच्या काँग्रेस उमेदवार प्रणिती शिंदे यांनी मतदारसंघातील प्रचारादरम्यान मोदी सरकारला जाब विचारला. भाजप संविधान बदलण्यासाठी चारशे पारचा नारा देत असल्याचा प्रचार त्यांनी ठणकावून केला आहे. काँग्रेसच्या दुसऱ्या स्टार प्रचारक यशोमती ठाकूर यांच्यावर काही मतदारसंघाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. ठाकरे गटाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे




यांच्या सभांना भरघोस प्रतिसाद मिळत आहे. विरोधी नेत्यांची टर उडविण्याच्या त्यांच्या ग्रामीण बाज असलेल्या भाषणांना चांगलाच प्रतिसाद मिळतो. अंधारे यांना प्रचारासाठी ठाकरे गटाच्या उमेदवारांकडून अधिक पसंती दिली जाते. भाजपच्या वतीने चित्रा वाघ या ठिकठिकाणी दौरे करीत आहेत.

राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्या विद्या चव्हाण तर अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली चाकणकर यांनी आपापल्या पक्षांची बाजू लावून धरली होती. विद्या चव्हाण यांनी विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले. चाकणकर या अजित पवार गटाचा किल्ला लढवित आहेत. मतदान यंत्राची पूजा केल्याप्रकरणी त्या अडचणीत आल्या आहेत. विधान परिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांनी शिंदे गटाच्या वतीने ठिकठिकाणी प्रचारात सहभाग घेतला. शिंदे गटाच्या आमदार मनीषा कायंदे यांनीही पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सभा घेतल्या.

शिवसेना शिंदे गटाच्या शीतल म्हात्रे व ज्योती वाघमारे या पक्षाची बाजू मांडण्याची कामगिरी करतात. विशेषत: ठाकरे गटावर कुरघोडी करण्याची संधी सोडत नाहीत. एकूणच राज्यात महिला नेत्यांची प्रचारात आक्रमक भूमिका राहिली आहे.

## हातात मद्याच्या बाटल्या, दानवेंनी भुमरेंना डिवचलं
# भिंगरी रे भिंगरी...

**छत्रपती संभाजीनगर : प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यातील प्रचार फेऱ्यांमध्ये शनिवारी महायुती आणि उद्धव ठाकरे गटाचे कार्यकर्ते समोरासमोर आले. त्यांनी केलल्या घोषणाबाजीमुळे शहरातील क्रांती चौकाता दुपारी काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी दोन हातात देशी दारुच्या बाटल्या उंचावून महायुतीचे उमेदवार संदीपान भुमरे यांना डिवचले. भिंगरी'. भिंगरी' असे म्हणत कार्यकर्ते चिडवत होते.**



संदीपान भुमरे यांनी त्यांच्या पत्नीचे नावे दोन मद्यविक्रीचे परवाने असल्याची माहिती शपथपत्रात दिल्यानंतर भुमरे यांच्या विरोधातील प्रचाराचे प्रमुख हत्यार म्हणून उद्धव ठाकरे गटाचे कार्यकर्ते प्रचार करत होते. तर भुमरे यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांना मुस्लिमस्नेही ठरविण्यावर भर दिला होता. उमेदवारांच्या प्रतिमांवर आलेल्या औरंगाबाद लोकसभा मतदारसंघात दोन्ही बाजूचे कार्यकतेभिडले. पोलिसांनी व काही कार्यकर्त्यांनी वाद वाढू दिला नाही.

शनिवारी सकाळी क्रांती चौकातून महाविकास आघाडीची प्रचार फेरी सुरू होणार होती. या प्रचार फेरीत विरोधी पक्ष नेते अंबदास दानवे सहभागी झाले होते. भुमरे यांच्या मद्यविक्रीचा मुद्दा अधोरेखित करण्यासाठी त्यांनी दोन बाटल्या हातात धरल्या. महायुतीचा उमेदवार भिंगरी विक्रेता' असे सांगत त्यांनी भिंगरी', भिंगरी' असे म्हणत डिवचले. जमलेले कार्यकर्त्यांनी मग तीच घोषणा केली. भुमरे यांच्या मद्यविक्रीचे केवळ दोन नाही तर १४ परवाने आहेत आणि ते केवळ दोन वर्षात त्यांना कसे मिळाले, असा सवालही अंबदास दानवे यांनी उद्धव ठाकरे यांच्या सभेतून केला होता. एका बाजूला मद्यविक्रेता, दारुडा अशा उपमा देऊन प्रचार केला जात असताना संदीपान भुमरे यांनी खैरे यांच्या हिंदूत्त्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले, पूर्वी कोणी सभेत चुकून औरंगाबाद म्हटले तर खैरे त्याला संभाजीनगर म्हणा नाही तर सभेतून बाहेर काढा म्हणायचे. आता त्यांना औरंगाबाद म्हणायचे की संभाजीनगर म्हणायचे याचा संभ्रम आहे. त्यांची खरी प्रतिमा आता बाहेर येऊ लागली आहे.' भुमरे यांच्या प्रचारासाठी आलेल्या निलम गोऱ्हे यांनी खैरे ही व्यक्ती डुप्लीकेट' असल्याची टीका केली होती. खैरे यांच्या नावाचा अपभ्रंशही करण्यात आला. त्यांचे नाव मुस्लिम वाटावे असे त्यांना हिणवण्यात आले. खैरे यांची प्रतिमा मुस्लिमस्नेही करुन भुमरे यांनी प्रचार केला. विकास कामात गेल्या ३० वर्षात खैरे यांनी काही एक काम केले नाही, असेही भुमरे सांगत आहेत.

### मुख्यमंत्री ठाण मांडून

छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघ प्रतिष्ठेचा बनवून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दोन दिवस प्रचारासाठी आले होते. त्यांनी अगदी बुथ कार्यकर्त्यांचीही बैठक घेतली. वैजापूर येथेही त्यांनी सभा घेतली. महायुतीचे उमेदवार संदीपान भुमरे यांच्या प्रचारात सिनेअभिनेता गोविंदा यांनीही कन्नड येथे प्रचार फेरी काढली.

# तिरंगी लढत
## भिवंडीत भाजपसाठी आव्हान कायम

**तिरंगी लढतीमुळे सुरुवातीला सोपी वाटणारी भिवंडी लोकसभा मतदारसंघातील निवडणूक भाजपचे केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या साठी प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात मात्र आव्हानात्मक ठरु लागल्याचे चित्र अगदी ठसठशीतपणे दिसू लागले आहे.**

मुस्लिम, आगरी आणि कुणबी या तीन समाजातील बहुसंख्य मतदार या मतदारसंघात आहेत. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाने सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा) यांना या मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. तर मतदारसंघातील ग्रामीण पट्ट्यात गेल्या काही वर्षापासून कार्यरत झालेले जिजाऊ संघटनेचे अध्यक्ष निलेश सांबरे यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. कपिल पाटील यांच्याविषयी मतदारसंघातील मोठया भागात असलेली नाराजी, कुणबी मतांच्या ध्रुवीकरणाच्या चर्चेमुळे निवडणूकीत चुरस निर्माण झाली आहे.

आगरी समाजाला आपलेसे करण्यासाठी भाजपने कपिल पाटील यांना केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान दिले. पाटील यांच्या मंत्रिपदाचा पक्षाला ठाणे जिल्ह्यात फायदा होईल, अशी अपेक्षा होती. पण केंद्रात राज्यमंत्रिपद असतानाही जिल्ह्याच्या राजकारणात पाटील फारसा प्रभाव पाडू शकले नाहीत. निवडून येण्यासाठी त्यांना अखेरपर्यंत धावपळ करावी लागत आहे. भाजपची वरिष्ठ मंडळीही पाटील यांच्या कार्यपद्धतीवर फारसे खुश नाहीत. पक्षाचे जिल्ह्यातील वजनदार आमदार किसन कथोरे यांच्याशी दोन हात करण्यातच पाटील यांचा बराचसा वेळ गेला. स्वपक्षीयांबरोबर घेतलेला पंगा भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या पचनी पडलेले नाही.

काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या चढाओढीत या मतदारसंघातील विरोधी उमेदवार शेवटपर्यंत ठरत नाही ही बाब कपील पाटील यांच्या नेहमीच पथ्यावर पडते. यंदाही अगदी शेवटच्या टप्प्यात हा मतदारसंघ राष्ट्रवादीसाठी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. पाच वर्षांपुर्वी काँग्रेसचे सुरेश टावरे यांना उमेदवारीसाठी शेवटच्या दिवसापर्यत वाट पहावी लागली होती. यंदाही सुरेश म्हात्रे यांच्या बाबत हेच घडले. राष्ट्रवादीला हा मतदारसंघ सुटल्याने काँग्रेस पक्षात नाराजी होती. त्यामुळे पहिला म्हात्रे यांचा पहिला आठवडा ही नाराजी दूर करण्यातच गेला. त्याच जिजाऊ संघटनेने निलेश सांबरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. कुणबी समाजातून



येणारे सांबरे यांनी शहापूर, भिवंडी ग्रामीण, मुरबाड भागात आक्रमक प्रचार केल्याने ही निवडणुक कपील पाटील यांच्यासाठी सोपी ठरेल असाच अंदाज बांधला जात होता. प्रचाराचा टप्पा पुढे सरकत गेला तसे मात्र ही निवडणूक चुरशीची ठरु लागली आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत पाटील यांनी ज्या भागातून चांगली मते घेतली होती तेथे सांबरे यांचा जोर वाढू लागल्याने पाटील यांचीच डोकेदुखी वाढू लागली आहे. विश्वनाथ पाटील यांच्यासह कुणबी सेना पाटील यांनी आपल्या पंखाखाली घेतली आहे. मात्र मराठा आंदोलनानंतर कुणबी समाजात नाराजीचे वातावरण आहे. या नाराजीचा फटका पाटील यांना बसेल की काय अशी भीती आता भाजपच्या गोटात आहे.

भिवंडी शहरात मुस्लीम मते निर्णायक ठरतात. एरव्ही काँग्रेस किंवा समाजवादी पार्टीला मुस्लीम मतांचा आधार असतो. यंदा राष्ट्रवादीचा उमेदवार रिंगणात असल्याने मुस्लीम समाज महाविकास आघाडीचा घटक पक्षाला साथ देईल का, यावरही बरीच गणिते अवलंबून आहेत.

**मतांचे ध्रुवीकरण कोणाच्या पथ्यावर? :** भिवंडी लोकसभा मतदार संघात सहा विधानसभा मतदार संघ येतात. यामध्ये भिवंडी ग्रामीण, भिवंडी पश्चिम, भिवंडी पूर्व, कल्याण पश्चिम, शहापूर, मुरबाड या मतदार संघाचा समावेश आहे. आगरी, कुणबी, आदिवासी आणि मुस्लिम अशा मतदारांचा भारणा असलेल्या हा मतदार संघ आहे. या मतदार संघात एकूण २७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत. भिवंडी मतदार संघात २००९ मध्ये काँग्रेसचे खासदार सुरेश टावरे हे निवडून आले होते. तर, २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेस उमेदवाराला दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली होती. यंदा काँग्रेसचे कार्यकर्ते नारज होते. मात्र काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी समजूत काढत पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांची नाराजी दूर केली असून पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते आता सुरेश म्हात्रे यांच्या प्रचारात उतरल्याचे दिसून येत आहे. पाटील यांनीही विरोधात असणारे भाजप आमदार किसन कथोरे आणि शिंदेसेनेसोबत जुळवून घेतले आहे. पाटील आणि म्हात्रे हे दोन्ही उमेदवार आगरी समाजाचे आहेत तर, सांबरे हे कुणबी समाजाचे आहेत. शेवटच्या टप्प्यात भाजपाचे प्राबल्य असलेल्या मुरबाड आणि बदलापूर या कुणबी पट्ट्यात सांबरे यांनी तळ ठोकला आहे. आगरी, कुणबी, आदिवासी आणि मुस्लिम अशा मतदारांचा भरणा असलेल्या हा मतदार संघ आहे. हे मतदार कुणाची साथ देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दाव्या-प्रतिदाव्यांच्या ललकाऱ्या
# पण संविधानावरुनच्या मताधिक्क्याचं काय?

**देशात सध्या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी भाजपा आणि विरोधी इंडिया आघाडीच्या प्रचारसभांमध्ये संविधानाचा मुद्दा केंद्रस्थानी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवडणूक प्रचारसभांमध्ये केलेल्या भाषणात संविधान पवित्र आहे आणि ते बदलले जाणार नाही, असा दावा केला आहे. तर, दुसरीकडे काँग्रेस नेते राहुल गांधी आणि इतर विरोधी पक्षनेत्यांनी असा दावा केला आहे की, संसदेत मोठ्या बहुमतासह भाजपा निवडून आल्यास संविधान फेकून देतील. सतत संविधानाविषयी केल्या जाणाऱ्या दाव्या-प्रतिदाव्यांमुळे दलित समुदायात चिंता असल्याचे पाहायला मिळत आहे.**

### संविधान रक्षणाचा संकल्प

महाराष्ट्रातील दलित समुदायातील व्यक्तींकडून इतर गोष्टींसह आंबेडकरांच्या स्मारकावर श्रद्धांजली अर्पण करून, संविधानाचे रक्षण करण्याचा संकल्प करीत आहेत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर दलितांसाठी एक आयकॉन आहेत; ज्यांनी त्यांना त्यांची ओळख आणि प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. कुटुंबाकडून पाच दशके जुन्या पुस्तकांच्या स्टॉलचा वारसा मिळालेले करण केदार म्हणतात, संविधान हा लोकशाहीचा आत्मा आहे. त्यांना भीती आहे की, जे लोक राज्यघटनेची मोडतोड करण्याचा प्रयत्न करीत आहेत, ते भारताला हजार वर्षे मागे नेतील.

### दलित समुदायाचे प्रतिनिधित्व करणारे पक्ष

राज्यातील दलितांचे नेतृत्व करीत असलेल्या पक्षांमध्ये अनेक दशकांपासून नेतृत्वाची कमतरता असल्याचे अनेकांचे सांगणे आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या १३ टक्के अनुसूचित जाती (ड्उ) आहेत. त्यात ५७ टक्के महार, २० टक्के दलित, मातंग व १७ टक्के चामर जातींचा समावेश आहे. राज्यात दलितांचे प्रतिनिधित्व करणारे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) वा आरपीआय (ए)) आणि वंचित बहुजन आघाडी (व्हीबीए) हे दोन प्रमुख पक्ष आहेत. आरपीआय (ए)चे नेतृत्व केंद्रीय मंत्री रामदास आठवले करीत आहेत; तर व्हीबीएचे नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू प्रकाश आंबेडकर करीत आहेत.




### दलितांची जबाबदारी आठवलेंवर

आठवले ५० टक्क्यांपेक्षा जास्त दलितांचा पाठिंबा असल्याचा दावा करतात; तर प्रकाश आंबेडकर दलित, आदिवासी व ओबीसींच्या मोठ्या वर्गाचे प्रतिनिधित्व करीत असल्याचा दावा करतात. २०१४ मध्ये जेव्हा आरपीआय (ए)ने भाजपाशी युती केली, तेव्हा या निर्णयाने पक्षातील अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. दलितांची नवी पिढी राजकीय प्रयोगासाठी खुली आहे, असे म्हणत त्यावेळी आठवले यांनी भाजपाशी युती केली होती.

भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीएने संविधानाच्या मुद्द्यावर दलितांचे लक्ष वेधण्यासाठी १० वर्षांनंतर जाहीर सभा काढण्याचे काम आठवले यांच्यावर सोपवले. बुधवारी त्यांनी राहुल गांधी यांच्याविरोधात निवडणूक आयोगाकडे भाजपावर केलेल्या हल्लची तक्रारही केली.

प्रख्यात दलित लेखक अर्जुन डांगळे म्हणतात की, संविधानाच्या मुद्द्यावर दलित एकजूट आहेत. समाजात भाजपाच्या विरोधात तीव्र नाराजी असून, राग आणि विश्वासघाताची भावना आहे. परिसरातील आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ उभे असलेले ६४ वर्षीय हिरामण गायकवाड म्हणतात, आमच्यासाठी आंबेडकर हेच सर्वस्व आहे. त्यांच्या संविधानाशी आपण तडजोड कशी करू शकतो? आंबेडकरांच्या पुतळ्याची विटंबना केल्याच्या निषेधार्थ १९९७ मध्ये पोलिसांनी गोळीबार केला होता; त्यात जखमी झालेल्या २६ जणांपैकी गायकवाड एक आहेत. या गोळीबारात १० लोकांचा मृत्यू झाला होता.




## मतदान संपण्याआधीच पुण्यात झळकले
# भावी खासदाराचे बॅनर!

**पुणे लोकसभा मतदारसंघ भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. या निवडणुकीत मात्र पुण्यात भाजपचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्यापुढे काँग्रेसने रवींद्र धंगेकरांच्या रुपाने तगडे आव्हान उभे केले आहे. त्यामुळे पुण्याची लढत ही एकतर्फी नसून तुल्यबळ झाल्याची चर्चा आहे. पुण्यात मतदान कमी झाल्याने पुणेकर नेमके कुणाला कौल देणार, याकडे लक्ष आहे. आता मतदान संपताच पुण्यात लागलेल्या भावी खासदारांचे फलक लक्षवेधी ठरू लागले आहेत.**



पुणे लोकसभा मतदारसंघासाठी चौथ्या टप्प्यात सोमवारी मतदान पार पडले. हे मतदान झाल्यानंतर लगेच भावी खासदाराचे बॅनर झळकले आहेत. हे बॅनर भाजपच्या माजी नगरसेवकांनी लावले आहेत. यावर खासदार मुरलीधर मोहोळ यांना हार्दिक शुभेच्छा, असा उल्लेख करण्यात आला आहे. माजी नगरसेवक सनी निम्हण यांनी पुण्यातील पाषाण परिसरात हे बॅनर लावले आहेत. मुरलीधर मोहोळ यांच्या फोटोसह कर्वे रोड ते कर्तव्य पद असा बॅनरवर उल्लेख आहे. पुण्यातील मतदान झाल्या झाल्या झळकलेल्या या फ्लेक्सने नागरिकांसह राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर

## नाशकात वादळी वाऱ्यासह पावसाची जोरदार हजेरी

✔ **नाशिक** : जिल्ह्यात शनिवारी सायंकाळनंतर वादळी वाऱ्यासह धडकलेल्या वळीवाच्या पावसाने शेतकऱ्यांची दाणादाण उडवली. चांदवड तालुक्यात वीज अंगावर पडून एका महिलेचा मृत्यू झाला. तर सिन्नर तालुक्यातील कृष्णनगरमध्ये घराची भिंत कोसळल्याने महिला जखमी झाली. या म हिलेवर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. याशिवाय गाय, म्हैस, बैल आणि शेळ्या अशा १३ जनावरांचाही मृत्यू झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने रविवारी (दि. १२) दिली. सिन्नर, निफाड, देवळा, नांदगाव, मालेगाव आणि बागलाण तालुक्यांमध्ये घरांची पडझड, शेडनेटसह कांदाचाळींची मोठी हाणी झाली.

गेल्या काही दिवसांपासून वातावरणातील उकाडा वाढला आहे. हवामान विभागानेही वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा दिला आहे. शनिवारी सायंकाळनंतर जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावली. सिन्नर तालुक्याला या पावसाचा सर्वाधिक फटका बसला. याशिवाय निफाड, देवळा, मालेगाव आणि नांदगाव तालुक्यात देखील पावसाने दाणादाण उडवून दिली.





## थोडक्यात

### गॅस परवडत नाही, रॉकेल द्या; नागपूरकर कुटुंबांची मागणी

✔ **नागपूर** : पूर्वीच्या काळी अनेक कुटुंबे चुलीवर तर, थोडी आर्थिक परिस्थिती चांगली असणारे स्टोव्हवर स्पयंपाक करीत असत. एलपीजी सिलिंडर आल्यानंतर स्टोव्हही मागे पडला. पूर्वी केवळ श्रीमंतांकडे असणारा गॅस आता घराघरात पोहोचला आहे.
मात्र, आजही नागपुरातील २३ हजार कुटुंबांकडे एलपीजी गॅस नसल्याने त्यांनी केरोसीनचा पुरवठा करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे. गॅस आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याचे पत्रच विदर्भ रास्त भाव दुकानदार संघटनेकडून अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयाला पाठविण्यात आले आहे.

### बारामतीत ईव्हीएम ठेवलेल्या गोदामाचे सीसीटीव्ही बंद

✔ **पुणे** : बारामती लोकसभा मतदारसंघात अतिशय धक्कादायक घटना घडली आहे. मतदान झालेले ईव्हीएम मशीन ज्या गोदामात ठेवण्यात आले होते. तिथले सीसीटीव्ही बंद पडले आहेत. यामुळे निकालात काहीतरी फेरफार होऊ शकतो असा संशय खासदार सुप्रिया सुळेंचे निवडणूक प्रतिनिधी लक्ष्मीकांत खाबिया यांनी वर्तवला आहे. आज सकाळी १० वाजून २५ मिनिटांनी हे सीसीटीव्ही बंद पडले आहेत. बारामती लोकसभा मतदारसंघातील सासवड या भागात ईव्हीएम चोरीला गेल्याचा प्रकार घडला होता. पोलिसांनी चोरांना अटक देखील केली होती.
परंतु या प्रकरणानंतर पोलिसांवर संशय व्यक्त केला होता. तसाच प्रकार बारामती लोकसभा मतदानाच्या दिवशी घडला होता. पीडीसीसी बँक पहाटे चारपर्यंत उघडी असल्याचं आढळून आलं होतं. इंदापूर येथे पैसे वाटल्याचे व्हिडीडिओ समोर आले होते. स्थानिक आमदार दत्ता भरणे हे एका कार्यकर्त्याला शिवीगाळ करत होते, याचा व्हिडिओ ही व्हायरल झाला होता. त्यानंतर आज पुण्यात कोरेगाव पार्क येथे गोदामातील सीसीटीव्ही बंद पडलेले आढळले आहेत. यामुळे बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये काहीतरी काळंबेरं झाल्याचा संशय राष्ट्रवादीचे नेते लक्ष्मीकांत खाबिया यांनी व्यक्त केला आहे.


# अहमदनगरामध्ये राडा; दोन्ही उमेदवारांचे कार्यकर्ते भिडले

## पैसे वाटल्याचा आरोप, सरकारी कर्मचाऱ्याला प्रचार पत्रकासह पकडले

✔ अहमदनगर/प्रतिनिधी

**अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील निवडणूक अतिशीय चुरशीची होत आहेत. प्रचारात दोन्ही बाजूंनी आरोपप्रात्यारोपाच्या फैरी झडल्या. आता प्रत्यक्ष मैदानावरही वाद झाल्याचे पहायला मिळाले. मतदानाच्या आधीच्या रात्री पारनेर तालुक्यात दोन्ही उमेदवारांचे कार्यकर्ते भिडले. एकाकडून पैसे वाटपाचा आरोप केला तर दुसऱ्याने उटल आपल्यालाच लुटल्याची तक्रार केली आहे. यासंबंधीचे गुन्हे पोलिस ठाण्यात दाखल आहेत. तर मतदानाच्या दिवशी पाथर्डी तालुक्यात उमेदवारीची प्रचार पत्रके जवळ बाळगताना एका सरकारी कर्मचाऱ्याला पकडण्यात आले.**





अहमदनगर लोकसभा मतदारसंघात महायुतीचे डॉ. सुजय विखे पाटील आणि महाविकास आघाडीचे नीलेश लंके यांच्यात चुरशीची लढत होत आहे. पारनेर तालुक्यात काल रात्री भाजप तालुकाध्यक्ष राहुल शिंदे यांना पैसे वाटप करताना पकडल्याचा दावा करण्यात आला. यासंबंधी गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. अनिल दत्तात्रय गंधाक्ते यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, राहुल शिंदे त्यांच्या कारमधून पैसे वाटप करीत असल्याची माहिती मिळाली. त्यावर मी त्यांचा पाठलाग सुरु केला होता. त्यावेळी त्यांनी लोक जमवून आपणाला मारहाण केली. यामध्ये वर्षा पांडुरंग गंधाक्ते, पांडुरंग बबनराव गंधाक्ते यांनीही मारहाण झाली आहे, असे फिर्यादित म्हटले असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या घटनास्थळावरील एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यामध्ये रस्त्यावर एक बॅग आणि पैसे पडल्याचे दिसत असून हे पैसे भाजपचे शिंदे यांचे असल्याचा दावा केला जात आहे. तर दुसरीकडे भाजपचे शिंदे यांनीही फिर्याद दिली आहे. त्यांनी म्हटले आहे की, रात्री मी आळकुटी येथे निघालो होतो. वाहनचालक शरद अंबादास सोमवंशी सोबत होतो. त्यावेळी अनिल गंधाक्ते व सोबतच्या चार-पाच जणांनी पाठीमागून येऊन आपल्या गाडीचे काच फोडली. अनिल गंधाक्ते याचे हातात रिव्हॉल्वर होता. त्यावेळी त्यांनी गाडीतील कागदपत्रे खाली फेकत आपल्या गळ्यातील सोन्याची चैनही काढून घेतली. आमच्यावर पैसे वाटपचा आरोप केला. तेव्हा आम्ही अधिकाऱ्यांना बोलावून गाडीची तपासणी करण्यास सांगितेल. त्यावेळी गर्दी झाली होती. कोणी तरी पैशाची बॅग रस्त्यावर आणून टाकली व ती माझ्याच गाडीतील असल्याचे सांगू लागले. नंतर गर्दीतील कोणी तरी ती बॅग व पैसे तेथून घेऊन गेले, असेही शिंदे यांनी फिर्यादीत म्हटले आहे. पोलिसांनी अनिल गंधाक्ते यांसह दहा जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

### रोहित पवार यांचे ट्विट

या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाला. लंके समर्थकांकडून विखे यांच्यावर पैसे वाटपाचा आरोप केला गेला. याची दखल राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनीही घेतली. त्यांनी तो व्हिडिओ आपल्या सोशल मीडियात पोस्ट केला आहे. त्यासोबत म्हटले आहे की, उत्तरे'तून भरून आलेल्या ढगांमुळे भर उन्हाळ्यात नगर दक्षिणे'त पैशांची धुवांधार बरसात (पारनेर) अपेक्षा आहे की, या पुरात पोलिस यंत्रणा आणि निवडणूक आयोगाचे अधिकारी वाहून न जाता सुरक्षित असतील!' अशी पोस्ट करत रोहित पवार यांनीही विखे पाटील यांचे नाव न घेता त्यांच्यावर निशाणा साधल्याचे दिसून येत आहे.

## बेपत्ता झालेल्या तीन मुलांचे मृतदेह सापडले नाल्यात

✔ **विजयपूर** : शहरातील गच्चीनकट्ट कॉलनीतील एक मुलगी व दोन मुलगे रविवारी बेपत्ता झाली होती. ही मुले नाल्यातील पाण्यात मृतावस्थेत सापडल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

गच्चीनककट्टी कॉलनीतून बेपत्ता झालेली ही मुले कॉलनीत आलेल्या उंटाच्या मागे गेली होती. पालकांनी अनेक ठिकाणी शोधाशोध केली मात्र मुले काही सापडले नाहीत. यासंदर्भात पालकांनी एपीएमसी पोलीस ठाण्यात मुले हरविलेल्याची तक्रार दाखल केली होती.

सोमवारी दुपारच्या सुमारास इंडी रोडवरील शांतिनिकेतन शाळेजवळील महानगरपालिकेच्या घाण पाणी शुद्धीकरण प्रकल्पाच्या नाल्यात तीन मुलांचे मृतदेह आढळून आले. अनुष्का अनिल दहिहंडे (वय ९ रा.गदग )विजय अनिल दहिहंडे (वय ७ रा.गदग) व मिहीर जानगवळी (वय६ विजयपूर) अशी मृत्यू पावलेल्या बालकांची नावे आहेत. घटनास्थळी पालकांनी उपस्थितीत नातेवाईकांनी आक्रोश केला.



## विडी घरकुलला विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : जुना विडी घरकुल परिसरात राहणाऱ्या एका २७ वर्षीय विवाहितेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. गिता विनायक गडगी (वय २७, रा.जुना विडी घरकुल) असे मयत विवाहितेचे नाव आहे.

तिने शनिवारी सकाळी ७ वाजेच्या सुमारास राहत्या घरातील छताच्या पंख्याला ओढणीने गळफास घेतली होती. तिला फासातून सोडवून कुंभारी येथील खासगी रुग्णालयात प्राथमिक उपचार करून शासकीय रुग्णालयात रविवारी दुपारी दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान ती रात्री मयत झाली. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

## किरकोळ कारणावरून दोन गटात मारामारी

### परस्परांविरूद्ध फिर्यादी दाखल





✔ **सोलापूर** : सिध्दार्थ चौकातील पाण्याच्या टाकीच्या पुढे मुजमिल बसरी हे मोटारसायकलवर जात असताना त्यांना शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी अबुसुफीयान बागवानसह ८ जणांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. तसेच मौलाली चौकात घरासमोर बसलेल्या सोहेल बागवान व त्याच्या भावाला मागील भांडणाचा राग मनात धरून मारहाण केल्याप्रकरणी जब्बार बसरीसह ९ जणांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

या प्रकरणी मुजमील अब्दुल जब्बार बसरी (वय ३४ रा. मिल्लत मोहल्ला मशिदीजवळ, मौलाली चौक) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यात म्हटले आहे की, दि. १२ मे रोजी १०.३० वाजण्याच्या सुमारास मुजमील बसरी हे मोटारसायकलवर सिध्दार्थ चौक पाण्याच्या टाकीकडून सिव्हिल हॉस्पिटलकडे निघाले होते. त्यावेळी अबुसुफीयान बागवानसह ७ जणांनी शिवीगाळ करून मारहाण केली. या फिर्यादीवरून अबुसुफीयान जावेद बागवान, सोहेल जावेद बागवान, एजाज बागवान, जावेद बागवान व इतर ४ अशा ८ जणांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. याच्या परस्परविरूध्द सोहेल जावेद बागवान (वय २३ रा. मौलाली चौक) याने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि. १२ मे रोजी रात्री सोहेल हा त्याच्या घरासमोर बसलेला होता. त्यावेळी मागील भांडणाचा राग मनात जब्बार बसरीसह ९ जणांनी सोहेल बागवान व त्याच्या भाऊ अबुसुफीयान बागवान या दोघांना मारहाण केली. या फिर्यादीवरून जब्बार बसरी, जुबेर बसरी, फिरोज बसरी, इरफान बसरी, वसीम बसरी, जहीर बसरी, इस्माईल बसरी, अब्दुल्ला बसरी, जावेद शेख (सर्व रा. मौलाली चौक) अशा ९ जणांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. प्रकरणाचा तपास हवालदार नदाफ हे करित आहेत.

## खासगी बसची ट्रकला धडक; तरुण ठार,१० जखमी

✔ सोलापूर/प्रतिनिधी

वेगाने जाणारी खाजगी आराम बस समोरच्या ट्रकला पाठीमागून धडकल्याने १ प्रवासी ठार तर १० जण जखमी झाले.

हा अपघात पुणे महामार्गावरील खंडाळी पाटीजवळ (मोहोळा) सोमवारी पहाटे अडीच वाजेच्या सुमारास घडला. सर्व प्रवासी पुणे ते सोलापूर डॉल्फिन ट्रॅव्हल्सच्या बसमधून प्रवास करीत होते.

मयतामध्ये अनोळखी २८ वर्षीय इसमाचा समावेश आहे. तर मोहम्मद साजिद (वय ३३ ),एम.साई निखिल (वय२३), व्ही लोकेश (वय ३०), सय्यद अब्दुल सत्तार (वय ८४), फातिमाबी (वय ४२ सर्व रा. हैद्राबाद), शकील शेख(वय १९ रा.मुंबई), सचिन लाले (वय ३०), संतोष तेलंग (वय४६ दोघे रा.विरार पालघर), साजिद खान (वय ४४) फरहीन बेगम हुसेन (वय २२ सर्व रा.मुंब्रा, मुंबई) अशी जखमी प्रवाशांची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

सर्व प्रवासी पुण्याहून सोलापूरच्या दिशेने डॉल्फिन ट्रॅव्हल्स मधून प्रवास करीत होते. मोहोळ नजीक खंडाळी पाटीजवळ समोरच्या ट्रकला पाठीमागून बस धडकल्याने हा अपघात घडला. तालुका पोलिसात अपघाताची प्राथमिक नोंद झाली आहे.

## पवारांकडूनच फोडाफोडीचे राजकारण

### ठाण्यात राज ठाकरे बरसले

✔ **ठाणे** : फोडाफोडीचे राजकारण मला कधी मान्य झाले नाही, मात्र उद्धव ठाकरे यांनी मनसेचे सहा नगरसेवक खोके' देऊन फोडले, तेव्हा त्यांना काही वाटले नाही. यांच्यासोबत आता शरद पवार बसले आहेत. राज्यात या फोडाफोडीच्या राजकारणाची सुरुवात पवार यांनीच केली. काँग्रेस फोडून त्यांनीच पहिल्यांदा पुलोद'चा प्रयोग केला,' अशी टीका म नसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी केली.

महायुतीचे कल्याण लोकसभेचे उमेदवार डॉ. श्रीकांत शिंदे आणि ठाणे लोकसभेचे उम `दवार नरेश म्हस्के यांच्या प्रचारार्थ आयोजित कळवा येथील सभेतून राज यांनी शरद पवार यांच्यासह उद्धव ठाकरे यांच्यावरही टीकास्त्र डागले. छगन भुजबळ यांच्यासह शिवसेना आमदार फोडण्याचे काम पवार यांनी केले. त्यानंतर नारायण राणे यांच्यासोबत आम दार घेऊन काँग्रेसने शिवसेना फोडली. आज शिवसेना फ ुटल्यानंतर माझा बाप चोरला, माझा बाप चोरला', असे उद्धव सांगतात. जर तुम्हाला तुमच्या वडिलांबद्दल एवढेच प्रेम होते तर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंवर टीका करणाऱ्या सुषमा अंधारे यांना पक्षाचे प्रवक्तेपद कसे दिले,' असा प्रश्न राज यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बिनशर्त पाठिंबा जाहीर केल्यानंतर राज यांनी प्रथमच शिवसेनेच्या व्यासपीठावरून ठाण्यात भाषण केले. ज्या भुजबळांनी बाळासाहेबांच्या अटकेची तयारी केली होती, त्यांच्याबरोबर मंत्रिमंडळात म ांडीला मांडी लावून का बसलात, तेव्हा लाज वाटत नाही. माझ्या वडिलांना अटक करणाऱ्या या माणसाबरोबर मी बसणार नाही, अशी भूमिका का नाही घेतली,' असा प्रश्न विचारून राज यांनी उद्धव यांना लक्ष्य केले.

## पाकिस्तानच्या व्हाट्सअ‍ॅप ग्रुपसोबत तरूणाचा संबंध

✔ **नांदेड** : पाकिस्तानमधील एका व्हाट्सऍप ग्रुपसोबत कनेक्ट राहिल्याप्रकरणी नांदेड जिल्ह्यातील संशयित तरुणाला गुजरात राज्यातील सुरत येथील पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. शेख शकिल शेख सत्तार (१९) असं या तरुणाचं नाव असून तो जिल्ह्यातील नायगाव तालुक्यातील नरसी येथील रहिवासी आहे. जैश बाबा राजपूत या व्हाट्सऍप ग्रुपवर सनातन संघाचे राष्ट्रीय अध्यक्षांसह काही पत्रकारांना जीवे मारण्यासंदर्भात चॅटिंग केल्याचा संशय आहे. याच संशयावरून गुजरातच्या तपास यंत्रणेकडून तरुणाला ताब्यात घेतल्याची माहिती आहे. गुजरात पोलिसांच्या या कारवाईने नांदेड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.



पाकिस्तान हा देश विघातक कृत्य करणारा देश म्हणून ओळखला जातो. पाकिस्तान येथील वकास आणि सरफराज हे दोघे जैश बाबा राजपूत नावाचा व्हॉट्सप ग्रुप चालवतात. या ग्रुपमध्ये गुजरातच्या सुरतमधील सोहेल टिमोल आणि बिहारमधील शहनाज हे दोघे सामील आहेत.

## चौथ्या टप्प्यात देशात ६३.०१% मतदान

✔ **मुंबई** : लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातील मतदान सोमवारी सायंकाळी ६ वाजल्यानंतर संपले. मतदानाच्या चौथ्या टप्प्यात आंध्र प्रदेश, म हाराष्ट्र, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि तेलंगणासह १० राज्यांतील लोकसभेच्या एकूण ९६ जागांवर मतदान झाले. निवडणूक आयोगाने सध्या सायंकाळी ५ वाजेपर्यंतच्या मतदानाची आकडेवारी जाहीर केली आहे. सायंकाळी ५ वाजेपर्यंत ६३.०१ टक्के मतदान झाले.

मतदानाच्या या चौथ्या टप्प्यात आंध्र प्रदेशातील लोकसभेच्या २५ जागांवर निवडणूक झाली. चौथ्या टप्प्यातील मतदानात बिहारच्या ५, जम्मू-काश्मीरच्या १, झारखंडच्या ४ आणि मध्य प्रदेशच्या ८ जागांचाही समावेश आहे. त्याचवेळी महाराष्ट्रातील ११, ओडिशाच्या ४, तेलंगणाच्या १७, उत्तर प्रदेशच्या १३ आणि पश्चिम बंगालच्या ८ लोकसभेच्या जागांवरही मतदान झाले. चौथ्या टप्प्यात १.९२ लाख मतदान केंद्रांवर १७.७ कोटींहून अधिक म तदार होते. त्यापैकी ८.९७ कोटी पुरुष आणि ८.७३ कोटी महिला मतदार आहेत.



निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक ७६.०२ टक्के मतदारांनी मतदान केले. पश्चिम बंगालमधील जम्मू काश्मीरमध्ये सर्वात कमी म्हणजे ३६.८८ टक्के मतदान झाले आहे. महाराष्ट्रातील ११ जागांसाठी सायंकाळी ६ वाजता मतदान संपले. सायंकाळी ५ वाजताच्या आकडेवारीनुसार या ११ जागांवर ५२.९३ टक्के मतदान झाले. चौथ्या टप्प्यानंतर महाराष्ट्रातील लोकसभेच्या उर्वरित १३ जागांसाठी २० मे रोजी म तदान होणार आहे.

चौथ्या टप्प्यात महाराष्ट्रातील ११ लोकसभा मतदार संघात म तदान पार पडले. यापैकी नंदूरबारम ध्ये सर्वाधिक ६०.६० टक्के नागरिकांनी मतदान केले, तर शिरुरमध्ये सर्वात कमी ४३.८९ टक्के मतदानाची नोंद झाली. याशिवाय जळगावमध्ये ५१.९८ टक्के, रावेरमध्ये ५५.३६ टक्के, औरंगाबादमध्ये ५४.०२ टक्के, मावळमध्ये ४६.०३ टक्के, पुण्यात ४४.९० टक्के, अहमदनगरमध्ये ५३.२७ टक्के, शिर्डीत ५५.२७ टक्के, बीडमध्ये ५८. २१ टक्के आणि जालनामध्ये ५८.८५ टक्के मतदान झाल्याचं बघायला मिळालं.

### महाराष्ट्रात ५२.९३ टक्के मतदानाचा अंदाज

#### कोणत्या राज्यात किती टक्के मतदान?

- पश्चिम बंगाल – ७६.०२%
- मध्य प्रदेश – ६९.११%
- झारखंड – ६४.३०%
- तेलंगाना – ६१.५६%
- आंध्र प्रदेश – ६८.२०%
- उत्तर प्रदेश – ५८.०२%
- ओडिशा – ६४.२३०%
- बिहार – ५५.९२%
- महाराष्ट्र – ५२.९३%
- जम्मू-कश्मीर – ३६.८८%

**महाराष्ट्रात ५२.४९ टक्के मतदान**

सोलापूर शहराच्या मध्यवर्ती भागात अत्याधुनिक प्रशस्त इमारतीमध्ये

अस्सल सोलापूरी ईडली आणि महाराष्ट्रीयन थाळीसाठी

सुधा® उपाहार गृह



दि. १६ मे २०२४ पासून आपल्या सेवेत रूजू...

नाष्टा : सकाळी ७ ते दु. ३.३०

जेवण : दुपारी १२ ते दु. ३.३०

वातानुकुलित पार्टी हॉल

हॉटेल यतिराज शेजारी, मोदी, रेल्वे स्टेशन रोड, सोलापूर.

आर्यन क्रिएशन


# हट्ट मान्य होईल?

अंथरूण पाहून पाय पसरावे, असा एक सृष्टीचा नियम सांगितला जातो. पण तो पाळतो कोण. पांघरूण फाटले तरी चालेल. पण पाय पसरावेचेच. हा मानवी स्वभाव. समाजाच्या विविध घटकांमध्ये अशी माणसे सर्रासपणे दिसून येतात. त्यात राजकारणी लोक मागे कसे असतील? लोकसभा निवडणुकीत काँग्रेस-उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांची महाविकास आघाडी झाली. आघाडीचा झेंड्याखाली तियांनीही एकत्रित निवडणुका लढवल्या. विधानसभेला काय होणार हे ब्रह्मदेवच जाणे. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर तीनही पक्षांमध्ये जागा वाटपावरून ताणाताणी झाली. विशेष करून काँग्रेस आणि उद्धव यांच्यात काही जागा देण्या-घेण्यावरून वादही झाला. लोकसभा निवडणुकीचा फैसला व्हायचा आहे. तीनही पक्षांचे भवितव्य ठरायचे आहे. अशातच काँग्रेसने उद्धव ठाकरे यांच्याविरोधात दंड थोपटून नव्वा वादाला तोंड फोडले. कोकण पदवीधर मतदारसंघासाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. या मतदारसंघासाठी शिवसेना ठाकरे गटाने महाविकास आघाडीकडून यापूर्वीच मोर्चेबांधणी सुरू केली आहे. मात्र, आता काँग्रेसनेही या मतदारसंघावर दावा सांगितल्याने आघाडीत जागा वाटपाचा तिढा निर्माण होण्याची चिन्ह दिसू लागली आहेत. भाजपच्या निरंजन डावखरे यांचा कार्यकाळ संपल्याने विधान परिषदेच्या कोकण पदवीधर मतदारसंघासाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. सलग दोन वेळा डावखरे या मतदारसंघातून निवडून आले आहेत. पहिल्यांदा राष्ट्रवादी काँग्रेसकडून तर दुसऱ्यांदा भाजपकडून त्यांनी निवडणूक लढवली होती. आता तिसऱ्यांदा महायुतीचे उमेदवार म्हणून ते ही निवडणूक लढविणार आहेत. दरम्यान शिवसेनेने गेल्या निवडणुकीपासून या मतदारसंघात बांधणी सुरू केली होती. भाजपशी फारकत घेऊन ठाण्याचे माजी महापौर संजय मोरे यांनी गेल्या वेळी निवडणूकही लढवली होती. चांगली मते मिळवण्यात ते यशस्वी झाले होते. त्यामुळे यावेळी पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गटाने आपला उमेदवार निवडणुकीत उतरविण्याचा निर्णय घेतला आहे. रायगडचे शिवसेना सहसंपर्क प्रमुख किशोर जैन यांना निवडणुकीची तयारी करण्याचे निर्देश पक्षाने दिले आहेत. मात्र, आता या मतदारसंघातून काँग्रेसला उमेदवारी मिळावी, अशी मागणी समोर आली आहे. रायगड धून काँग्रेसचे प्रदेश सचिव ॲड. प्रविण ठाकूर यांनी पक्षाकडे उमेदवारी मागितली आहे. रत्नागिरीतून मोठ्या प्रमाणात मतदार नोंदणी केली असल्याचा रमेश कीर हे देखील या मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची तयारी करत आहेत. ही बाब लक्षात घेऊन पक्षाने कोकण पदवीधर मतदारसंघासाठी पक्ष समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने रायगड आणि रत्नागिरी सिंधुदुर्ग मतदारसंघात उमेदवार दिला नव्हता. महायुतीकडून या दोन्ही जागा शिवसेना ठाकरे गटासाठी सोडण्यात आल्या होत्या. या बदल्यात कोकण पदवीधर मतदारसंघावरचा दावा शिवसेनेने सोडावा आणि हा मतदारसंघ काँग्रेससाठी सोडण्यात यावा, अशी मागणी काँग्रेस पदाधिकाऱ्यांकडून केली जाऊ लागली आहे. काँग्रेसने ही मागणी करून शिवसेनेला ललकारले आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालावरच सर्व पक्षांचे पुढचे राजकीय भवितव्य अवलंबून असणार आहे. कोण किती पाण्यात आहे. कुणाची ताकत किती आहे हे या निकालात पहायला मिळणार आहे. त्यावरच पुढच्या सर्व निवडणुकांमध्ये राजकीय पक्षांना रणनीती आखावी लागणार आहे. लोकसभा निवडणुकीत आघाडी काय किंवा महायुती काय. एकमेकांचे मित्र ठरले आहेत. मात्र, लोकसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर पुन्हा नव्याने कोण कुणाचा मित्र ठरेल किंवा शत्रू बनेल हे सांगता येत नाही. लोकसभा निवडणुकीत मदत केली म्हणून कोकण मतदार संघात लागलीच सहकार्य मागण्याचा हा उद्धव यांच्याकडून पुरवला जाईल काय हा खरा प्रश्न आहे. आघाडीत तीनही पक्षांची एकी होती तेव्हा आम्ही सहकार्य केलो हे म्हणणे व्यवहार्य ठरते काय हा मुद्दा खरा प्रश्न आहे. उद्धव यांचा स्वभाव पाहाता ते काँग्रेसला भीक लागतील, असे वाटत नाही. कोकणात शिवसेनेची ताकत आहे. आता फूट पडल्यामुळे शिंदेगट आणि ठाकरे गट यांची ताकत लोकसभेच्या निकालात दिसून येणार आहे. शिंदे गट वरचढ ठरला तर उद्धव यांचेही काहीच चालणार नाही. कारण शिंदे गट व भाजपा एकमेकांना सहकार्य करतील. बत्यात अजितदादा महायुतीत राहिले तर त्यांचीही ताकत मिळायला लागेल. तेव्हा काँग्रेसने पहिल्यांदा अंथरूण पहावे मगच पाय पसरायला सुरूवात करावी ही माफक अपेक्षा.



सामाजिक

# हत्येचे भांडवल केले गेले का?



बहुचर्चित डॉ. दाभोलकर हत्याकांडाचा निकाल अखेर लागला. यामध्ये २ आरोपींना जन्मठेपेसह ५ लाख रुपये दंडाची शिक्षा झाली तर तिघांना पुराव्याअभावी निर्दोष सोडण्यात आले. या निकालाबाबत दोन्ही पक्षांनी समाधान व्यक्त केले असले, तरी दोन्ही पक्ष पुढील न्यायालयात दाद मागण्यासाठी जाणार आहेत. या सर्वात अधिक चर्चा झाली ती तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या वादग्रस्त विधानाची. पुण्यातून दाभोलकरांच्या हत्येची बातमी कानी येताच काही मिनिटांच्या आत तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी कोल्हापुरात समस्त माध्यमांसमोर या खुनामागे गोडसेवादी विचारसरणीचा हात असल्याचे विधान करून तपास कोणत्या दिशेने करायला हवा याचा मार्गच तपास यंत्रणांना जणू दाखवून दिला. मुख्यमंत्र्यांच्या विधानानंतर दाभोलकर परिवारानेही यावर री ओढली.

परिणामी या तपासात पुढे हिंदुत्ववादी संघटनांना गोवण्याचा प्रयत्न झाला, संघटनांच्या कार्यकर्त्यांच्या चौकश्या करण्यात आल्या. त्यांच्या कार्यालयांवर धाडी टाकण्यात आल्या. ज्यामध्ये सनातन संस्थेचे नाव सर्वात पुढे आले. डॉ. दाभोलकर आणि सनातन यांचे वैचारिक मतभेद होते. यातूनच ही हत्या झाल्याचे कारण तपास यंत्रणांनी समोर केले आणि त्या दिशेने तपास झाल्याचे मत सनातन संस्थेने पत्रकार परिषद घेऊन व्यक्त केले आहे. दाभोलकरांच्या हत्या प्रकरणात तपास एकांगी झाल्यानेच आज सत्य समोर येऊन सनातनच्या एका साधकांसह अन्य दोन हिंदुत्ववाद्यांची मुक्तता झाली आणि खरे मारेकरी तपास यंत्रणांपासून दूरच राहिले.

दाभोलकरांच्या रूपाने एक विज्ञानवादी विचारवंत समाजाने गमावला आहे, दाभोलकर परिवारावर त्यावेळी दुःखाचा डोंगर कोसळला होता. त्यामुळे आज ११ वर्षांनंतर आलेल्या निकालानंतरही सामाजिक भावना दाभोलकर परिवाराच्या बाजूने आहेत; मात्र एव्हढ्या प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्वाच्या हत्येचा तपास चुकिच्या दिशेने केल्याचे दुःखसुध्दा समाजाला आहेच. या निकालानंतर माजी मुख्यमंत्र्यांना त्यांनी केलेल्या वक्तव्याबाबत माध्यमांनी विचारणा केली असता त्यांनी आजही आपल्या वक्तव्यावर ठाम असल्याचे सांगितले याचे खरेतर आश्चर्य वाटते. त्यांच्या विधानामुळे एका महत्त्वाच्या गुन्ह्यातील तपासाची दिशा भरकटली. तीन आरोपी निर्दोष सुटले या बाबींकडे दुर्लक्ष करून कसे चालेल.

डॉ. दाभोलकर हत्येचा निकाल आल्यानंतर सनातन संस्थेने पत्रकार परिषद घेऊन आलेल्या निकालाचे स्वागत केले आणि काही प्रश्न उपस्थित करताना फिर्यादी पक्षांवर आरोपही केले, ज्याची उत्तरे समाजाला मिळायला हवीत अशीही त्यांनी मागणी केली. दाभोलकरांची हत्या झाली त्याच दिवशी मुंब्र्यातून खंडेलवाल आणि नागोरी या दोघांना एका खंडणीच्या प्रकरणात अटक करण्यात आली. त्यांच्याकडे जे पिस्तूल सापडले त्याच पिस्तुलातून डॉ. दाभोलकर यांच्यावर गोळ्या झाडल्याचे बॅलेस्टिक अहवालातून स्पष्ट झाले असताना तपास त्या दिशेने का झाला नाही? या प्रकरणात डॉ. वीरेंद्रसिंह तावडे यांना अटक झाल्यानंतर डॉ. तावडे हेच या हत्या प्रकरणात मास्टर माईंड असल्याचा प्रचार दाभोलकर परिवारासह अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केला. त्यांनी सनातन संस्थेचे साधक अकोलकर आणि पवार यांची छायाचित्रे असलेले पोस्टर्स ठिकठिकाणी लावले ज्यावर डॉ. तावडे यांच्या सांगण्यानुसार सनातन संस्थेचे अकोलकर आणि पवार यांनी डॉ. दाभोलकरांची हत्या केली असा मजकूर लिहिण्यात आला होता.

आज डॉ. तावडे यांची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे आणि सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे मग सनातन विरोधी पोस्टरबाजी करून दाभोलकर परिवार आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीने जाणीवपूर्वक सनातन संस्थेची बदनामी का केली? डॉ. तावडे यांना अटक झाल्यावर तेच या हत्येचे मास्टर माईंड असल्याचा प्रचार करणारा दाभोलकर परिवार गेल्या काही वर्षांपासून हत्येमागील मास्टर माईंड अद्याप बाहेर असल्याचा प्रचार करत आहे.

सीबीआयने आपला तपास पूर्ण करून चार्जशीट फाईल केल्यानंतरही हत्येमागील मास्टर माईंड पकडला गेला नसल्याचे एकच कारण सांगत मागील आठ वर्षांपासून या हत्या प्रकरणाचा निकाल थांबवून ठेवल्याचा आरोपही या प्रकरणातील आरोपींच्या वकिलांकडून केला गेला. या हत्येचा तपास जलदगतीने करण्याची मागणी आरोपींकडून केली जात होती आणि दाभोलकर परिवार यामध्ये वेळकाढूपणा करत असल्याचेही वकिलांनी यावेळी सांगितले. याशिवाय न्यायालयात सादर करण्यात आलेल्या एका साक्षीदाराची दाभोलकर परिवाराने घरी जाऊन भेट घेतली, सुनावणीच्या वेळी साक्षीदार अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांसोबत जेवायला बसत, असे गंभीर आरोपही या पत्रकार परिषदेतून करण्यात आले.

डॉ. तावडे यांच्या विरोधात साक्ष देण्यासाठी ज्या साक्षीदाराला उभे करण्यात आले होते त्या साक्षीदारावर कोल्हापुरातील महालक्ष्मी मंदिरातील ६०० किलो चांदीचा अपहार केल्याचा आरोप आहे. हे प्रकरण डॉ. तावडे यांनीच हिंदू जनजागृती समितीच्या अंतर्गत कार्य करताना उजेडात आणले होते. हे पुढे न्यायालयातही सिद्ध झाले.

सनातन संस्थेच्या विक्रम भावे यांना डॉ. दाभोलकरांच्या हत्येआधी घटनास्थळाची रेकी केल्याचा आरोपाखाली अटक करण्यात आली होती; मात्र हा आरोपही न्यायालयात सिद्ध होऊ शकला नाही. याच प्रकरणात वापरण्यात आलेले शस्त्र नष्ट करण्याचा सल्ला दिल्याचा आरोप करण्यात आलेले अधिवक्ता संजीव पुनाळेकर हे हिंदुत्ववाद्यांचे खटले लढतात म्हणूनच त्यांना गोवण्यात आल्याचा आरोप सनातनने यावेळी केला. पुनाळेकर यांच्यावर लावलेले आरोपही न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. विक्रम भावे पुनाळेकर यांना त्यांच्या कामात साहाय्य करत असल्याने त्यांनी पुनाळेकर यांच्या विरोधात खोटी साक्ष द्यावी यासाठी तपास अधिकाऱ्यांनी भावे यांच्यावर दबाव टाकण्यात आल्याचेही भावे याने स्पष्ट केले आहे.

**- जगन घाणेकर, मुंबई.**

> **एका सामाजिक विचारवंताचा दिवसा ढवळ्या खून होतो ही सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर बाब आहे; मात्र त्या घटनेचे भांडवल करून प्रत्यक्ष मुख्यमंत्र्यांकडून राजकीय स्वार्थासाठी तपासाची दिशा भरकटवली जाणे, हिंदुत्ववादी संघटनानांना टार्गेट करणे, त्यांची बदनामी करणे, चौकशीच्या नावाने संघटनांच्या कार्यकर्त्यांचा छळ करणे, त्यांच्यावर दहशतवादाचे आरोप करणे, 'भगवा दहशतवादा'ची दवंडी पिटणे, फिर्यादींकडून तपास यंत्रणांची दिशाभूल केली जाणे, तपासात वेळकाढूपणा करणे, खोटे साक्षीदार उभे करणे या सर्व बाबी अत्यंत गंभीर आहेत. एखादी संघटना नावारूपाला येण्यासाठी त्या संघटनेतील सक्रिय कार्यकर्त्यांना भरपूर परिश्रम घ्यावे लागतात; मात्र अशा काही प्रकरणामध्ये जेव्हा त्या संघटनेचे नाव घेतले जाते तेव्हा हे सारे परिश्रम मातीमोल ठरतात. कालांतराने तिचे निर्दोषत्व जरी सिध्द झाले तरी झालेली बदनामी ही कधीच भरून काढता येत नाही. डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणातही हेच झाले आहे. सनातन संस्थेचे निर्दोषत्व आज जरी सिध्द झाले असले तरी या संपूर्ण प्रकरणात संस्थेची झालेली बदनामी कशी आणि कोण भरून काढणार? असा सवाल यानिमित्ताने सनातन संस्थेने उपस्थित केला आहे. या सर्वांमागे शहरी नक्षलवादाचा हात असण्याची शक्यताही यावेळी सनातन संस्थेच्या प्रवक्त्यांनी बोलून दाखवली असून येणाऱ्या काळात शहरी नक्षलवादाची पाळेमुळे खणून काढण्याचे मोठे आव्हान तपास यंत्रणांसमोर असणार आहे.**

टुडेज् ब्लॉग

# खऱ्या मैत्रीचे वास्तव...

जगातील कोणत्याही भाषेतील चित्रपट असो त्यात मित्रांची कथा असतेच असते. जिवाभावाचे, एकमेकांसाठी प्राण देण्यास तयार असणारे मित्र केवळ चित्रपटातच दाखवतात असे नाही तर वास्तव जीवनातही अशा मित्रांचे दर्शन आपल्याला वेळोवेळी घडत असते. आपलेही असे काही अत्यंत जिवलग मित्र असतात जे संकटकाळी आपल्यासाठी उभे राहाण्यास एका पायावर तयार असतात. काही जणांना पाठीत वार करणाऱ्या मित्रांचाही अनुभव आलेला असतोच.

असो आज काही जागतिक मैत्री दिन नाही त्यामुळे मैत्रीचा गाथा सांगणारा निबंध कशाला असा प्रश्न हे वाचताना तुम्हाला नक्कीच पडला असेल. त्याचे उत्तर थोडे फार शीर्षकात मिळाले असेलच. अनेकदा चित्रपट समाजातील वास्तव समोर आणतात, समाजातील वाईट गोष्टी समोर आणतात. चित्रपटात समाजातील एखादी गोष्ट प्रखरपणे मांडली की सरकार जागे होते आणि त्या गोष्टींकडे काळजीपूर्वक लक्ष देऊ लागते.

फेब्रुवारी २०२४ मध्ये केरळमध्ये मल्याळम भाषेतील एक चित्रपट प्रदर्शित झाला होता. फक्त २० कोटी रुपयांमध्ये तयार झालेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर २५० कोटींच्या आसपास गल्ला गोळा केला आहे. २०२४ मध्ये देशभरात प्रदर्शित झालेल्या सर्व चित्रपटांमध्ये सगळ्यात जास्त कमाई करणारा हा चित्रपट ठरला आहे. बरे या चित्रपटात



कोणी मोठे स्टार, तडक भडक गाणी, ॲक्शनचा भडिमार असे काही नाही, तरीही या चित्रपटाने दक्षिण भारतातील सिंगल स्क्रीनला झळाळी मिळवून दिली.

हा चित्रपट रिलीज झाल्यानंतर तामिळनाडू सरकारला जाग आली आणि १८ वर्षांपूर्वी कोडाईकॅनॉलमध्ये झालेल्या एका दुर्घटनेप्रकरणी चौकशीचे आदेश देऊन तत्कालीन दोषी पोलिसांवर कारवाई करण्याचे आदेश दिले. ही आहे चित्रपट माध्यमाची ताकद. आता तुम्ही म्हणाल केरळमधील मल्याळम भाषेतील चित्रपट मात्र त्यावर तामिळनाडू सरकार कसे जागे झाले आणि त्यांनी चौकशीचे आदेश का दिले आणि दुसरे म्हणजे मैत्री आणि या सरकारच्या चौकशीच्या आदेशाचा संबंध काय?

संबंध खूप जवळचा आहे. २००६ मध्ये केरळच्या कोच्चीतील काही तरुण मित्र ओनमची सुट्टी असल्याने पिकनिकला जाण्याचा विचार करतात. सुरुवातीला ते गोव्याची निवड करतात परंतु काही कारणास्तव त्यांचा तो बेत रद्द होतो आणि ते तामिळनाडूच्या कोडाईकॅनॉलमध्ये येतात. कमल हसनच्या चित्रपटातील गुना चित्रपटातील एक गाणे कोडाईकॅनॉल येथेच चित्रित केलेले असते. हे गाणे ज्या ठिकाणी चित्रित केलेले असते तो भाग गुना केव्हज म्हणून ओळखला जात असतो.

हे मित्र कोडाईकॅनॉलमध्ये आल्यानंतर गुना केव्हज पाहायला जातात. तेथे येत असताना अत्यंत चिंचोळ्या अशा १२० ते १३० फूट खोल खड्ड्यात एक मित्र पडतो. अत्यंत आनंदात आणि मजा करण्याच्या विचाराने आलेल्या या मित्रांना त्यामुळे धक्का बसतो. ते स्थानिकांशी संपर्क करून मित्राला त्या चिंचोळ्या खड्ड्यातून काढण्यासाठी मदत करावी अशी विनंती करतात. मात्र ती जागा डेव्हिल्स किचन नावाने ओळखली जाते आणि तेथे कोणीही जिवंत राहत नाही. काही जण हत्या करून तेथे मृतदेह फेकतात, त्यामुळे मित्र मेला असेल तुम्ही परत जा असे स्थानिक सांगतात. मदतीसाठी पोलिसांकडे गेलेल्या मित्रांना पोलीस मदत करण्याऐवजी दमदाटी करतात, मारहाण करतात आणि त्यांनी मित्राची हत्या केल्याचा आरोपही करतात. मात्र, सगळे मित्र खड्ड्यात पडलेल्या मित्राला बाहेर काढण्यावर ठाम असतात. ते सतत मित्राला हाका मारत असतात, आणि त्यांना मित्राचा आवाज ऐकू येतो. सगळे जण आनंदी होतात आणि मित्राला बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू करतात. त्यांचे त्या मित्राला सुखरूप बाहेर काढण्याचा प्रयत्न म्हणजे हा मंजुमल बॉईज चित्रपट. पोलीस किंवा दुसरे कोणीही त्या खड्ड्यात उतरायला तयार नसताना मित्रामधील एक त्या खड्ड्यात उतरण्याची तयारी दर्शवतो, खड्ड्यात उतरतो आणि मित्राला घेऊनच बाहेर येतो. मित्र एकमेकांसाठी कसे जीव देण्यास तयार असतात ते या चित्रपटात दाखवण्यात आलेले आहे. जे वास्तवातील घटनेचे चित्रण आहे. शेवटी त्या मित्राला खड्ड्यातून बाहेर काढतात आणि सगळे मित्र घर परततात.

या चित्रपटात पोलिसांचे कठोर वर्तन दाखवल्याने तामिळनाडू सरकार जागे झाले आणि त्या मित्रांना मदत न करणाऱ्या त्या वेळच्या पोलीस अधिकाऱ्यांची आता चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश दिले. यावरूनच हा चित्रपट किती परिणामकारक झाला आहे याची जाणीव होते.

**- चंद्रकांत शिंदे.**

जन्म हा अखेरचा

# क्रीडाप्रकाशस्थल



लोखंडाचा तुकडा जर अग्नीत टाकला तर अग्नीच्या संपर्काने तो अग्निरुपच होतो. पाहणाऱ्याला तो विस्तव आहे असेच वाटते. त्याच्या ठिकाणी विस्तवाचा गुणदेखील उतरतो. त्याला हात लावताच हात पोळतो. लोखंडी तुकडा अग्नीत विलीन झाल्यामुळे असे घडते. त्याने आपले अस्तित्त्व अग्नीत समर्पित केलेले असते. याप्रमाणे शिवयोगी आपली चित्तवृत्ती परशिव ब्रह्मात समर्पित करतो. त्याची आत्मानुसंधानाची जी क्रिया असते, तिलाच क्रियाशक्ती असे म्हणतात. ती परशिवाप्रमाणे तेजोरुप असते. शिवयोगी क्रियाशक्तीने परशिवाची उपासना करीत असतो. म्हणून शिवयोग्याची क्रिया सामान्य नसते. अशा शिवयोग्याची स्थिती कशी असते हे पुढील श्लोकात सांगितले आहे.

**सर्वज्ञः सर्वकर्ता च सर्वगः परमेश्वरः ।**
**तदैक्यचिन्तया योगी तादृशात्मा प्रकाशते ।।१९.७९।।**

परशिव सर्वज्ञ आहे, सर्वकर्ता आहे आणि सर्वत्र व्यापून राहिलेला आहे. अशा परशिवाचे चिंतन करता करता शिवयोगी त्याच्याशी तादात्म्य पावतो. परशिवाशी तादात्म्य साधल्यामुळे त्याच्या ठिकाणी परशिवाची सर्वज्ञत्त्व, सर्वकर्तृत्व आणि सर्वव्यापकत्व हे गुण प्रविष्ठ होतात. सामान्य मनुष्य जे करु शकत नाही ते असामान्य योगी करतो ते यामुळेच. आकाशगमन, परकायाप्रवेश इत्यादी सिद्धी त्याला प्राप्त होतात. सर्व सिद्धिसामर्थ्य परशिवाजवळ असते. त्याच्याशी समरसता साधल्यावर ते सामर्थ्य शिवयोग्याला प्राप्त होते. व्यवहारात आपण पाहतो की, एखाद्या अधिकारी पुरुषाच्या जवळ जो मनुष्य राहतो तोदेखील अधिकाराचा वापर करीत असतो. त्याने दिलेल्या आज्ञा लोकांना पाळाव्या लागतात. वास्तविक त्याला तसा अधिकार नसतो, परंतु अधिकारी व्यक्तीच्या सानिध्यामुळे तो थोडाफार अधिकार गाजवत असतो. ही सामान्य व्यवहारातली गोष्ट आहे. शिवयोगी तर प्रत्यक्ष परशिवाशी एकरुप झालेला असतो.

**(क्रमशः) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# खिचडी राजकारणांमुळे मतदार राजा दुरावला

यंदा लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सात टप्यात मतदान प्रक्रिया संपन्न होते आहे नुकताच चौथा टप्यातील मतदान पार पडले आहे याची जर एकूणचं टक्केवारी पाहिली तर नेहमीचं ६० ते ६५ च्या आसपास असते मतदानाचा टक्का वाढावा म्हणून भारत सरकारच्या निवडणूक आयोगाने हरतऱ्हेचे प्रयत्न आणि कोट्यवधी रुपयांचा चुराडा करुन देखील आहे तिचं मतदानाची टक्केवारी राहिल्याचे दिसून येते वास्तविक पाहता नोकरदार वर्ग पहिल्यांदा दांडी मारतो. सलग सुट्ट्यांमुळे सहल, पर्यटन स्थळे पाहण्यासाठी अथवा घरात राहणे पसंत करतात तसेच अनेक मतदारांचा असा ही एक ट्रेण्ड तयार झाला



आहे की, 'माझ्या एका मताने काय फरक पडतो? त्यामुळे असे म्हणणे आणि मतदान टाळणे हेच महागात पडत असून मतदान घटण्यासाठी मोठा अडसर ठरत आहे. गेल्या काही दिवसांपासून भारतीय निवडणूका वेगळे वळण घेतल्या असून राजकारणाची खिचडी झाली आहे विविध राजकीय पक्षांचे नेते, पक्षप्रमुख, कार्यकर्ते राजकीय फायद्यासाठी कोलांट्या उड्या मारत आहेत. निवडून दिलेली व्यक्तींचं दलबदलू झाली आहे. त्यामुळे भारतीय निवडणुकांवरील विश्वास कमी होऊन मतदार राजा उदासीन होऊन मतदानापासून दुरावला जात आहे. मतदानाबद्दल आस्था राहिलेली नाही. दुर्गम, डोंगराळ कमी मतदानाचा भाग असो अथवा अन्य मार्गांनी मतदानाची सोय केलेली असली तरी एकूणच मतदानाचा टक्का वाढलेला नाही. राजकारणाची प्रतिमा सुधारली पाहिजे, कडक निर्बंध लादले पाहिजेत तरच मतदानाचा टक्का वाढण्यास मदत होईल ! **- राजू जाधव, बेळगाव.**

# मतदान कर्मचाऱ्यांना सलाम!

लोकशाहीचा उत्सव म्हणून आपण सारे जण सार्वत्रिक निवडणुकांकडे पाहत असतो. स्थानिक स्वराज्य संस्थांपासून ते लोकसभेची निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याचे काम शासनाच्या विविध विभागातील कर्मचारी चोखपणे करत असतात. निवडणूक प्रक्रिया यशस्वी करणारे बूथ पातळीवर काम करणारे शिक्षक, शासनाच्या विविध विभागातील कर्मचारी ते जिल्हाधिकाऱ्यापर्यंतचे सर्व अधिकारी सारेच कौतुकास पात्र ठरतात. निवडणुकांचा कार्यक्रम घोषित झाल्यानंतर दोन ते तीन टप्प्यात प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात. प्रत्यक्ष ईव्हीएम हाताळण्याचे आणि इतर माहितीचे संकलन करण्याचे प्रशिक्षण मिळाल्यानंतर हे सर्वजण निवडणूक आयोगाचे तात्पुरते कर्मचारी होतात. प्रत्यक्ष निवडणुकीच्या आदल्या दिवशी मिळेल त्या गाव, वाड्या, वस्त्यावर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ते बूथची उभारणी करतात. गाव पातळीवर ग्रामसेवक, तलाठी, पोलीस पाटील व इतर कर्मचारी त्यांना सहकार्य करतात. वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत असणारे, एकमेकास यापूर्वी कधीही न भेटलेले हे कर्मचारी संघभावनेने काम करतात. प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी सकाळी तीन ते चार वाजता उठून त्यांना आपल्या कामाला सुरुवात करावी लागते.

मतदान प्रतिनिधी समोर त्यांना 'मॉक पोल' घ्यावा लागतो. शाळेमध्ये विद्यार्थ्यांसमवेत हसत-खेळत, मोकळेपणाने आणि आनंददायी पद्धतीने काम करणाऱ्या शिक्षकांना तर प्रथमतःच प्रचंड दबावाखाली काम करण्याचा अनुभव मिळतो. पक्षीय राजकारणातून एकमेकांसमोर उभारलेल्या स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांमुळे त्यांची



काही काळासाठी घुसमट होते. पक्षपातीपणा केल्याचा आरोप केला जातो.

बोगस मतदान होण्याची, टांगती तलवार डोक्यावर घेऊन दिवसभर डोळ्यात तेल घालून काम करावं लागतं. अचानक उद्भवणाऱ्या परिस्थितीला शांत डोक्याने सामोरे जावे लागते. यावेळी तर काही ठिकाणी ईव्हीएम कुऱ्हाडीने फोडण्याचा व जाळण्याचा प्रयत्न झाला. या ठिकाणी सुद्धा कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी विचलित न होता पुढील मतदान प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली. अशाप्रकारे डोक्यावर बर्फ आणि तोंडात साखर ठेवून काम करून लोकशाही मधील आपली महत्त्वपूर्ण भूमिका ग्राउंड लेव्हल वर शिक्षक वर्ग अनेक वर्षापासून निभावत आहेत. प्रामाणिकपणे व निष्ठेने काम करणारा शिक्षक आज निवडणूक आयोगाच्या विश्वासास पात्र झाला आहे.

मतदान प्रक्रिया पार पाडून, सर्व साहित्य केंद्रावर जमा केल्यानंतर त्यांच्या चेहऱ्या वरील समाधान पाहण्यासारखे असते. देशाची लोकशाही व्यवस्था बळकट करण्यासाठी आपण देखील एक खारीचा वाटा उचलल्याची भावना त्याला मनोमनी सुखावत असते. त्याचा आत्मविश्वास वाढलेला असतो. पुढील वेळेस याच उर्जेने काम करण्याची शपथ घेऊन तो घरी पोहोचतो. या सर्व निवडणूक प्रक्रियेत काम करणाऱ्या विविध शासकिय विभागातील कर्मचाऱ्यांना व शिक्षकांना सलाम तर बनतोच!

**- किशोर जाधव, सोलापूर.**


सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## आयर्लंडकडून पराभवानंतर पाकवर टिकांचा वर्षाव




✔ **नवी दिल्ली** : नुकतेच पाकिस्तानी क्रिकेट संघाला आयर्लंडकडून ५ विकेट्सने पराभव पत्करावा लागला. टी २० विश्वचषक २०२४ तोंडावर असताना पाकिस्तानची ही कामगिरी बघून फक्त जगभरातूनच नाही तर स्वतःच्या देशातूनही टीका सहन करावी लागत आहे. पाकिस्तानचे माजी क्रिकेटपटू आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे माजी अध्यक्ष रमीझ राजा यांनी पाकिस्तानी संघावर जोरदार टीका केली आहे. ते म्हणाले, एका वर्षात पाकिस्तानी क्रिकेट संघाची वाईट अवस्था झाली आहे. असेच चालत राहिले तर विश्वचषकात अमेरिकेचा संघही पाकिस्तान संघाला पराभूत करेल, अशी टीका त्यांनी केली. गेल्या महिन्यात पाकिस्तान संघामध्ये अनेक बदल करण्यात आले. बाबर आझमला पुन्हा कर्णधार केले असून मर्यादित षटकांच्या फॉर्मेटमध्ये गॅरी कर्स्टनला संघाचे प्रशिक्षक बनवण्यात आले आहे. यानंतर रमीझ राजा यांनी यावर्षी होणाऱ्या टी २० विश्वचषक स्पर्धे साठी संघाच्या तयारीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. संघाचे संयोजनच योग्य नसताना पाकिस्तान विश्वचषक जिंकेल कसा? असा सवाल त्यांनी केला.

## टी-२० वर्ल्ड कपसाठी भारतीय संघाच्या जर्सीचे हटके लाँचिंग




✔ **धरमशाला** : येत्या १ जूनपासून टी-२० वर्ल्ड कप २०२४ स्पर्धेला सुरुवात होणार आहे. वेस्ट इंडिज आणि अमेरिका यांच्याकडे टी-२० वर्ल्ड कपचे संयुक्त यजमानपद आहे. टी-२० वर्ल्ड कप स्पर्धे साठी सर्व २० संघ पात्र ठरले आहेत. २१ मे रोजी भारतीय संघही अमेरिकेसाठी रवाना होणार आहे. मात्र, त्यापूर्वी भारतीय संघाच्या टी-२० वर्ल्ड कपच्या जर्सीचे लाँचिंग करण्यात आले आहे. भारतीय संघाच्या जर्सी लॉन्च केलेल्या व्हिडीओमध्ये एक हॅलिकॉप्टर टीम इंडियाची जर्सी घेऊन येताना दाखवण्यात आले आहे. तसेच, कर्णधार रोहित शर्मा आणि फिरकीपटू कुलदीप यादव आणि रवींद्र जडेजा हे वॉर्म अप करत असताना जर्स लटकवलेले हॅलिकॉप्टर येथे असल्याचे व्हिडीओमध्ये दाखवण्यात आले आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे.

## क्रिकेट खेळताना गुप्तांगाला बॉल लागून मुलाचा मृत्यू

✔ **पुणे** : महाराष्ट्रातील पुण्यात क्रिकेट खेळताना एका ११ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. पुण्यातील लोहेगाव येथे क्रिकेट खेळत असताना एका मुलाच्या गुप्तांगाला बॉल लागल्याने त्याचा मृत्यू झाला. मुलाच्या मृत्यूनंतर एकच खळबळ उडाली आहे. शौर्य उर्फ शंभू कालिदास खांडवे, असे मृत मुलाचे नाव आहे. ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. गुरुवारी हा अपघात झाला. रिपोर्टनुसार, शौर्य इतर मित्रांसोबत क्रिकेटचा सराव करत होता. मिळालेल्या माहितीनुसार, शौर्य बॉलिंग करत होता आणि एक मुलगा बॅटिंग करत होता. शौर्याने चेंडू टाकताच फलंदाजाने चेंडू थेट शौर्याच्या दिशेने आदळला आणि तो त्याच्या गुप्तांगाला जोरदार आदळला. काही वेळातच शौर्य जमिनीवर पडला. त्याला पडताना पाहून इतर खेळाडू आणि त्याचे मित्र त्याच्याकडे धावले. सुरुवातीला मित्रांना काही कळले नाही म्हणून त्यांनी इतर क्रिकेट खेळणाऱ्या मुलांना बोलावले. शौर्याला उचलून त्यांनी दवाखान्यात नेले पण उशीर झाला होता. शौर्य उर्फ शंभू याचा मृत्यू झाला. या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## वेस्टइंडीजमध्ये विश्वचषकादरम्यान दहशतवादी हल्ल्याचा धोका

✔ **नवी दिल्ली** : युनायटेड स्टेट्स आणि वेस्ट इंडिजमध्ये टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धा सुरु होण्यास जवळपास एक महिना बाकी असतानाच वेस्ट इंडिजला दहशतवादी हल्ल्यासंदर्भात धमकी मिळाली आहे. ही धमकी पाकिस्तानातून मिळाली असून क्रिकेट वेस्ट इंडिजने याप्रकरणी सुरक्षा व्यवस्था करण्यास सुरुवात केली आहे. तसेच आयसीसीला निवेदनाद्वारे यासंदर्भात माहिती दिली आहे दहशतवादी हल्ल्यासंदर्भात माहिती देतना त्रिनिदादचे पंतप्रधान कीथ रॉली म्हणाले की, आम्ही या धोक्याचा सामना करण्यासाठी सुरक्षा उपायांबाबत अतिरिक्त प्रयत्न करणार आहोत. कारण पुढील महिन्यात होणाऱ्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतासह २० संघ सहभागी होणार आहेत. काही प्राथमिक फेरीच्या सामन्यांव्यतिरिक्त, संपूर्ण सुपर ८ सामने, उपांत्य फेरी आणि अंतिम सामना वेस्ट इंडिजमध्ये खेळवला जाणार आहे. परंतु २१व्या शतकातही दहशतवादाचा धोका वेगवेगळ्या स्वरूपात जगाला कायम आहे आणि हे दुर्दैवी आहे, असे कीथ रॉली यांनी म्हटले. क्रिकेट वेस्ट इंडीज (उथख) चे मुख्य कार्यकारी अधिकारी जॉनी ग्रेव्हज यांनी म्हटले की, आम्ही सर्व भागिधारकांना आश्वस्त करू इच्छितो की, आयसीसी पुरुषांच्या टी-२० विश्वचषकात प्रत्येकाला सुरक्षा देणं हे आमचं पहिलं कर्तव्य आहे.

## लाइव्ह मॅचमध्ये विराट कोहलीने अंपायरशी घातला वाद,

✔ **बंगळुरू** : आयपीएल २०२४ मधील ६२वा सामना आरसीबी आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात एम. चिन्नास्वामी स्टेडियम बंगळुरु येथे पार पडला. या सामन्यात आरसीबीने दिल्लीचा ४७ धावांनी पराभव करत प्लेऑफ्सच्या आशा कायम ठेवल्या. या सामन्या दरम्यान विराट अंपायरशी वाद घातला. रविवारी झालेल्या आयपीएल सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने दिल्ली कॅपिटल्सचा ४७ धावांनी पराभव करून प्लेऑफ्सच्या आशा जिवंत ठेवल्या. या सामन्यादरम्यान रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा दिग्गज क्रिकेटपटू विराट कोहली अंपायरशी भिडला. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो अंपायरशी जोरदार वाद घालताना दिसत आहे. याआधीही विराट कोहलीला याच हंगामात अंपायरशी वाद घातल्याबद्दल मॅच फीच्या ५० टक्के दंड भरावा लागला आहे.

# आयपीएलचे यंदाचे पर्व ठरतेय रेकॉर्डब्रेक

## १६ वर्षांच्या हंगामात शंभर शतकांचा विक्रम



✔ **मुंबई** : यंदाच्या आयपीएलची चर्चा सर्वत्र होत आहे. त्याला कारणही तसेच आहे. यंदाच्या आयपीएलमध्ये अनेक संघांतील फलंदाज आणि गोलंदाज हे विविध विक्रम मोडताना पाहायला मिळत आहेत. तर महत्त्वाची बाब म्हणजे पाच वेळा विजेता राहिलेला मुंबईचा संघ यंदाच्या आयपीएलमध्ये सर्वात प्रथम बाहेर गेल्यानेही आयपीएल २०२४ सर्वांच्या चर्चे चा विषय ठरला आहे. पण खऱ्या अर्थाने हे पर्व फलंदाजासाठी रेकॉर्डब्रेक ठरत आहे, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. तर आता आयपीएलमधील १०० शतके पूर्ण झाली असून हा विक्रम गुजरातचा कर्णधार शुभमन गिल याच्या नावे नोंदवला गेला आहे.

आयपीएल २०२४ मध्ये शतकांचे शतक पूर्ण होण्याचा आणखी नवा विक्रम नोंदविण्यात आला आहे. हा विक्रम शुभमन गिल याने चेन्नई विरुद्ध खेळताना स्वतःच्या नावे केला आहे. शुक्रवारी आयपीएलच्या यंदाच्या पर्वातील ५९ सामना खेळला गेला. चेन्नई आणि गुजरात या दोन संघामध्ये हा सामना खेळला गेला आणि याच सामन्यात गिल याने १०४ धावांची उत्कृष्ट खेळी करत हा विक्रम स्वतःच्या नावे नोंदवला आहे. तर, गिलसोबतच त्याच्याच संघातील साई सुदर्शन यानेही १०३ धावांची शकती खेळी केली. पण गुजरात संघाचा कर्णधार असलेल्या शुभमन गिल याने आयपीएलम धील शतकांच्या शतकावर स्वतःचे नाव कोरले आहे. आयपीएल २०२४ मध्ये सर्वाधिक धावांचा विक्रमही रचला गेला आहे. सनरायजर्स हैदाराबादने २० षटकाम ध्ये तब्बल २८७ धावा केल्या. त्याआधी याच हंगामात हैदराबादनेच २७७ धावांचा विक्रम केला होता. त्यामुळे हैदराबाद संघानेच स्वतःचा विक्रम स्वतः मोडित काढला आहे. तर, याच पर्वामध्ये तब्बल चारवेळा २५० हून अधिक धावा झाल्या आहेत. आयपीएलच्या यंदाच्या हंगामात कमी सामन्यात एक हजारांहून अधिक षटकारांची देखील नोंद करण्यात आली आहे. आयपीएल २००८ ते आयपीएल २०२४ या १६ वर्षांच्या हंगाम ात शंभर शतकांचा विक्रम पूर्ण झाला आहे.

# रोहित वयाच्या पन्नाशीपर्यंत क्रिकेट खेळू शकतो

## युवराज सिंगच्या वडिलांचा दावा



✔ **मुंबई** : भारताचा तिन्ही फॉरमॅटम धील नियमित कर्णधार असलेला रोहित शर्मा आता ३७ वर्षांचा आहे. त्यामुळे आगामी टी-२० विश्वचषक हा रोहितचा अखेरचा वर्ल्डकप असल्याचे म्हटले जात आहे. पण यावर माजी अष्टपैलू खेळाडू युवराज सिंगचे वडील योगराज सिंग यांच म्हणणं वेगळं आहे, त्यांच्यामते रोहित शर्मा हा ५०वर्षांचा होईपर्यंत क्रिकेट खेळू शकतो, असे त्यांनी म्हटले आहे.

आयपीएल २०२४ च्या हंगामादरम्यान स्पोर्ट्स-१८ शी बोलताना युवराजचे वडील योगराज सिंग म्हणाले, वय ही फक्त एक संख्या आहे, जी खेळाडू किती वर्षांचा आहे हे दर्शवते. पण मला हे समजत नाही की जर एखादा खेळाडू ४०, ४२ किंवा ४५ व्या वर्षीही तंदुरुस्त असेल आणि चांगली कामगिरी करत असेल तर त्यात चुकीचे काय आहे. आपल्या देशात लोकांचा असा विश्वास आहे की तुम्ही ४० वर्षांचे झाले की म्हातारे होता. पण सत्य हे आहे की तुम्ही संपलेले नसता. पुढे सांगताना माजी क्रिकेटरचे उदाहरण देत योगराज सिंग म्हणाले, मोहिंदर अमरनाथ ३८ वर्षांचे असताना त्यांनी भारताला विश्वचषक जिंकून दिला. अंतिम सामन्यातही ते सामनावीर ठरले. त्यामुळे भारतीय क्रिकेटमध्ये वयाचा घटक काढून टाकला पाहिजे असे मला वाटते. रोहित आणि सेहवाग हे दोन महान खेळाडू आहेत ज्यांनी फिटनेस आणि ट्रेनिंगचा कधीच विचार केला नाही आणि त्यांना हवे असल्यास ते वयाच्या पन्नाशीपर्यंत क्रिकेट खेळू शकतात.

### रोहितची कामगिरी

रोहित शर्माने आतापर्यंत भारतासाठी आठ टी-२० विश्वचषक आणि तीन एकदिवसीय विश्वचषक खेळले आहेत. पण टीम इंडियाला त्यांच्या कार्यकाळात एकदाही आयसीसी ट्रॉफी जिंकता आलेली नाही. त्यामुळे, रोहित शर्माला आता जून महिन्यात वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषक २०२४ ची ट्रॉफी भारतासाठी जिंकून २०१३ पासून सुरू असलेला ट्रॉफीचा दुष्काळ संपवायचा आहे. रोहितने आतापर्यंत ५९ कसोटी सामन्यांमध्ये ४१३७ धावा, २६२ एकदिवसीय सामन्यांमध्ये १०,७०९ धावा आणि १५१ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ३९७४ धावा केल्या आहेत.

## झिम्बावेच्या शॉन विल्यम्सनची निवृत्ती

✔ **हरारे** : टी-२० वर्ल्ड कप २०२४ चा थरार १ जूनपासून रंगणार आहे. या मेगा टूर्नामेंटपूर्वी, झिम्बाब्वे क्रिकेट संघाला मोठा धक्का बसला आहे. कारण सीनियर अष्टपैलू शॉन विल्यम्सने टी-२० फॉरमॅटम धून अचानक निवृत्ती घेऊन सर्वांना आश्चर्यचकित केले आहे. ३% वर्षीय विल्यम्सने बांगलादेशविरुद्धच्या टी-२० मालिकेतील ५व्या सामन्यानंतर हा निर्णय घेतला. ज्याची माहिती ही झिम्बाब्वे क्रिकेट बोर्डाने दिली.

झिम्बाब्वे क्रिकेटने सांगितले की, सीन विल्यम्सने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. साम ना संपल्यानंतर त्याने आपला निर्णय आपल्या सहकाऱ्यांना सांगितला. शॉन विल्यम्सने टी-२० मध्ये असा विक्रम केला आहे, जो टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहली, महेंद्रसिंग धोनी आणि वेस्ट इंडिजचा स्टार सलामीवीर ख्रिस गेल यांनाही आतापर्यंत करता आलेला नाही. झिम्बाब्वेचा अष्टपैलू खेळाडू शॉन विल्यम्स हा सर्वात दीर्घ कालावधीसाठी म्हणजेच १७ वर्षे १६६ दिवस टी-२० आंतरराष्ट्रीय खेळणारा जगातील दुसरा क्रिकेटपटू आहे.

## बांगलादेशविरुद्धच्या टी-२० सामन्यात शेफालीने मोडला सचिन तेंडुलकरचा रेकॉर्ड




✔ **नवी दिल्ली** : भारतीय महिला क्रिकेट संघाची दमदार फलंदाज शेफाली वर्माने बांगलादेशविरुद्धच्या पाचव्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात एका विक्रमाची नोंद केली आहे. आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील आपला १००वा सामना खेळण्यासाठी शेफाली बांगलादेशविरुद्ध सिल्हेटमध्ये मैदानात उतरली होती. मैदानावर पाऊल ठेवताच तिने मास्टर-ब्लास्टर क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरचा ३० वर्षं जुना विक्रम मोडला.


बांगलादेशदेशविरुद्धखेळलागेलेलापाचवा टी-२० सामना शेफाली वर्माच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील १००वा सामना होता. भारतीय पुरुष क्रिकेट संघ आणि महिला क्रिकेट संघ यामध्ये १००वा आंतरराष्ट्रीय सामना खेळणारी शेफाली ही सर्वात तरुण खेळाडू ठरली. शेफाली वर्माने वयाच्या २० वर्षे १०२ दिवशी हा टप्पा गाठला. सचिन तेंडुलकरने वयाच्या २० वर्षे ३२९ दिवसांत १००वा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. शेफालीने वेस्ट इंडिजच्या शम ीन कॅम्पबेल हिलाही मागे टाकले. तिचे वय २१ वर्षे आणि १८ दिवस असताना १००वा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता.


**बांगलादेशला व्हाइटवॉश**

बांगलादेशमध्ये ५ सामन्यांची टी-२० मालिका झाली. भारतीय महिला क्रिकेट संघाने प्रभावी कामगिरी करत पाचही सामन्यांत बांगलादेशवर विजय मिळवला. या मालिकेत भारताकडून स्मृती मानधनाने ५ डावांमध्ये सर्वाधिक ११६ धावा केल्या. तर, राधा यादवने ५ डावांमध्ये १० विकेट्स घेतल्या आहेत. पाचव्या सामन्यात भारताने बांगलादेशसमोर १५% धावांचे आव्हान ठेवले होते. मात्र, भारतीय गोलंदाजांच्या भेदक माऱ्यासमोर बांगलादेशचे फलंदाज ढेपाळले. ६ विकेट्स गमावून बांगलादेशने १३५ धावा केल्या. राधा यादवने ३ विकेट्स घेतल्या.

## सूर्यकुमारच्या क्षमतेचा योग्य वापर करता आला नाही

### गौतम गंभिरने व्यक्त केली खंत






✔ **नवी दिल्ली** : सूर्यकुमार यादवच्या क्षमतेचा योग्य वापर न करता आल्याचा खेद आहेफसूर्यकुमर यादवच्या क्षमतेनुसार त्याचा सर्वोत्तम उपयोग मी करू शकलो नाही. त्याचे कारण संघाचे संयोजन होते, असे केकेआरचा माजी कर्णधार गौतम गंभिर याने म्हटले आहे.

गंभिर म्हणाला की, 'तुम्ही तिसऱ्या क्रम ांकावर केवळ एका खेळाडूला खेळवू शकता. एक कर्णधार म्हणून तुम्हाला प्लेइंग इलेव्हनम धील इतर १० खेळाडूंबद्दलही विचार करायचा असतो. तो तिसऱ्या क्रमांकावर अधिक प्रभावी ठरला असता, पण तो ७ व्या क्रमांकावरही चांगला खेळला.' गंभीरने पुढे असेही म्हटले की सूर्यकुमार एक टीम प्लेअर आहे. त्याला त्यामुळेच २०१५ मध्ये उपकर्णधारही बनवण्यात आले होते. गंभीर म्हणाला, 'तो एक टीम प्लेअरही होता. कोणीही एक चांगला खेळाडू बनू शकतो, पण एक टीम प्लेअर बनणे कठीण आहे.' 'त्याला तुम्ही ६ व्या किंवा ७ व्या क्रमांकावर खेळवा किंवा बेंचवर बसवा, तरी तो नेहमी हसतमुख असायचा आणि संघासाठी योगदान देण्यात नेहमीच तयार असायचा. म्हणूनच आम्ही त्याला उपकर्णधार म्हणूनही नियुक्त केले होते.

## कोहलीच्या आरसीबने आयपीएलमध्ये केला नवा विक्रम




✔ **नवी दिल्ली** : रविवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि दिल्ली कॅपिटल्समध्ये झालेल्या सामन्यात आरसीबीने दिल्लीचा ४७ धावांनी पराभव केला. याचसोबत आरसीबी हा आयपीएल २०२४मध्ये सलग ५ सामने जिंकणारा एकमेव संघ ठरला.

आरसीबीने पहिल्या ८ सामन्यांमध्ये १ विजय मिळवला होता. पण नंतर झालेल्या पाचही सामन्यांमध्ये आरसीबीने सलग विजय मिळवला. याचसोबत आरसीबी आता १३ सामन्यांमध्ये ६ विजयांसह पाचव्या स्थानी आली आहे. यामुळे सोशल मीडियावर विराट कोहलीच्या आरसीबीचे चांगलेच कौतुक होते आहे. कारण, काही दिवसांपूर्वी हाच संघ दहाव्या स्थानावर होता. ( २०२४ ) दरम्यान, आरसीबीच्या दिल्लीविरुद्धच्या विजयामुळे प्ले ऑफमध्ये जाण्याच्या आशा पल्लवित झालेल्या आहेत. १८ मेला बेंगळुरूचा चेन्नई सुपर किंग्ज विरुद्ध चिन्नास्वामी स्टेडियमवर शेवटचा सामना असेल. या सामन्यावर दोन्ही संघांचे भवितव्य अवलंबून असणार आहे. जर चेन्नई जिंकली तर आरसीबी प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडेल. पण जर बेंगळुरू जिंकली तर चांगल्या फरकाने जिंकावे लागेल. कारण, आरसीबीचा नेट रन रेट चेन्नईपेक्षा चांगला असेल. यानंतरही बंगळुरूला इतर संघांच्या निकालावर अवलंबून राहावे लागणार आहे.

# सलग तिसऱ्या पराभवानंतर संजू सॅमसन नाराज



✔ **मुंबई/प्रतिनिधी**

आयपीएलच्या १७व्या हंगामातील ६१वा सामना रविवारी चेपॉक स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात खेळला गेला. या सामन्यात चेन्नई घरच्या मैदानावर राजस्थानचा ५ विकेट्सनी पराभव करत प्लेऑफ्समध्ये पोहोचण्याचा दावा मजबूत केला. मात्र, राजस्थान रॉयल्सचा यंदाच्या हंगामातील हा सलग तिसरा पराभव आहे. संघाच्या सलग तीन पराभवानंतर कर्णधार संजू सॅमसन खूपच निराश दिसत होता. या पराभवासाठी त्याने फलंदाजांना जबाबदार धरले.

राजस्थान संघाने या हंगामात आतापर्यंत चार सामने गमावले आहेत. त्यात गुजरात टायटन्सविरुद्ध घरच्या मैदानावर फक्त एकच सामना हरला आहे. त्यानंतर आता विरोधी संघाच्या मैदानावर त्यांचा सलग तिसरा पराभव आहे. या पराभवानंतर कर्णधार संजू सॅमसन म्हणाला, मला वाटतं पॉवरप्लेनंतर विकेट संथ आणि दुहेरी होती. त्यामुळे पॉवरप्लेनंतर आम्हाला १७० धावांची अपेक्षा होती. मात्र, आम्ही २०-२५ धावा कमी केल्या. सिमरजीतने खरोखरच चांगली गोलंदाजी केली. विरोधी संघांच्या मैदानावर लागोपाठ तीन पराभवांबाबत सॅमसन म्हणाला, दुसऱ्या संघाच्या मैदानावरील सामन्यातून काय अपेक्षा ठेवाव्यात याची आम्हाला खात्री नव्हती. आम्हाला वाटले की प्रथम फलंदाजी करणे हा एक चांगला पर्याय आहे. इथे खेळायची सवय असल्याने सीएसकेला धावाचा पाठलाग कसा करायचा याची चांगली कल्पना होती, आम्हाला वाटले की दुसऱ्या डावात वेग कमी होईल, पण खेळपट्टी चांगली होती.

### संजू समॅसनचा सहकाऱ्यांना सल्ला

चेन्नईच्या हवामानाबाबत सॅमसन म्हणाला, तुम्ही रात्री खेळता तेव्हा दव असल्यामुळे पाठलाग करणे कठीण नसते. उन्हाळ्यात खेळपट्टी गरम होते त्यामुळे दुसऱ्या डावात खेळपट्टी संथी होईल, अशी मला अपेक्षा होती. प्लेऑफ्सबद्दल विचार करणे सामान्य आहे, आम्हाला आमच्या नियंत्रणात काय आहे, यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. मी माझ्या सहकाऱ्यांना सांगू इच्छितो की आपल्या हातात असलेल्या गोष्टींवर आपण लक्ष केंद्रित केले पाहिजे. प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे आणि पुढील सामना जिंकण्याची आशा आहे.

पान १ वरुन



## मुंबईत धुळीच्या वादळाचे तांडव!

बदलापूर परिसरात सोमवारी दुपारपासून वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे लोकांची चांगलीच तारांबळ उडाल्याचे पाहायला मिळाले.अंबरनाथ आणि बदलापूर भागात सोसायट्याच्या वाऱ्यासह गारादेखील पडल्या. त्यामुळे एकच गोंधळ उडाला. सलग तीन तास आकाशात काळोख पसरला होता. त्यामुळे भर दुपारी सायंकाळ झाल्याचा अनुभव आला.

राज्यात गेल्या ४ दिवसांपासून अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे मात्र उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला आहे. या पावसामुळे फळबागा आणि आंबा उत्पादक शेतकऱ्यांचं मोठे नुकसान झाले आहे. रायगडसह उत्तर मध्य महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांमध्ये अनेक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, गारपीट आणि सोसाट्याच्या वाऱ्याने लोकांची घाबरगुंडी उडवली.

### मुसळधार पावसाचा अंदाज

हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, राज्यात पुढील २४ तासात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, जळगाव या भागात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे, या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. यासोबतच, मुंबई, पालघरमध्येही पावसाच्या हलक्या सरी कोसळण्याचा अंदाजही हवामान खात्याने दिला आहे.

### महाकाय बॅनरखाली ७०-८० वाहनं अडकली

मुंबईतील घाटकोपर परिरसरात एक महाकाय बॅनर पेट्रोल पंपावरच कोसळले. बॅनरखाली तब्बल ७० ते ८० वाहने अडकली. येथील पेट्रोल पंपाखाली बाईक आणि रिक्षा चालक अडकले होते.गॅस कटरच्या माध्यमातून अग्निशमन दलाच्या जवानांनी त्यांना बाहेर काढले. त्या होर्डिंगला लायसन्स नसून मुंबई महापालिकेने नोटीस बजावून ऑब्जेक्शन घेतले होते. तसेच होर्डिंग दिसावे म्हणून याच हद्दीतील झाडावर विषप्रयोग केल्याने मुंबई महापालिकेने एफआयआरही केल्याचे स्पष्ट केले आहे. अनधिकृतपणे होर्डिंग लावल्याचाही आरोप मुंबई महापालिकेने केला आहे.


### उच्चस्तरीय चौकशीचे आदेश

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घाटकोपरच्या घटनास्थळी दाखल होत परिस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी या घटनेची उच्च स्तरीय चौकशी करण्याचे निर्देश दिले. ही घटना अतिशय दुर्दैवी आहे. या घटनेची माहिती मिळताच मी लगेच मुंबई महापालिकेतील आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तसेच बचावकार्य सुरू आहे. या घटनेत जखमी झालेल्यांना रुग्णालयात उपचाराकरिता दाखल करण्यात आले आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. पुढे बोलताना मुंबईतील सर्व होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे निर्देश आयुक्तांना दिले असल्याचे त्यांनी सांगितले.

### मृतांच्या कुटुंबियांना ५लाखांची मदत

दरम्यान, पुढे बोलताना त्यांनी या घटनेत मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबियांना राज्य सरकारद्वारे आर्थिक मदत देणार असल्याची माहिती दिली. या घटनेत जखमी झालेल्यांच्या उपचाराचा खर्च सरकार करणार असून या घटनेत ज्यांच्या मृत्यू झाला आहे, त्यांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री साहायता निधीतून पाच लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाईल, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, या घटनेनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना त्यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. घाटकोपर भागात होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत ६७ नागरिकांना बाहेर काढण्यात आले आहे.याप्रकरणी दोषी आढळल्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येईल, असे ते म्हणाले.





# ईव्हीएम-व्हीव्हीपॅट प्रकरण पुन्हा सर्वोच्च न्यायालयात



नवी दिल्ली/वृत्तसंस्था

**ईव्हीएम-व्हीव्हीपॅट प्रकरणातील निकालाला आव्हान देणारी पुनर्विचार याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. फेटाळण्यात आलेल्या याचिकांमध्ये व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल (व्हीव्हीपॅट) रेकॉर्डसह इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (ईव्हीएम) डेटाच्या १०० टक्के क्रॉस-व्हेरिफिकेशनची मागणी करण्यात आली होती.**

निकालात स्पष्ट झालेल्या त्रुटी असल्याचा दावा


अरुण कुमार अग्रवाल यांनी ही याचिका दाखल केली असून, निकालात स्पष्ट झालेल्या त्रुटी असल्याचा दावा केला आहे. अधिवक्ता नेहा राठी यांच्यामार्फत दाखल केलेल्या पुनर्विचार याचिकेनुसार, न्यायालयाच्या २६ एप्रिलच्या निकालात सिम्बॉल लोडिंग युनिट्स ची असुरक्षा आणि त्यांच्या लेखापरीक्षणाची आवश्यकता याकडे दुर्लक्ष करण्यात आले. अग्रवाल यांनी दावा केला की एसएलयूमध्ये आवश्यक प्रतिमेच्या पलीकडे अतिरिक्त डेटा असण्याची शक्यता न्यायालयाने दुर्लक्षित केली आहे. ईव्हीएम मतांशी जुळवून घेण्यासाठी मोजण्यात आलेल्या व्हीव्हीपॅट स्लिपची टक्केवारी ५ टक्के आहे, तर ती २ टक्क्यांपेक्षा कमी आहे, असे या निकालात चुकीचे नमूद करण्यात आले आहे. ईव्हीएम व्हीव्हीपॅट डेटाच्या १०० टक्के जुळणीमुळे मतदानाचा निकाल जाहीर होण्यास विलंब होईल, असा निर्धारही याचिकेत करण्यात आला.

इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन मतदारांना त्यांची मते अचूकपणे नोंदवली गेली आहेत याची पडताळणी करू देत नाहीत, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. शिवाय, त्यांचे स्वरूप पाहता, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे विशेषतः डिझाइनर, प्रोग्रामर, निर्माते, देखभाल तंत्रज्ञ इत्यादींच्या अंतर्गत दुर्भावनापूर्ण बदलांसाठी असुरक्षित असतात, असे याचिकेत म्हटले आहे.

तोंडी युक्तिवाद न करता न्यायाधीश त्यांच्या चेंबरमध्ये पुनर्विचार याचिका विचारात घेतात. सर्वोच्च न्यायालयाने २६ एप्रिल रोजी ईव्हीएमच्या साधेपणा, सुरक्षा आणि सोप्या वापरावर जोर देत व्हीव्हीपॅट सह ईव्हीएमवर टाकलेल्या मतांचे १०० टक्के क्रॉस-व्हेरिफिकेशन करण्याची मागणी करणाऱ्या अनेक याचिका फेटाळल्या होत्या. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि दीपंकर दत्ता यांनी त्यांच्या निकालात ईव्हीएमच्या विश्वासार्हतेचा दावा केला होता. तसेच मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांसाठी भारतीय निवडणूक आयोगाने केलेल्या सुरक्षा उपायांवर लक्ष वेधले होते.

## CBSE कडून परीक्षांच्या तारखा जाहीर

**नवी दिल्ली** : CBSE कडून शैक्षणिक सत्र २०२४-२५ साठी परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षा १५ फेब्रुवारी २०२५ पासून सुरू होतील. बोर्डाने दिलेल्या माहितीनुसार २०२५ च्या परीक्षा १५ फेब्रुवारी २०२५ पासून घेण्याचा निर्णय घेतल्या जाणार आहेत. उइडए चे परीक्षा नियंत्रक सन्यम भारद्वा यांनी याबाबत माहिती दिली आहे. चालू वर्षाच्या परीक्षा सुद्धा १५ फेब्रुवारीला सुरु झाल्या होत्या. दहावीची परीक्षा २८ दिवसांमध्ये, तर बारावीची परीक्षा ४७ दिवसांमध्ये संपली होती.




**यंदाच्या परीक्षेत मुलींच ठरल्या सरस**

दरम्यान, एक दिवसापूर्वीच उइडए ने दहावीचा निकाल जाहीर केला असून ९३.६० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मुलींनी मुलांपेक्षा २.०४ टक्के गुणांनी बाजी मारली आहे. ९४.७५ टक्के मुलींनी परीक्षा उत्तीर्ण केली आहे. ४%,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी ९५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. २.१२ लाख पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले आहेत.

**उत्तीर्णतेच्या टक्केवारीत ०.६५ टक्के वाढ**

१.३२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना 'कंपार्टमेंट'मध्ये ठेवण्यात आलं असून जे मागील वर्षाच्या तुलनेत किंचित मागे पडले आहेत. इयत्ता बारावी बोर्डाच्या परीक्षेचा निकाल सुद्धा उइडए ने जाहीर केला आहे. ८%.९८ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत उत्तीर्णतेच्या टक्केवारीत ०.६५ टक्के वाढ झाली आहे. एकूण १८,४१% शाळांनी ७,१२६ केंद्रांवर उइडए इयत्ता बारावीची परीक्षा घेतली, ज्यामध्ये त्रिवेंद्रम प्रदेशाने सर्वाधिक ९९.९१ टक्के गुण घेतले होते.

## निर्यातबंदी उठवून फायदा काय? बाजारपेठेत कांद्याच्या दरात वाढ नाहीच

नवी दिल्ली/वृत्तसंस्था



सध्या देशातील कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडलाय. कारण कांद्याच्या दरात सातत्यानं घसरण होत आहे. कांद्यावरील निर्यातबंदी संपून आज १० दिवस उलटले आहेत. तरीदेखील कांद्याच्या दरात वाढ झाली नाही. नेमकी दरात का वाढ झाली नाही? याची चर्चा देशभरात सुरु आहे.

**निर्यातबंदी हटवून १० दिवस झाले तरीही दर वाढले नाहीत**

केंद्र सरकारनं गेल्या पाच महिन्यापूर्वी म्हणजे ८ डिसेंबर २०२३ रोजी कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. ही बंदी ३१ मार्चपर्यंत असेल असं सरकारनं सांगितलं होतं. मात्र, मार्चमध्ये ही बंदी उठवली नाही. अखेर ३ मे रोजी सरकारनं कांद्याच्या निर्यातीवरील बंदी हटवली आहे. आज निर्यातबंदी हटवून जवळपास १० दिवस झाले तरीही देखील कांद्याचे दर जैसे थे आहेत. दरात नेमकी वाढ का होत नाही? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**अटी शर्तीमुळं कांद्याच्या दरात वाढ नाही**

दरम्यान, सरकारने निर्यातबंदी उठवली असली तरी बाजारात भाव वाढत नाहीत कारण, सरकारनं निर्यातबंदी हटवताना काही अटी घातल्या आहेत. त्यामुळे कांद्याची निर्यात होत नाही. याचा परिणाम दरांवर होत आहे. सरकारने कांद्यावर किमान निर्यात किंमत ५५० डॉलर प्रति टन निर्धारित केले आहे. त्यावर ४० टक्के निर्यात शुल्क आकारले आहे. इतका महाग कांदा कोण घेणार? त्यामुळं निर्यातबंदी हटवून देखील दरात वाढ होत नाही.

**बाजारांमध्ये कांद्याचा भाव १,२,३ आणि ४ रुपये प्रति किलो**

मिळालेल्या माहितीनुसार राज्यातील बहुतेक बाजारांमध्ये कांद्याचा किमान भाव अजूनही १,२,३ आणि ४ रुपये प्रति किलो आहे. तर सरासरी भाव हा १३ ते १५ रुपये प्रति किलो आहे. त्याचप्रमाणे कमाल किंमत १८ रुपये ते २५ रुपये आहे. पाच महिन्यांपासून कांदा निर्यातबंदी उठवूनही मंडईतील शेतमालाला भाव वाढला नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. सरकारने निर्यातबंदी उठवली असली तरी बाजारात भाव वाढत नाहीत अशा काही अटी घातल्या आहेत. त्यामुळे कांद्याची निर्यात होत नाही. घसरण झाल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिलीय.

**कोणत्या बाजारात कांद्याला किती दर?**

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे जिल्ह्यातील मंचर मंडईत कांद्याचा किमान भाव केवळ ३ रुपये प्रतिकिलो, राहाता बाजारात २ रुपये किलो होता. तसेच जुन्नर-नारायणगाव येथे किलोला चार रुपये दर मिळत आहे. तर सोलापूरच्या बाजारात कांद्याचा भाव केवळ १ ते २ रुपये किलो होता. सध्या मिळणारा दर हा उत्पादन खर्चपेक्षा कमी असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

## मुंबई पोलिसांना तिघांजवळ कोट्यवधीचं मेफेड्रोन सापडलं

### राजस्थानची लिंक मिळताच छापा टाकला अन् १०४ कोटींचा साठा जप्त

नवी दिल्ली/वृत्तसंस्था



**मुंबई पोलिसांनी तीन आरोपींच्या कॉल डिटेल्सच्या आधारावर पुण्यातील प्रशांत पाटील या व्यक्तीला ताब्यात घेतलं होतं. प्रशांत पाटीलकडे चौकशी केल्यानंतर जोधपूरच्या कारखान्याची माहिती मिळाली. प्रशांत पाटील यानं मुंबई पोलिसांना सांगितलं की जोधपूरमधील हुकूमराम चौधरी जोधपूरच्या सचिन कदमच्या सांगण्यावरुन औषधाची कंपनी चालवत होता. यानंतर पोलिसांनी मेफेड्रोन आणि त्याच्या निर्मितीसाठी लागणारा कच्चा माल जप्त केला. ज्याची किंमत १०४ कोटी रुपये आहे.**

मुंबई पोलिसांनी राजस्थानातील औषध निर्मितीच्या कंपनीचा भांडाफोड केलेला आहे. मेफेड्रोन आणि इतर औषध बनवण्यासाठी वापरल्या जाणारी रसायनं देखील जप्त करण्यात आली आहेत. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाचीरक्कम १०४ कोटी रुपये असल्याचं सांगितलं जातंय. मुंबई पोलिसांनी डिसेंबर २०२३ मध्ये अंमली औषधांचा भांडाफोड करत तीन जणांना अटक केली होती. पोलिसांना त्यावेळी केलेल्या चौकशीत जोधपूरमध्ये चालवल्या जाणाऱ्या औषधाच्या कंपनीची माहिती मिळाली होती. पोलिसांनी या कंपनीचा भांडाफोड करत मालक चौधरीला अटक केली आहे.

३१ डिसेंबरला अटक

मुंबई पोलिसांनी नववर्षाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच ३१ डिसेंबरला शहरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. साकीनाका पोलीस स्टेशनच्या चंद्रकांत पवार यांना काही लोक मेफेड्रोन विकण्यासाठी येत असल्याची माहिती मिळाली होती. मुंबई पोलिसांनी या माहितीवरुन कारवाई करत सरफराज शेख (२२),माजिद उमर शेख (४४), अब्दुल कादर शेख (४४) यांना अटक केली होती. या तीन आरोपींकडून त्यावेळी ३.३३५ कोटी रुपयांचं १.६५५ किलोग्राम मेफेड्रोन जप्त केलं होतं. डीसीपी मंगेश शिंदे यांनी मुंबईत या तीन आरोपींना अटक केल्यानंतर आरोपींनी मेफेड्रोन कुठून खरेदी केली याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. पोलिसांना अधिक चौकशी केली असता राजस्थानच्या जोधपूरमध्ये नशा वाढवणाऱ्या औषधांची निर्मिती करण्यात येत असल्याची माहिती मिळाली होती.

## भारतीय केशरला सोन्याचा दर

**नवी दिल्ली** : भारतीय केशरच्या किंमतीत प्रचंड वाढ झालीय. अचानक दरात वाढ झाल्यानं सर्वांनाच आश्चर्य वाटत आहे. १ किलो भारतीय केशरसाठी तब्बल ४.९५ लाख रुपये मोजावे लागत आहेत. दरम्यान, भारतीय केशरचा एवढा दर वाढण्याते नेमके कारण काय? याबाबतची सविस्तर माहिती पाहुयात.

पश्चिम आशियातील भू-राजकिय तणावामुळे इराणमधून केशरच्या पुरवठ्यात मोठी घट झाली आहे. त्यामुळे भारतीय शेतकरी आणि व्यावसायिकांना दिलासा मिळाला आहे. तसेच जम्मू-काश्मीरमध्ये देखील केशरचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतलं जाते. मात्र, यावर्षी तिथेही उत्पादनात मोठी मोठी घट झाली आहे. दरम्यान, मिळालेल्आ माहितीनुसार, सिंगापूर आणि हाँगकाँगमध्ये भारतातील काही प्रसिद्ध मसाला कंपन्यांच्या मसाल्यांच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. भारतीय मसाला जगभर प्रसिद्ध झाला आहे. सध्या केशरची किरकोळ किंमत ही ४.९५ लाख रुपये झाली आहे.

## अरविंद केजरीवाल यांना आणखी एक दिलासा



नवी दिल्ली/वृत्तसंस्था

सुप्रीम कोर्टानं नवी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना आणखी एक दिलासा दिला आहे.आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक असलेल्या अरविंद केजरीवाल यांना मुख्यमंत्रिपदावरुन हटवण्याची मागणी करणारी याचिका सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आली होती. अंमलबजावणी संचलनालयानं अरविंद केजरीवाल यांना कथित मद्य धोरण प्रकरणात अटक केल्यानं त्यांचं मुख्यमंत्रिपद काढून घेतलं जावं, अशी मागणी याचिका कर्त्यानं केली होती. सुप्रीम कोर्टानं याचिका फेटाळून लावत दिल्ली हायकोर्टाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दिपांकर दत्ता यांच्या खंडपीठानं अरविंद केजरीवाल यांच्या विरोधातील याचिका फेटाळली. याचिकाकर्त्यानं दिल्ली हायकोर्टाच्या निर्णयात हस्तक्षेप करुन केजरीवाल यांना मुख्यमंत्रिपदावरुन हटवण्याची मागणी केली होती. सुप्रीम कोर्टानं ज्या याचिकाकर्त्यानं याचिका केलीय त्यानं दिल्ली हायकोर्टात याचिका दाखल केलेली नव्हती, असं निरीक्षण सुप्रीम कोर्टानं नोंदवलं. अरविंद केजरीवाल यांच्या अटकेनंतर त्यांना मुख्यमंत्रिपदावरुन हटवलं जावं यासाठी संदीप कुमार यांनी जनहित याचिका दिल्ली हायकोर्टात दाखल केली.


**दिल्ली हायकोर्टाचा निर्णय कायम**

न्यायमूर्ती खन्ना यांनी आम्ही या सर्व गोष्टींमध्ये का पडावं. तुम्ही या गोष्टींबद्दल बोलू शकता पण तुम्हाला कायदेशीर हक्क आहे का? नायब राज्यपालांनी त्यांना आवश्यक वाटल्यास कृती करावी, आम्ही कुणाला पदावरुन हटवण्याचा आदेश देणार नाही,अशी तोंडी टिप्पणी केली. यानंतर कोर्टानं याचिका फेटाळण्यात येत असल्याचं सांगितलं.

## आता लवकरच लग्न करावं लागेल

### राहुल गांधींचं भरसभेत लहान मुलाच्या प्रश्नाला उत्तर

नवी दिल्ली/वृत्तसंस्था



रायबरेली लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे उमेदवार राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांची एक संयुक्त सभा पार पडली. या सभेच्या समारोपावेळी सभेतील एका मुलानं राहुल गांधींना लग्न कधी करणार असा प्रश्न विचारला यावेळी प्रियांका गांधी मंचावर उपस्थित होत्या. त्यांनीच राहुल गांधींना त्या मुलाच्या प्रश्नाचं उत्तर द्यायला सांगितलं. गांधींनी कार्यकर्त्याच्या प्रश्नाचा सन्मान ठेवत उत्तर दिलं.

राहुल गांधी यावेळी अमेठी लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत नसून त्यांनी केरळच्या वायनाडमधून देखील निवडणूक लढवली आहे. रायबरेलीत त्यांची लढत भाजपच्या दिनेश प्रतापसिंह यांच्याशी होणार आहे. यापूर्वी सोनिया गांधी या मतदारसंघाचं प्रतिनिधीत्व करत आहेत.

दरम्यान, २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी अमेठी लोकसभा मतदारसंघातून पराभूत झाले होते. त्यावेळी देखील त्यांनी केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. वायनाडमधून ते विजयी झाले होते. आता यावेळी देखील ते दोन लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. राहुल गांधी अमेठीतून निवडणूक लढवतील अशा चर्चा होती. मात्र, त्यांनी रायबरेलीला प्राधान्य दिलं.

**■ राहुल गांधी कधी लग्न करणार?**

सभेत राहुल गांधी यांना एका लहान मुलानं लग्नासंदर्भात प्रश्न विचारला. यावर राहुल गांधी म्हणाले आता वाटतंय लवकरच करावं लागेल. राहुल गांधी यांच्या उत्तरावेळी प्रियांका गांधी हे सर्व पाहत होत्या. प्रियांका गांधी यांनी रायबरेलीत आज काँग्रेसच्या प्रचाराची सुरुवात केली. यावेळी त्या रायबरेलीत घरोघरी जाऊन प्रचार सुरु करणार आहेत.

**■ रायबरेली सोनिया गांधी आणि इंदिरा गांधींची कर्मभूमी**

राहुल गांधी यांनी महाराजगंज येथील एका सभेला संबोधित केलं. त्यावेळी त्यांनी म्हटलं की यावेळी रायबरेलीतून निवडणूक लढवण्यासाठी आलोय. काही दिवसांपूर्वी आईसोबत बसलो होते. एका व्हिडीओत माझी पहिली आई सोनिया गांधी आणि दुसरी आई इंदिरा गांधी आहेत, असं सोनिया गांधींना सांगितल्याचं राहुल गांधी म्हणाले. ही माझ्या दोन्ही आईंची कर्मभूमी आहे. यासाठी इथून निवडणूक लढवण्यासाठी आलोय, असं राहुल गांधी म्हणाले.

**पाहिजेत**

साईराम कंपनीत कामासाठी मुले, मुली व महिला पाहिजेत. वय - १८ ते ३५, शिक्षण अट नाही, पगार ९ ते १५ हजार. राहणे मोफत. संपर्क मो.: अकलूज : ९१५८७७०१६७, सांगोला : ९२०९३०५७१५ (१४७/१७५२४)

सुराज्य सोलापूर Classified

**निवेदन** : या अंकात प्रसिध्द झालेल्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आवाहनाच्या सत्यतेबाबत 'सुराज्य' हमी घेऊ शकत नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

## संक्षिप्त वृत्त



### कुर्डूवाडीत महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

**कुर्डूवाडी** : कुर्डूवाडीत श्री सांब शिव योगेश्वर मंदिरात महात्मा बसवेश्वर जयंती साजरी करण्यात आली. मंदिरात गुरुवारी (दि.९) महिलांसाठी पाककला स्पर्धा आयोजित केली होती. महिलांचा तिला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला शुक्रवारी (दि.१०) सकाळी ६ वाजता श्रींच्या समाधीस रुद्राभिषेक करण्यात आला. सकाळी ११ वाजता श्रीषब्र १०८ प्रभू देव शिवाचार्य माढेकर महाराज यांचे आगमन झाले. त्यांची पाद्य पूजा करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. दुपारी १२ वाजता पाळणा व महाआरती झाली. नंतर श्री.ष.ब्र.१०८ प्रभू देव शिवाचार्य माढेकर महाराज व धर्मवीर धनंजय डिकोळे यांच्या हस्ते पाककला स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी महाराजांचे आशीर्वचन झाले. पूजा विधी सोमनाथ स्वामी यांनी केले. यावेळी सर्व वीरशैव लिंगायत समाज बांधव व सर्व महिला उपस्थित होत्या. शनिवारी मंदिरात दुपारी १२ ते ४ वाजेपर्यंत महाप्रसादाचा कार्यक्रम झाला. यावेळी महादेव डिकोळे, गणेश शेटे, चंदु शेंडे, औदुंबर डिकोळे, चंदुलाल ममाने, धन्यकुमार ठोकडे, कुमार गाडवे, अनिल शेंडे, रमेश गाडवे, निलाखे भाऊसाहेब, संजय डिकोळे, सुरेश गाडवे, जयदेव ढेपे, महेश ढेपे आदी उपस्थित होते.

### पिसेवाडी येथे पेट्रोल ओतून घराला लावली आग

**सोलापूर** : कार्यक्रमात झालेल्या भांडणाचा राग धरून वाटेत अडवून मारहाण केली. त्यानंतर घरावर पेट्रोल ओतून आग लावून आर्थिक नुकसान केले. ही घटना पिसेवाडी (ता. माळशिरस) येथे शनिवारी ( दि. ११) रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणात वेळापूरच्या पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक केली आहे. दत्तात्रय उद्धव इंगळे (रा. पिसेवाडी ता.माळशिरस) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी शंतनु नानासाहेब माने (वय वर्षे २१), ओंकार गोरख होले (वय वर्षे २१) आणि योगेश दादासाहेब सुरवसे (वय वर्षे २२ सर्व रा. अकलूज) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. मांढरदेवी येथील कार्यक्रमात इंगळे यांच्या नातेवाईक वंदना जाधव हिच्याबरोबर आरोपींचे भांडण झाले होते. त्याचा राग धरून वरील तिघांनी उदयनगर येथील पुलाजवळ रात्री दत्तात्रय इंगळे आणि त्यांच्या नातेवाईकांना अडवून मारहाण केली होती. त्यानंतर सर्व आरोपींनी मोटरसायकलवर येऊन इंगळे यांच्या घरावर पेट्रोल ओतून आग लावली. त्यात घरातील प्रापंचिक साहित्य, ४७ हजार रुपये रोख आणि १५ ग्रॅम सोन्याचे दागिने जळून नुकसान झाले, असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव अध्यक्षपदी घोडके



**सोलापूर** : सोलापूर : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या २९९ व्या जयंतीनिमित्त उत्सवासाठी संघर्ष सेनेच्या वतीने नुकत्याच घेण्यात आलेल्या बैठकीत सामाजिक कार्यकर्ते निखिल घोडके यांची सर्वानुमते उत्सव अध्यक्षपदी निवड करण्यात आली. कार्याध्यक्ष शिवा पुजारी, उपाध्यक्ष प्रवीण चाफाकरंडे, सचिव अजित सोनकटले, सहसचिव संदीप कांबळे, खजिनदार गौरव पवार अशा अन्य निवडी करण्यात आल्या. यावेळी करण गडदे, चंद्रशेखर पाटील, स्वप्निल हाके डीडी पांढरे, नितीन होसमणी यांचे सह पदाधिकारी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी निवडीनंतर निखिल घोडके यांनी जयंती महोत्सव साजरा करण्याबाबत त्यांची भुमिका स्पष्ट केली.

# सोलापूर बाजारसमितीचे कारभारी कोण?

## १४ जुलैला संपणार संचालक मंडळाची मुदत

- निवडणूक लागणार का, संचालक मंडळाला मुदतवाढ मिळणार?
- प्रशासन कारभार चालविणार का याबाबतही चर्चा
- व्यापारी, अडते, शेतकऱ्यांचे लक्ष

उत्तर सोलापूर/प्रतिनिधी

**कृषी उत्पन बाजार समिती संचालक मंडळाची मुदत १४ जुलै रोजी संपणार आहे. त्यानंतर निवडणूक लागणार का पुन्हा विद्यमान संचालकास मुदत वाढ मिळणार का प्रशासन कारभार चालविणार, याकडे संचालक मंडळ, व्यापारी, अडते व शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चेअरमनपदी विजयकुमार देशमुख यांची १० ऑगस्ट १९ रोजी निवड झाली. उपसभापती श्रीशैल नरोळे, सचिव दत्तात्रय सूर्यवंशी व संचालक मंडळांनी सोलापूर बाजार समिती कार्यक्षेत्र वाढवून उच्चांकी आर्थिक उत्पन्न व आवक जावकमध्ये उत्तम कामगिरी केली. राज्यासह देशातही सोलापूर बाजार समितीचा डंका गाजत आहे. अडते, व्यापारी, उत्पादक व शेतकऱ्यांचा फायदा, विविध संघटना अध्यक्षांनीदेखील सहकार्य केल्याने आजघडीला बाजार समिती मोठी आर्थिक उलाढाल करत आहे. महाराष्ट्रसह इतर राज्यातही आपले जाळे पसरवून खरेदी, विक्रीत उच्चांक निर्माण केला आहे. आर्थिक उलाढालही मोठ्या प्रमाणात असून आंतरराष्ट्रीय बाजार समितीच्या नियमात बसणार अशी चर्चा जोर धरत आहे.




सोलापूर बाजार समिती ही शेतकरी, व्यापारी व अडत्यांच्या दृष्टीने सक्षम आहे. आंतरराष्ट्रीय समितीच्या नियमात बसण्यासाठीचा प्रयत्न शासन स्तरावर चालू आहे. निवडणुकीबाबतचा निर्णय सहकार व पणन विभाग, डी. डी. आर विभाग घेणार आहे.

**- दत्तात्रय सुर्यवंशी, सचिव, प्रशासन विभाग.**

संचालक मंडळाची मुदत संपण्यासाठी दोन महिन्याचा कालावधी आहे. संचालक मंडळ, प्रशासन तसेच सहकार व पणन विभाग यांच्याशी सविस्तर चर्चा होऊन पुढील निर्णय घेण्यात येईल. विभागाला इतिभूत माहिती प्रशासन स्तरावर देण्यात येईल.

**- विजयकुमार देशमुख, आमदार/चेअरमन**

संचालक मंडळाची मुदत संपून १४ जुलैला ६ वर्षे पूर्ण होतात. यामध्ये १४ जुलै २३, १३जानेवारी २४ ला अशी दोन वेळा संचालक मंडळास मुदत वाढ मिळाली. सध्या निवडणूकाही चालू आहेत. पुन्हा मुदत वाढ मिळेल ही शक्यता नाकारता येत नाही.

**- नामदेव गवळी, संचालक.**

# सांगोल्यातून अयोध्येसाठी दोन एसटी मार्गस्थ

- पहिलाच उपक्रम
- ९० प्रवाशांसह आठ ते दहा दिवस मुक्काम



सांगोला/प्रतिनिधी

अयोध्येतील श्री राम मंदिरात रामलल्लाच्या दर्शनासाठी देश विदेशातून प्रवासी जात आहेत. केंद्र सरकारने विशेष ट्रेनही सुरु केल्या आहेत. मात्र आता सांगोल्यातून एस टी महामंडळाने पुढाकार घेत सांगोला एसटी बस स्थानकातून पहिल्यांदाच शनिवारी (दि.११) ९० प्रवाशांसह २ एसटी बस अयोध्याकडे रवाना केल्या आहेत.

सांगोला एसटी बसस्थानकाकडून शहर आणि तालुक्यातील श्रीराम भक्तांना अयोध्या दौरा घडवून आणण्यासाठी विशेष एसटी बसचे नियोजन केले आहे. या विशेष गाड्यांच्या माध्यमातून सांगोला-नाशिक-त्र्यंबकेश्वर-शिर्डी मुक्काम-गजानन महाराज शेगाव मुक्काम-रामटेक मुक्काम-प्रयागराज मुक्काम-अयोध्या मुक्काम-काशी मुक्काम-रामटेक-माहूरगड-तुळजापूर आणि सांगोला असा प्रवास असणार आहे.

प्रति प्रवासी ८ हजार रुपयेप्रमाणे तिकिट दर आकारला आहे. यामध्ये सकाळी आणि सायंकाळी चहा, सकाळी-नाश्ता २ वेळेच्या भोजनाची व्यवस्था केली आहे. मुक्कामाची सोयदेखील एसटी बसस्थानकाकडून केली आहे.

### आरामदायी बस, दोन चालकांची सोय

आरामदायी प्रवासासाठी चांगल्या गाड्या दिल्या आहेत. तसेच सोबत दोन-दोन चालक असणार आहेत. यात्रेदरम्यान ८ ते १० दिवसाचा प्रवास होईल. विशेष बससाठी प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. यापुढील काळातही प्रवाशांचा प्रतिसाद मिळाल्यास अयोध्याकडे अजून गाड्या वाढवण्यात येतील असेही आगारप्रमुख विकास पोफळे व वाहतूक निरीक्षक सागर कदम यांनी सांगितले आहे.



# जनावरांचे टॅगिंग, पशुधन प्रणालीवर नोंदणी आवश्यक : डॉ. सय्यद

## ...अन्यथा नुकसान भरपाई मिळणार नाही

सांगोला/प्रतिनिधी

जनावरांना टॅगिंग व पशुधन प्रणालीवर नोंदणी नसेल तर नैसर्गिक आपत्ती, विजेचा धक्का, वन्यपशुंच्या हल्ल्यामुळे मृत्युमुखी पडलेल्या पशुधनास नुकसानभरपाईची रक्कम मिळणार नाही. त्यामुळे पशुधन प्रणालीवर जनावरांची नोंद करणे आवश्यक आहे, अशी सूचना सांगोला तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. असलम सय्यद यांनी दिली आहे.

जनावरांना इअर टॅगिंग आणि त्याची भारत पशुधन प्रणालीवर नोंद बंधनकारक आहे. तालुक्यातील १ लाख ४७ हजार जनावरांपैकी १ लाख जनावरांचे टॅगिंग व पशुधन प्रणालीवर नोंदणी झाली आहे. अद्याप ४७ हजार जनावरांची नोंदणी झालेली नाही. पशुपालकांनी उर्वरित जनावरांची नोंद प्रणालीवर करून घ्यावी, असे आवाहन तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. असलम सय्यद यांनी केले आहे. राज्य शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने याबाबत शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यानुसार भारत पशुधन प्रणालीवर पशुपालकांची सर्व माहिती मोबाईल आणि आधार नंबर तसेच पशुपालकाकडे असणारी जनावरांची माहिती, जनावरांचे वय, लिंग, जात, मिल्किंग स्टेटस् आदी माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे. १ जूनपासून इअर टॅगिंग आणि भारत पशुधन प्रणालीवरील नोंदीशिवाय जनावरांची खरेदी-विक्री करता येणार नाही. तसेच पशुवैद्यकीय सेवा, केंद्र आणि राज्य शासनाकडून आर्थिक साहाय्य मिळणार नाही, असे स्पष्ट केले आहे.

नैसर्गिक आपत्ती, विजेचा धक्का, वन्यपशुंच्या हल्ल्यामुळे मृत्युमुखी पडलेल्या पशुधनास नुकसानभरपाईची रक्कम देण्यात येणार नाही. राज्यांतर्गत जनावरांची वाहतूक आणि मालकी हस्तांतरण होणार नाही. त्यामुळे पशुधन प्रणालीवर जनावरांची नोंद आवश्यक आहे. यासाठी पशुपालकांनी सर्व जनावरांना नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यांशी संपर्क साधून इअर टॅगिंग करून घ्यावे. त्याच्या अचूक नोंदी भारत पशुधन प्रणालीवर तत्काळ करून घ्याव्यात, असे आवाहनही सय्यद यांनी केले आहे.

# पिलीव भागात शेतकऱ्यांचा मुरघास निर्मितीकडे कल

## कडब्याच्या गंजी झाल्या गायब

**पिलीव** : पिलीव व आसपासच्या परिसरात पुर्वी शेतकऱ्यांच्या घरासमोर कडब्याच्या मोठ-मोठ्या गंजी दिसत होत्या. मात्र अलीकडे कडब्याच्या गंजी गायब झाल्या असुन त्याठिकाणी मुरघासाचे भोत भरुन ठेवल्याचे दिसत आहेत.

मुरघासामुळे जनावरांना पशुखाद्य कमी लागते. दुधात सातत्य राहते यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात मुरघासाकडेच वळला आहे. सध्या शेतकऱ्याचा भुसार माल उत्पादन करण्याकडे कल एकदम कमी झाला आहे. गहू, ज्वारी ही भुसार पिके शेतकरी आपल्या खाण्यासाठी लागेल एवढेच उत्पादीत करीत आहे. ज्वारीचे प्रमाण कमी झाल्यामुळे सध्या गंजी तर दिसतच नाहीत. शेतकरी यामुळे मुरघास करण्यासाठी मका पिकाकडे वळला आहे. तसेच काही शेतकरी कडवळाचाही मुरघासासाठी उपयोग करीत आहेत.



कुसमोड येथील सागर गोंजारी यांच्या गोठ्यात मुरघास बनवला जात आहे.

मुरवलेला किंवा मुरलेला मुरघास याचे पोषण मूल्य हिरव्या वैरणीइतकेच आहे. मुरघास साठवणूक शेतकऱ्यांना अतिशय फायदेशीर ठरत आहे. यामुळे शेतकरी याकडे मोठ्या प्रमाणात वळला आहे.

दुष्काळी परिस्थितीत किंवा विहिरींना पाणी नसताना हा मुरघास जनावरांना फायदेशीर ठरत आहे. दूध उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. पशुखाद्याची बचत व दुग्धोत्पादनात वाढ यामुळे शेतकऱ्यांनी मुरघासाचा पर्याय स्विकारला आहे.

मका पिक फुलोऱ्यात असताना किंवा दाणे चिकात असताना मका कापून यामध्ये सायलेज कल्चर, मळी, गूळ अथवा मीठ मिसळतात. बाहेरुन हवा व पाणी आतमध्ये जाणार नाही याची काळजी मुरघास बनविताना घेतली जाते. दुष्काळी परिस्थितीत तर बनवून ठेवलेला मुरघास हा पशुपालन शेतकऱ्यांसाठी वरदानच ठरत आहे.

# पिलीव परिसरात निकालावरुन पैजा

पिलीव/प्रतिनिधी

माढा लोकसभा मतदारसंघाची निवडणूक ७ मे रोजी शांततेत पार पडली. गेले महिना, दोन महिने प्रचाराचा, आरोप-प्रत्यारोपाचा तसेच गावगाड्यातील कार्यकर्त्यांमध्ये मते मिळविण्यासाठी जुंपली होती. मात्र, आता निवडणूक झाल्यावर पिलीव परिसरातील गाव-गाड्यात, चौकाचौकात पारावर निवडून कोण येणार यावर पैजा लागत आहे.

कार्यकर्ते, आपाआपल्या उमेदवाराचे समर्थक यांच्यात पैजा लावण्यावरुन वातावरण अक्षरशः ढवळून निघाले आहे. महायुतीचे रणजितसिंह नाईक-निंबाळकर व महाविकास आघाडीचे धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यात या ठिकाणी 'काटे की टक्कर' झाली आहे. मतदानानंतर निकालामध्ये जरा जास्तच वेळ असल्याने कार्यकर्ते व समर्थकांमध्ये निकालाची मोठी उत्सुकता लागली आहे. आपल्या नेत्यांबद्दल असलेल्या आत्मविश्वासामुळे कार्यकर्त्यांमध्येही जोश हाय आहे. आपलेच म्हणणे, आपलाच दावा खरा असल्याचे ठासून सांगितले जात आहे. जेव्हा दोन्ही बाजूचे कार्यकर्ते एकमेकांचे ऐकत नाहीत, तेव्हा त्यांच्यामध्ये निकालाचा दावा खरा ठरण्यासाठी जेवणाची, बोकड पैज म्हणून कापण्याची, पैशाची अशा वेगवेगळ्या पैजा लागत आहेत. अगदी घराजवळच्या कट्ट्यावर, चहाच्या टपरीवर आणि पारावरही उत्साही लोक वेगवेगळ्या पैजा लावत आहेत.

# हालहळ्ळी (अ) येथे आजपासून यात्रेस प्रारंभ

अक्कलकोट /प्रतिनिधी

हालहळ्ळी (अ) (ता. अक्कलकोट) येथील ग्रामदैवत श्री हनुमान यात्रा महोत्सवास मंगळवार (दि. १४) पासून प्रारंभ होत आहे. ही यात्रा तीन दिवस चालणार आहे.

मंगळवारी पहाटे ४ वा श्री हनुमानास दंडनमस्कार, श्री स तैलाभिषेक व रूद्राभिषेक, पानपूजा त्यानंतर सकाळी ११ वाजता नंदीध्वज व पालखी मिरवणूक, गंगास्नान होणार आहे. दुपारी ४ वाजल्यापासून भाविकांना महाप्रसाद वाटप, रात्री १० वाजता श्री हनुमान नाट्य संघ हालहळ्ळी (अ) आयोजित कन्नड नाटक रैतन कत्तू भुमिगे बित्तू अर्थात अन्न हाकुव कैगे, कन्न हाकुव सरकार हे नाटक सादर होणार आहे.

बुधवारी (दि.१५) पहाटे ४ वाजता श्री स महारुद्राभिषेक, दंडनमस्कार, 'श्री'स तैलाभिषेक व पानपुजा, दुपारी २ वाजता हनुमानाच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात येणार आहे. सायंकाळी ४ वाजता महाप्रसाद वाटप आणि रात्री १० वाजता श्री शिवलिंगेश्वर प्रासादिक नाट्य संघ जमखंडी आयोजित गरतीगे बंद गंडांतर अर्थात ताळीय भाग्य हे कन्नड नाटक सादर होणार आहे. गुरुवारी (दि. १६) पहाटे ४ वाजता श्रीस दंडनमस्कार, तैलाभिषेक व रूद्राभिषेक, पानपुजा झाल्यानंतर दिवसभर धार्मिक, मनोरंजन, सामाजिक कार्यक्रम, सायं. ४ वा. जंगी कुस्त्यांचा फड रंगणार आहे. महाप्रसाद वाटप होणार आहे. रात्री ८ वा. नंदीध्वज व पालखी मिरवणूक व रात्री १० वा. श्री चन्नबसव नाट्यसंघ हारकुड, ता. बसवकल्याण आयोजित कन्नड नाटक तंगी माडीद तप्पू अर्थात मानवंतर मनिताना हे नाटक सादर करणार आहेत. सलग तीन दिवस महाप्रसाद सेवा असून, अनुक्रमे निवृत्त ग्रामसेवक श्रीशैल स्वामी, सुभाष ढब्बे, रुपसेन कळमंडे हे बजावणार आहेत.



### खीर, कढी-भाताच्या महाप्रसादासाठी यात्रा प्रसिद्ध

खीर, कढी-भाताच्या महाप्रसादासाठी ही यात्रा प्रसिद्ध आहे. यात्रेसाठी पुजारी हणमंत सुतार, शंकर सुतार, ईश्वर सुतार, अविनाश सुतार, यात्रा कमिटीचे पंच मल्लिकार्जुन बिराजदार, गुरुनाथ कळमंडे, धर्मण्णा बिराजदार, श्रीशैल धनशेट्टी, भिमराया धनशेट्टी, रामण्णा बोराळे, राजकुमार बिराजदार, गुरुनाथ बिराजदार, चिदानंद ढब्बे आदींसह गावकरी परिश्रम घेत आहेत. भाविकांनी यात्रेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री हनुमान यात्रा पंचकमिटीतर्फे केले आहे.

# छत्रपती संभाजी जन्मोत्सव महामंडळाच्या अध्यक्षपदी भोसले

**सोलापूर** : धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे वार्षिक सर्वसाधारण सभा २०२४-२५ वर्षाकरिता पार पडली.

प्रथम छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीची पूजा करण्यात आली. त्यानंतर पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. नूतन अध्यक्षपदी योगेश भोसले यांची निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्ष श्रीनाथ गायकवाड, कार्याध्यक्ष बालाजी निचल, सचिव श्रीकांत सुरवसे, खजिनदार सचिन साळुंखे, मिरवणूक प्रमुख नाना शिंदे अशा निवडी करण्यात आल्या.

याप्रसंगी संस्थापक अमोल शिंदे, अनंत जाधव, बापू वाडेकर, किरण पवार, नाना मस्के, सचिन साळुंखे, संजय सरवदे, अजिंक्य पाटील, धनाजी भोसले, राहुल दहींहडे, दिनानाथ शेळके, समर्थ मोठे, अक्षय बिद्री आदींसह शिवशंभू भक्त उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### सुधा उपाहारगृहाचे मोदी रेल्वेलाईन परिसरात उदघाटन

**सोलापूर** : सुधा उपाहारगृहाच्या दुसऱ्या शाखेचे मोदी रेल्वेलाईन परिसरातील यतिराज हॉटेल शेजारील नव्या इमारतीमध्ये शानदार उदघाटन करण्यात आले. मातोश्री पार्वतीबाई शंकरराव किणगी यांच्या हस्ते फित कापून आणि पूजा करून रविवारी उदघाटन करण्यात आले. यावेळी कर्नाटक उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती अशोक किणगी यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. सुधा उपाहार गृह १६ मे पासून ग्राहकांच्या सेवेत रूजु होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. मातोश्री पार्वतीबाई शंकरराव किणगी यांच्या हस्ते फित कापून शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाला श्री.म.नी.प्र. जडेय शांतलिंगेश्वर महास्वामीजींनी व्हिडिओ कॉलद्वारे ऑनलाईन पध्दतीने आर्शिवाद दिले. यावेळी बसवराज शंकरराव किणगी, सिध्देश्वर शंकरराव किणगी, गंगाधर विश्वनाथ किणगी,अशोक विश्वनाथ किणगी तसेच किणगी परिवारांवर शहर परिसरातील सर्वच क्षेत्रातील अनेक मान्यवर तसेच ग्राहकांनी शुभेच्छांचा वर्षाव केला. या कार्यक्रमासाठी सिध्देश्वर देवस्थानचे अध्यक्ष धर्मराज काडादी, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहर अध्यक्ष सुधीर खरटमल, हर्षल खरटमल, माजी आमदार दिलीप माने, उद्योजक यतीन शहा, हर्षल कोठारी,माजी महापौर अलका राठोड, शहाजी पवार, अविनाश महागांवकर, प्रशांत बडवे, अविनाश कुलकर्णी आदींची उपस्थिती होती. सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले.



### शाब्दी यांच्याकडून जिल्ह्यात अन्नधान्याचे किट वाटप

**सोलापूर** : एमआयएम पक्षाचे सोलापूर शहर आणि जिल्हा प्रमुख फारूक शाब्दी यांनी शहर आणि जिल्ह्यातील विविध भागात गरिब लोकांना अन्न धान्याच्या किटचे वाटप केले. सोलापुरातील अक्कलकोट, मोहोळ, पंढरपूर, मैंदर्गी, वागदरी, बोरगाव देशमुख, घोळसगाव, किरणळ्ळी, भुरीकवठे, बादोले, साफळे, सांगवी, कुरनूर, मोठ्याल, शिंदखेड, हन्नूर, ब्रहाणपूर, डोंबरजवळगा, पितापूर, नन्हे गावं, दरीवस्ति, नागनहळ्ळी, मातनहळ्ळी, हैद्रासह शहराती नई जिंदगी परीसर, सिध्देश्वर नगर, कुमठा नाका, स्वागत नगर, मुमताज नगर, ७० फुट रोड परिसर, जवाहर नगर, नेहरु नगर, विजापुर रोड परीसर, यतिमखाना, बेगम पेठ, लोधी गल्ली, कुरेशी गल्ली, समाधान नगर, रामवाडी, तेलंगी पाच्छा पेठ, पंजाब तालिम, मित्रनगर, शेळगी, दहीटणे, घोगंडे वस्ती आदी भागात मदत पोहोचली.




### जलकुंभ वाटपाने वीरशैव व्हिजनच्या बसव सप्ताहाची सांगता

**सोलापूर** : जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त वीरशैव व्हिजनच्या बसव सप्ताहाची जनावरांना पाणी पिण्यासाठी जलकुंभ वाटप करून सांगता करण्यात आली. भुसार व्यापारी संजय लब्बा व गणेश शिलवंत यांच्या हस्ते जलकुंभांचे पूजन करण्यात आले. यावेळी वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले, उत्सव समिती अध्यक्ष शिवानंद सावळगी, सचिव राहुल बिराजदार, कोषाध्यक्ष आंनद दुलंगे, सहकोषाध्यक्ष विजय बिराजदार, विश्वस्त सोमेश्वर याबाजी, श्रीमंत मेरू, अविनाश हत्तरकी, सिद्धेश्वर कोरे, बद्रीनाथ कोडगी उपस्थित होते. यंदाच्या वर्षी वीरशैव व्हिजनच्या वतीने १० जलकुंभाचे वाटप करण्यात येणार असून त्याची सुरुवात ४ जलकुंभ वाटपाने करण्यात आली. आंनद तालीकोटी (मीठ गल्ली), महेश घाळे (भुसार गल्ली), प्रा. संगमेश्वर नीला (जुळे सोलापूर), निराळे वस्ती रिक्षा स्टॉप यांना पाणी उपलब्ध करण्याच्या जबाबदारीसह जलकुंभ पोहोच करण्यात आले.

# अवकाळी पावसाचा झटका, कांद्याला फटका

## १०० -१२५ प्रति क्विंटल भाव

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये १४५० क्विंटल कांदे आले असून आज ज्या शेतकऱ्यांनी कांदे आणले त्या शेतकाऱ्यांना भाव न मिळाल्याने वांदे झाले.गेल्या दोन तीन दिवसात अवकाळी पाऊस मोठ्या प्रमाणात पडल्याने आर्थिक नुकसान झाले असल्याने अनेक शेतकरी हताश झाले होते.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये सोलापूरच्या आजूबाजूच्या भागातील शेतकऱ्यांनी कांदा आणला होता.कांद्याची आवक कमी झाल्याने भाव चांगला मिळेल या आशेने कांदा विक्रीसाठी आणला होता. मात्र सर्वसाधारण १००- २५० रुपये क्विंटल असा भाव मिळाला आहे.खर्च न मिळाल्याने अनेक शेतकऱ्यांवर हात रिकामे हालवत जाण्याची पाळी आली.

### १०० ते १२५ रुपये प्रति क्विंटल भावः खांडेकर

सोन घाण ठेवून कांदा लागवड केली होती.२४ बॅगा बाजार समितीमध्ये आणले असता केवळ १०० ते १२५ रुपये प्रति क्विंटल भाव मिळाला. सर्व वजा करून केवळ ५३७ रुपये घेऊन जात आहे, असे कुरनूरचे कांदा उत्पादन शेतकरी मारुती खांडेकर यांनी सांगितले.



## दोड्डी तांड्याजवळ दुचाकीच्या अपघातात एकजण ठार

**सोलापूर/प्रतिनिधी**




सोलापूर-हैदराबाद महामार्गावरील दोड्डी तांड्याजवळ दोन दुचाकिच्या अपघातामध्ये एक दुचाकि चालक गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान मयत झाला. हा अपघात रविवारी सायंकाळच्या सुमारास घडला. रफिक इब्राहिम मकानदार (वय ४५ रा. विडी घरकुल, हैदराबाद रोड) असे मयताचे नाव आहे . ते काल रविवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास बोरामणी येथून सोलापूरकडे दुचाकिवरून येत होते. दोड्डी तांडा येथील भारत बेंज जवळ समोरून चुकिच्या दिशेने येणारी दूरूरी दुचाकि धडकल्याने ते गंभीर जखमी झाले होते . त्यांना शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आज सोमवारी दुपारी एक वाजता सुमारास त्यांना बेशुद्ध अवस्थेत खाजगी रुग्णालयात नेताना ते म्बुलन्समधे मयत झाले.अशी नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे .

## लोकमंगल बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबीर

**सोलापूर/प्रतिनिधी**

लोकमंगल बँकेच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त बँकेच्या प्रधान कार्यालयात रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.

यावेळी हेडगेवार रक्तपेढीचे संचालक मिलिंद फडके यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन झाले. त्यावेळी त्यांनी लोकमंगल बँक राबवित असलेल्या सामाजिक उपक्रमाचे कौतूक केले. रक्तदान शिबिरात ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले त्याप्रसंगी त्यांनी बँकेच्या विविध उपकमाची माहिती घेऊन बँक कर्मचाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी बँकेचे संचालक देवानंद चिलवंत, अशोक मादगुंडी, अशोक सापटनेकर, सिध्दार्थ सर्जे, नरेंद्र काटीकर, अभिजीत टाकळीकर, जितेंद्र नाईक-लाड व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेशसिंह बायस उपस्थित होते. रक्तदान यशस्वी करण्यासाठी बँकेचे अधिकारी प्रशांत अंबुरे, राहुल कोल्हटकर, राहुल कुलकर्णी, धर्मराज मळगे, चेतन ढेकळे, राजेंद्र देशमुख, पंकज यादव, ओंकार कंटीकर यांनी परिश्रम घेतले.




## नीरा उजवा कालवा दुरूस्तीसाठी बंद राहणार

**सोलापूर/प्रतिनिधी**

५ मे २०२४ रोजी सकाळच्या दरम्यान नीरा उजवा कालवा कि.मी. ४९/९०० सेवा पथाकडील बाजूस मोठा घळ पडून माती मिश्रीत पाणी वाहू लागले होते. या ठकाणी १ मी. व्यासाचा व ज्याची खोली मोजता आली नाही असा खड्डा पडून पाईपींग सुरू झाले.

कालव्याचा विसर्ग कमी करून घळ काढण्याचा प्रयत्र करण्यात आला परंतू गळती पुर्णतः बंद झाली नाही. या कारणामुळे निरा उजवा कालवा दुरुस्तीसाठी बंद करण्यात आला आहे, अशी माहिती नीरा उजवा कालवा विभागाचे कार्यकारी अभियंता शिवाजी जाधव यांनी दिली. कालव्याचा विसर्ग पुर्ववत केल्यास गळती वाढण्याची शक्यता लक्षात घेता व त्याखाली असलेली २००० लोकवस्ती बाधित होऊन मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्तहानी होऊ शकते. यास्तव, कालवा विसर्ग बंद करून गळती पूर्णतः रोखण्याची कार्यवाही नीरा उजवा कालवा विभाग, फलटण या विभागामार्फत करण्यात येत आहे.

## करमाळ्यातील उद्यानाची दुरवस्था

### झाडे गायब, ठिकठिकाणी अस्वच्छता

**करमाळा/प्रतिनिधी**

शहरातील महावीर उद्यानाची दुरवस्था झाली आहे. बागेतील हिरवाई गायब झाली असून, पाण्याचे कारंजे बंद अवस्थेत आहेत. मोडकळीस आलेली खेळणी व वाळलेली झाडे पाहून उद्यानात आलोय की स्मशानभूमीत असाच अनुभव येत आहे.

उन्हाळ्यातील सुट्टीच्या दिवसात उकाड्यापासून हैराण झालेल्या अबालवृद्धांना फिरण्यासाठी शहरात महावीर उद्यान आहे. जेऊर रोडवरील या उद्यानाला स्मशानकाळा प्राप्त झाली आहे. उद्यानात हिरवी झाडे गायब झाली आहेत. ठिकठिकाणी अस्वच्छता दिसत आहे.

बागेतील बच्चेकंपनीची खेळणी मोडकळीला आली आहेत. त्याची कित्येक वर्षांपासूनन दुरुस्ती झालेली नाही. बागेतील वृक्षांची निगा कित्येक महिन्यांपासून राखलेली नाही. संपूर्ण बाग पाण्याअभावी वाळून गेली आहे. बागेतील कारंजे बंद पडलेली आहेत. झाडाझुडपांना कित्येक महिने पाणी देण्यात आलेले नाही.

बागेचे मुख्यप्रवेशद्वार कोरोना काळापासून आजतागायत बंदच आहे. देखभालीसाठी एक कुटुंब येथे वास्तव्यास आहे. एकदा बागेत जाऊन फिरून आलेली मुले गैरसोयी पाहून पुन्हा त्या बागेत जायला नको म्हणतात.

बागेत कोणत्याही सोयी-सुविधा नाहीत. झाडांना पाणी दिले जात नसल्याने बाग वाळली आहे. मुलांना खेळायला चांगल्या खेळणी नाहीत. उद्यानाचे प्रवेशद्वारच कायम बंद राहते. हे उद्यान या उन्हाळ्यात चालवणे गरजेचे आहे. ऐन उन्हाळ्यात बाग वाळून गेली आहे. आता अंगाची लाहीलाही शमवायची कुठे, असा प्रश्न ज्येष्ठांपुढे पडला आहे.

## तीन हजारांहून अधिक शिक्षकांचे विनंती बदलीसाठी अर्ज

### शाळा सुरू होण्यापूर्वी प्रक्रिया पूर्ण होणार

**सोलापूर/प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेतील दोन हजार ७९५ शाळांवरील जवळपास तीन हजारांहून अधिक शिक्षकांनी विनंती बदलीसाठी प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज केले आहेत. नवीन भरतीतून आलेल्या शिक्षकांना नियुक्ती देण्यापूर्वी विनंती बदल्यांची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. दुसरीकडे लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर नवीन शिक्षकांना नियुक्ती मिळणार आहे.

शालेय शिक्षण विभागाने दोन महिन्यांपूर्वी राज्यातील जिल्हा परिषदांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शिक्षकांची भरती केली.

### शाळांना पुरेशा प्रमाणात शिक्षक द्यावे लागणार

शालेय शिक्षण विभागाच्या नवीन आदेशानुसार आता विद्यार्थ्यांच्या प्रमाणात शाळांना शिक्षक मिळतील, अशी अपेक्षा आहे. मात्र, अनेक शिक्षक दूर अंतरावरील शाळांमध्ये जाण्यास तयार नसतात आणि त्यामुळे त्याठिकाणी विद्यार्थ्यांच्या प्रमाणात शिक्षक नसतात. त्यामुळे विनंती बदल्यांची प्रक्रिया पार पाडताना जिल्ह्याच्या सीमावर्ती तालुक्यांमधील शाळांना पुरेशा प्रमाणात शिक्षक द्यावे लागणार आहेत.



पण, लोकसभेच्या आचारसंहितेमुळे अनेकांना नियुक्ती मिळालेली नाही. आचारसंहिता संपल्यानंतर जूनच्या पहिल्या आठवड्यात त्या सर्वांनाच नियुक्ती दिली जाणार आहे. तत्पूर्वी, जिल्हा परिषद शाळांवरील पूर्वीच्या शिक्षकांच्या विनंती बदल्यांची कार्यवाही पार पडणार आहे.

१५ जूनपासून शाळा सुरू होण्यापूर्वी विनंती बदल्या व नवीन शिक्षकांना नियुक्ती, या दोन्ही प्रक्रिया पूर्ण केल्या जाणार आहेत. दरम्यान, जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांचा पट १० ते २० दरम्यान असून त्यांना पटसंख्या वाढवावी लागणार आहे. निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर नवीन भरती झालेल्या शिक्षकांना शाळांवर नियुक्ती दिली जाणार आहे, असे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.

## हजरत खान चाळ येथे मैला मिश्रित पाणी


### तातडीने कार्यवाही करण्याची नागरिकांची मागणी

**सोलापूर/प्रतिनिधी**

मुरारजी पेठेतील हजरत खान चाळ येथे सार्वजनिक शौचालयाची ड्रेनेज लाईन तुंबल्याने मैलामिश्रित पाणी परिसरात पसरले आहे. अस्वच्छता आणि दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. महापालिका प्रशासनाने तातडीने कार्यवाही करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

मागील काही महिन्यांपासून येथील सार्वजनिक शौचालयला जोडलेली ड्रेनेज लाईन तुडुंब भरली असून त्यातील मैलायुक्त घाण पाणी नागरिकांच्या दारात पसरले आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून नागरिकांना विशेषता ज्येष्ठ व लहान मुलांना उलटी होणे, मळमळणे सारख्या आरोग्याच्या समस्या उद्भवत आहेत. हे मलयुक्त पाणी रहिवाश्यांच्या दारात आल्याने घरात प्रवेश करावा तरी कसा असा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत पालिका झोन क्रमांक १ च्या अधिकाऱ्यांकडे तक्रार करुन देखील अद्याप कार्यवाही करण्यात आली नाही.

त्यामुळे परिसरात घाण पाण्याचे डबके तयार झाले असून ड्रेनेज लाईन भरल्याने पाणी पुढे न जाता नागिरिकांच्या घरात उलट दिशेने येत आहे. घाण पाण्यात विटा, फरशीचे तुकडे ठेवून त्यावरून घरात जावे लागत आहे.



### महापालिकेत ठिय्या आंदोलनाचा इशारा

येत्या ८ दिवसात ही समस्या सोडवली गेली नाहीतर हेच घाण पाणी महापालिका अधिकाऱ्यांच्या कार्यालयात टाकून ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा येथील नागरिकांनी दिला आहे.

### निर्झरा केअर फाउंडेशनचा उपक्रम

## गरजू विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी मिळणार सहाय्य

**सोलापूर/प्रतिनिधी**

समाजातील हुशार आणि गरजू विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून आपले ध्येय गाठता यावे याकरिता निर्झरा केअर फाउंडेशनतर्फे त्यांच्या स्पर्धा परीक्षांच्या तयारीचा खर्च करण्यात येणार आहे. याकरिता जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात सोलापुरात परीक्षा घेण्यात येणार आहे, अशी माहिती निर्झरा केअर फाउंडेशनच्या संचालिका स्वाती अळ्ळीमोरे - साखरे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

आर्थिक परिस्थितीमुळे अनेक तरुणांचे स्पर्धा परिक्षेचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. समाजातील ही गरज ओळखून ३२ वयापर्यंतच्या हुशार आणि गरजू अशा मुलांना निवडून त्यांना पुणे शहरातील मोठ्या संस्थांमधून स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन मिळण्यासाठी १०० टक्के आर्थिक सहाय्य करण्यात येणार आहे. समाजातील आर्थिक दुर्बल घटकातील तरुणांना स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन मिळवून देण्यासाठी निर्झरा केअर फाउंडेशन प्रयत्न करीत आहे, असे संचालिका स्वाती अळ्ळीमोरे - साखरे यांनी सांगितले. पाटबंधारे विभागातील निवृत्त सचिव चन्नवीर बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही हा कार्यक्रम करत आहोत असे ते म्हणाले. सोलापुरातील हुशार आणि गरजू तरुणांनी जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात होणाऱ्या या सराव परीक्षेत सहभागी व्हावे व अधिक माहितीसाठी www. nirzara.org `m g§Ho$VñWimdarb Uplift या उपक्रमास भेट द्यावी आणि अधिक माहितीसाठी ९९२३४४८००० या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन निर्झरा केअर फाउंडेशनचे सोमनाथ अळ्ळीमोरे यांनी केले.

या पत्रकार परिषदेस पाटबंधारे विभागातील निवृत्त सचिव चन्नवीर बिराजदार, निर्झरा केअर फाउंडेशनचे सोमनाथ अळ्ळीमोरे उपस्थित होते.

# सोलापूर विद्यापीठात म. बसवेश्वरांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी

**सोलापूर/प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात महात्मा बसवेश्वर यांची जयंती विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली. कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या. खुली निबंध स्पर्धा व वचन अनुवाद स्पर्धेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद भेटला.



जयंतीदिनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते झाले. यावेळी ज्येष्ठ लेखिका डॉ अपर्णा जिरवणकर यांचे व्याख्यान पार पडले. महात्मा बसवेश्वर यांचे जीवन आणि कार्य हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. यावेळी व्यासपीठावर महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे आदींचे प्रमुख उपस्थिती होती. डॉ प्रसंगी डॉ कोळेकर यांनी महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राच्या कार्याचा आढावा घेतला .

डॉ. जिरवणकर म्हणाल्या की, बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी समाज सुधारण्याचे महान कार्य करून जगाला समता व बंधुत्वाची शिकवण दिली. त्याकाळी त्यांनी जाती निर्मूलनाचे कार्य करून एक आदर्श या जगासमोर ठेवला. त्यांचे कार्य आजही आदर्श व प्रेरणादायी आहे. त्यांच्या वचनांचा युवा पिढीने अभ्यास करून आदर्श समाज घडविण्यासाठी युवकांनी प्रयत्न करावेत.

अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. दामा यांनी सोलापूर परिसरातील कन्नड भाषिकांनी आणि मराठी भाषिकांनी महात्मा बसवेश्वर यांच्या वचनातून मानवतावादी व लोकशाही रचना बळकट होण्यासाठी कार्य करावे, असे आवाहन केले. या प्रसंगी महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राच्या सल्लागार समितीचे सदस्य प्रा. गाजानन धरणे, डॉ. घुली, राहुल पावले, शहापूरकर, न्हावकर, प्रा. देवानंद चीलवंत, चन्नविर बंकुर आदी उपस्थित होते.

धक्का!! सुराज्य
मंगळवार, दि. १४ मे २०२४ । पान ११

# मोदींच्या 'निवृत्तीची गॅरंटी' शहाशेठ देशाचे कारभारी

**दिल्ली : भाजप पुन्हा सत्तेवर आला तर २०२५ नंतर नरेंद्र मोदी नव्हे तर अमित शहा देशाचे नेतृत्व करतील. कारण भाजपमध्ये वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर निवृत्त व्हावे, असा नियम आहे. मोदींच्या निवृत्तीची गॅरंटी आहे. अमित शहा हेच देशाचे पंतप्रधान होतील, असा दावा दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केला. दरम्यान, त्यांच्या या वक्तव्यांनं मुख्य भाजपासह राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवार तसेच विरोध पक्षांमध्ये चर्चा सुरु झाली आहे. त्याबद्दल केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी पत्रकार परिषद घेऊन खुलासा केला आहे. तरीपण या प्रकरणाची चर्चा ऐन लोकसभा निवडणुकीच्या धामधूमीत चांगलीच रंगली आहे.**

भाजप पुन्हा सत्तेवर आला तर २०२५ नंतर नरेंद्र मोदी नव्हे तर अमित शहा देशाचे नेतृत्व करतील. कारण भाजपमध्ये वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर निवृत्त व्हावे, असा नियम आहे. या नियमानुसार मोदी पुढील वर्षी निवृत्त होतील. त्यामुळे पंतप्रधान मोदी हे त्यांच्यासाठी नव्हे, तर त्यांचे उत्तराधिकारी अमित शहा यांच्यासाठी मते मागत आहेत, असा दावा दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केला.

मद्य धोरण घोटाळाप्रकरणी अंतरिम जामीन मिळाल्यानंतर केजरीवाल तिहार तुरुंगातून बाहेर आले. आम आदमी पक्षाच्या कार्यालयात त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. भाजपचे नेते इंडिया आघाडीच्या नेत्यांना विचारतात, तुमचा पंतप्रधान कोण? मात्र मी त्यांना विचारतो की तुमचा पंतप्रधान कोण होणार आहे? कारण नरेंद्र मोदी पुढील वर्षी १७ सप्टेंबरला ७५ वर्षांचे होत आहेत. त्यांनीच असा नियम बनवला आहे की पक्षाचे जे सदस्य ७५ वर्षांचे आहेत, त्यांना निवृत्त व्हावे लागेल. त्यांनी लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, सुमित्रा महाजन या नेत्यांना निवृत्त केले. या नियमानुसार मोदींनाही निवृत्त व्हावे लागणार आहे,'' असे केजरीवाल यांनी सांगितले.

देशातील जनतेचा कल इंडिया आघाडीच्या बाजूने दिसत असल्याचेही केजरीवाल म्हणाले. तुरुंगातून सुटल्यानंतर गेल्या २० तासांत मी निवडणूक तज्ज्ञ, जनतेशी चर्चा केली आणि मला कळले की भाजपचे सरकार येणार नाही. इंडिया आघाडी' सत्तेत येणार असून आम आदमी पक्ष सरकारमध्ये सामील असेल. आम्ही दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा मिळवून देऊ,'' असे केजरीवाल यांनी सांगितले.



### मोदींची एक राष्ट्र, एक नेता' मोहीम


केजरीवाल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार हल्ला चढविला. हुकूमशाही लादण्यासाठी मोदी एक राष्ट्र, एक नेता' मोहीम राबवत आहेत. विरोधी पक्षातील सर्व नेत्यांना तुरुंगात टाकून राजकीय विरोध संपुष्टात आणण्याचा प्रयत्न ते करत आहेत,'' अशी टीका केजरीवाल यांनी केली.

### तर ठाकरे, बॅनर्जी तुरुंगात!

भाजप पुन्हा सत्तेत आल्यास पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, शिवसेनेचे (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, तमिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन, राष्ट्रीय जनता दलाचे तेजस्वी यादव आदी नेत्यांना तुरुंगात टाकले जाईल, असा दावा केजरीवाल यांनी केला. भाजप सत्तेत आल्यास दोन महिन्यांत उत्तर प्रदेशचा मुख्यमंत्रीही बदलला जाईल, असे भाकीतही त्यांनी केले.

## सिधी सिधी बाते मोदींना थेट आव्हान

**लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक चर्चेच्या पुढाकाराचे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शनिवारी कौतुक केले. मी किंवा पक्षाचे प्रमुख मल्लिकार्जुन खरगे यांना अशा चर्चेत भाग घेण्यास आनंद होईल. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक चर्चेच्या पुढाकाराचे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शनिवारी कौतुक केले. मी किंवा पक्षाचे प्रमुख मल्लिकार्जुन खरगे यांना अशा चर्चेत भाग घेण्यास आनंद होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी हेदेखील या चर्चेत भाग घेतील, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. सुदृढ लोकशाहीसाठी प्रमुख पक्षांनी देशासमोर एका व्यासपीठावरून त्यांचा दृष्टिकोन मांडणे हा एक सकारात्मक उपक्रम असेल, असेही राहुल यांनी एक्स'वर म्हटले. या चर्चेत मोदींनीही भाग घ्यावा, अशी देशाची अपेक्षा असल्याचेही ते म्हणाले.**



माजी न्यायमूर्ती मदन बी लोकूर, अजित पी. शहा आणि एन. राम यांनी या आठवड्याच्या सुरुवातीला राहुल गांधी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहित निवडणुकीतील महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चेसाठी आमंत्रित केले होते. या तिघांनी चर्चेचा प्रस्ताव नि:पक्षपाती आणि प्रत्येक नागरिकाच्या व्यापक हितासाठी असल्याचे म्हटले होते. त्यावर राहुल यांनी एक्स'वरून उत्तर दिले.

मी चर्चेच्या निमंत्रणाबाबत पक्षाचे अध्यक्ष खरगे यांच्याशी चर्चा केली. त्यांनी यासाठी होकार दर्शवत, अशा चर्चांमुळे जनतेला आमचा दृष्टिकोन समजण्यास आणि एखाद्याची निवड करण्यास मदत होईल. अशा चर्चांमुळे राजकीय पक्षांवर होणारे निराधार आरोप थांबतील, शिवाय निवडणूक लढणारे प्रमुख पक्ष म्हणून जनतेने त्यांच्या नेत्यांना थेट ऐकणे योग्य ठरेल, त्यामुळे मला किंवा काँग्रेस अध्यक्षांना अशा चर्चांमध्ये सहभागी होण्यास आनंद होईल आणि आम्ही त्यासाठी उत्सुक आहोत, असेही राहुल म्हणाले.

### पण मोदी तयार होणार नाहीत

आम्हाला कळवा, की पंतप्रधान कधी आणि केव्हा सहभागी होण्यास तयार आहेत, त्यानंतर आम्ही चर्चेचे तपशील आणि स्वरूप यावर चर्चा करू', असे राहुल गांधी म्हणाले. दरम्यान, शुक्रवारी लखनौमधील एका कार्यक्रमात, श्रोत्यांच्या एका प्रश्नाचे उत्तर देताना गांधी म्हणाले, की ते वादविवादात मोदींना सामोरे जाण्यासाठी तयार आहेत. परंतु मोदी त्यासाठी तयार होणार नाहीत, असा दावा राहुल यांनी केला होता.

## असदुद्दीन ओवेसींच वक्तव्य
## मुस्लिम पंतप्रधानावरून चर्चेची राळ



**तेलंगणाच्या हैदराबाद लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान खासदार सदुद्दीन ओवेसी हे यावेळी पाचव्यांदा लोकसभा निवडणुकीला सामोरे गेले आहेत. हैदराबादमध्ये चौथ्या टप्प्यात मतदान पार पडणार आहे. ओवेसी यांच्या विरोधात भाजपाने हिंदुत्ववादी नेत्या माधवी लता यांना उमेदवारी दिली आहे. ओवेसी यांनी मुस्लीम, मागासवर्गीय आणि इतर अल्पसंख्याकांना लक्ष्य करून आपली मतपेटी बांधली आहे. भाजपाच्या विरोधात कडाडून प्रचार करणाऱ्या ओवेसींनी इंडिया आघाडीशी युती केलेली नाही. ओवेसींचा हा निर्णय पक्षासाठी फायद्याचा की तोट्याचा? भारतीय राजकारणात मुस्लिमांचे स्थान काय? या विविध विषयांबाबत ओवेसींनी हिंदुस्तान टाइम्स या संकेतस्थळाला मुलाखत दिली आहे. या मुलाखतीमध्ये त्यांनी मुस्लीम व्यक्ती भारताचा पंतप्रधान कधी होणार? याबाबत भाष्य केले आहे.**

### या निवडणुकीत महत्त्वाचे मुद्दे कोणते?

लोकसभा निवडणुकीचे तीन टप्पे झाले आहेत. या तीन टप्प्यात कोणते महत्त्वाचे मुद्दे वाटत आहेत? या प्रश्नावर बोलताना ओवेसी म्हणाले, बेरोजगारी, महागाई हे प्रमुख मुद्दे आहेत. तसेच भाजपाने मुस्लीम वर्गाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. भाजपाप्रमाणेच इंडिया आघाडीनेही मुस्लीम समुदायापासून अंतर राखले आहे. महाराष्ट्र हे त्याचे सर्वात मोठे उदाहरण आहे.महाराष्ट्रात ४८ मतदारसंघ आहेत. इंडिया आघाडीने एकाही मतदारसंघात मुस्लीम उमेदवार दिलेला नाही. राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि नवी दिल्लीतही हाच कित्ता गिरवला गेला आहे. जर मुस्लिमांना उमेदवारीही दिली जात नसेल, याचा अर्थ लोकसभेत त्यांचे प्रतिनिधित्व निश्चितच कमी होणार.

### इंडिया आघाडीशी युती का नाही केली?

इंडिय आघाडीशी सूत जुळविण्याबद्दल ओवेसी म्हणाले की, आमच्या पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी तीनवेळा इंडिया आघाडीचा भाग होण्यासाठी निरोप दिला. मात्र त्यांच्या निरोपाची साधी दखलही इंडिया आघाडीने घेतली नाही. कुणी जर आम्हाला आघाडीत घ्यायला तयार नसेल तर आमच्यासाठी हा काही जगाचा अंत नाही. आम्ही आमच्या पद्धतीने आमची राजकीय वाटचाल सुरूच ठेवू. उत्तर प्रदेश आणि इतर काही राज्यात छोट्या पक्षांशी आम्ही आघाडी केली आहे.

## केजरीवालांचा 'क्लिन' दावा
## शहांचे 'बोल्ड' उत्तर

तिहार तुरुंगातून बाहेर आल्यानंतर अरविंद केजरीवाल यांनी आज आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांना जाहीर सभेद्वारे संबोधित केले. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपावर जोरदार टीका केली. पुढील वर्षी १७ सप्टेंबर रोजी मोदी ७५ वर्षांचे होणार असून त्यांना राजकारणातून निवृत्ती घ्यावी लागेल आणि त्यांच्याजागी अमित शाह पंतप्रधान होतील, असा दावा अरविंद केजरीवाल यांनी केला होता. या दाव्यावर आता अमित शाह यांनी थेट उत्तर दिले आहे. तेलंगणाच्या दौऱ्यावर असलेल्या अमित शाह यांनी आज हैदराबाद येथे पत्रकार परिषद घेतली.

पत्रकार परिषदेत अरविंद केजरीवाल यांच्या दाव्याबाबत प्रश्न विचारला असता ते म्हणाले, पंतप्रधान मोदी ७५ वर्षांचे होणार असल्यामुळे केजरीवाल आणि कंपनीला फार आनंदीत होण्याची गरज नाही. ७५ व्या वर्षी निवृत्त व्हावे, हे भाजपाच्या घटनेत कुठेही लिहिलेले नाही. नरेंद्र मोदी आपली टर्म पूर्ण करतील. तसेच पुढेही मोदीच देशाचे नेतृत्व करत राहतील. याबाबत भाजपात कोणताही संभ्रम नाही. विरोधक मात्र संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.

अमित शाह म्हणाले की, या देशाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यातील जनता पंतप्रधान मोदी यांच्यामागे आहे. इंडिया आघाडीच्या नेत्यांनाही याची कल्पना आहे की, आम्ही ४०० पार जाणार आहोत. तसेच मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होणार आहेत, याचीही त्यांना कल्पना आहे. त्यामुळेच अशाप्रकारचे विधान करून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.




### २०२९ च्या निवडणुकीतही पंतप्रधान मोदीच

अमित शाह पुढे म्हणाले की, नरेंद्र मोदी हेच २०२९ पर्यंत पंतप्रधानपदावर राहतील. तसेच २०२९ च्या निवडणुकीचे नेतृत्वही त्यांच्याकडेच असेल. इंडिया आघाडीसाठी आनंद वाटावा, अशी कोणतीही बातमी नाही. त्यांना अधिक कष्ट घेण्याची गरज आहे. भ्रष्टाचारा संपविण्याची गरज आहे. तसेच लोकांबद्दल अधिक संवेदनशील राहण्याची गरज आहे. याऐवजी विरोधक अपप्रचार करून निवडणूक जिंकू शकत नाहीत. पंतप्रधान मोदी देशाला पुढे घेऊन गेले आहेत, तसेच देशाला ते आणखी पुढे घेऊन जाणार आहेत. याबद्दल आमच्या मनात दुमत नाही. तसेच देशातील जनतेलाही हे पटलेले आहे.

## चंद्रपूरची १२ गावे करणार दोनदा मतदान

तेलंगणातील आदिलाबाद लोकसभा मतदारसंघात आज चौथ्या टप्प्याचे मतदान सुरू आहे. आणि यात मतदान करण्यासाठी रांगेत लागलेले हे मतदार आहेत चंद्रपूर जिल्ह्यातील. याच मतदारांनी पहिल्या टप्प्यात म्हणजे १९ एप्रिल रोजी महाराष्ट्रातील चंद्रपूर लोकसभा निवडणुकीत मतदान केले आहे. महिनाभरात एकाच निवडणुकीत दोन वेगवेगळ्या मतदारसंघात मतदान करण्याचा चमत्कार घडला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती या दुर्गम तालुक्यातील साडेबारा गावे तेलंगणा सीमेला लागलेली आहेत. या गावांवर तेलंगणा आपला अधिकार सांगत आला आहे. पण ही गावे मूळ महाराष्ट्रात आहेत. दूरवर असलेली ही गावे नेहमीच विकासापासून, शासकीय योजनांपासून दूर राहिली आहेत. याचा फायदा घेत तेलंगणा सरकारने या लोकांना रेशन कार्ड, मतदान पत्र, अंगणवाडी, शाळा, वीज अशा सुविधा देत आपल्याप्रती सहानुभूती निर्माण करण्याचा प्रयत्न चालवला आहे. येथील लोकांना स्वतःचा फायदा दिसत असल्याने ते दोन्ही राज्यातील योजनांचा लाभ उचलत आहेत. स्वस्त धान्य असेल, घरकुल योजना असेल किंवा इतर योजना असतील, याचा लाभ ते घेत आहेत. मतदानसुद्धा ते दोन्ही राज्यात करतात. तेलंगणातील प्रत्येक निवडणुकीत येथील लोक सहभाग घेतात. या साडेबारा गावात एकूण ५ हजार ११७ मतदार आहेत. या प्रत्येकाकडे दोन मतदार ओळखपत्र, रेशन कार्ड, आधार आहे.

सोमवारी तेलंगणातील आदिलाबाद लोकसभा मतदारसंघात निवडणूक होत आहे. यात मतदान करण्यासाठी रांगेत लागलेले हे मतदार आहेत चंद्रपूर जिल्ह्यातील. याच मतदारांनी पहिल्या टप्प्यात म्हणजे १९ एप्रिल रोजी महाराष्ट्रातील चंद्रपूर लोकसभा निवडणुकीत मतदान केले आहे.



### सीमावर्ती साडेबारा गाव

येसापूर, अंतापूर, पद्मावती, इंदिरानगर, पलसगुडा, लेंडीगुडा, वेलापठार नारायणगुडा, परमडोली, शंकरलोधी महाराजगुडा, लेंडीजाडा, कोठा

## शरद पवारांची गुगली अन् देशभरात चर्चेचा विस्फोट

**महाराष्ट्रातले दिग्गज नेते ही शरद पवार यांची ओळख आहे. मात्र सध्या त्यांच्या पक्षाची दोन शकलं झाली आहेत. पक्षाचा मोठा भाग अजित पवार त्यांच्यासह घेऊन गेले आहेत आणि राष्ट्रवादी हा त्यांचाच पक्ष आहे हे देखील त्यांना निवडणूक आयोगाने चिन्ह आणि पक्षाचं नाव देऊन ठरवून टाकलं आहे. दुसरीकडे शिवसेनाही राष्ट्रवादीच्या एक वर्ष आधी फुटली आहे. या सगळ्यानंतर काही दिवसांपूर्वीच शरद पवारांनी एक वक्तव्य केलं आहे जे विलीनीकरणाबाबत आहे.**

### शरद पवारांचे काय होते भाष्य?

आगामी लोकसभा निवडणुकीनंतर प्रादेशिक पक्ष एकत्र येतील आणि काँग्रेसमध्ये विलीन होतील. असं वक्तव्य शरद पवार यांनी इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या मुलाखतीत केलं आहे. पुढच्या दोन वर्षांत अनेक प्रादेशिक पक्ष हे काँग्रेसशी जवळीक साधतील किंवा त्यातले काही पक्ष हे काँग्रेसमध्ये विलीन होतील. काँग्रेसमध्ये विलीन होणं हा चांगला पर्याय आहे असं काही पक्षांना वाटू शकतं. आमच्या आणि काँग्रेसच्या विचारधारेत फारसा फरक नाही. आमच्या विचारधारा गांधी-नेहरु यांच्या विचारांवर वाटचाल करत आहेत असं शरद पवारांनी या मुलाखतीत म्हटलं होतं. त्यावरुन विविध चर्चांना उधाण आलं. ४ जूननंतर शरद पवार त्यांच्याकडे उरलेला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करतील का? याचीही चर्चा झाली. या चर्चांवर आता काँग्रेस खासदार शशी थरुर यांनी महत्त्वाचं उत्तर दिलं आहे.



### थरुर यांना असं वाटतं

सध्या आम्ही वेगळे पक्ष आहोत. मात्र इंडिया आघाडीत आम्ही पक्ष म्हणून एकत्र आहोत. भविष्यात काय होतं ते पाहू. मात्र काँग्रेस सोडून जे लोक गेले आहेत ते परतत असतील तर आम्ही स्वागत करु त्यांचं. एकच पक्ष नाही, देशात अनेक पक्ष आहेत जे काँग्रेसमध्ये होते आणि काही कारणांमुळे वेगळे झाले ते परतणार असतील तर आम्ही रेड कार्पेट टाकून स्वागत करु. कारण आम्हाला वाटतं की विचारधारा एकच असेल तर वेगळं कशाला राहायचं? असं थरुर यांनी म्हटलं आहे.

### शरद पवार यांचे पुन्हा घुमजाव

शरद पवार यांना जेव्हा राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत विचारण्यात आलं तेव्हा ते म्हणाले की याबाबत मी माझ्या पक्षातल्या सहकाऱ्यांशी चर्चा केल्याशिवाय काहीही सांगू शकत नाही. वैचारिकदृष्ट्या आम्ही काँग्रेसच्या जवळ आहोत. पुढच्या काळातले निर्णय आणि रणनीती हे सामूहिकपणे विचार करुन घेतले जातील. मात्र आम्हाला नरेंद्र मोदींशी जुळवून घेणं कठीण आहे असंही शरद पवार यांनी म्हटलं आहे. दुसरीकडे जे येत असतील त्यांचं रेड कार्पेट घालून स्वागत करु असं थरुर म्हणाले आहेत याबाबत शरद पवार काय प्रतिक्रिया देणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.



## जिल्हा बँक्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी प्रकाश वाले

**सोलापूर** : सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड शंकर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. अध्यक्षपदी सोलापूर सिध्देश्वर सह. बँकेचे अध्यक्ष प्रकाश वाले व उपाध्यक्षपदी राजमता अर्बन को. ऑप बँकेचे अध्यक्ष डॉ. अशोक सुरवसे यांची एकमताने निवड करण्यांत आली. वाले यांचे नांव श्री. राजगोपाल मिणीयार यांनी सुचविले व अनुमोदन राजगोपाल झंवर यांनी दिले, उपाध्यक्ष डॉ. अशोक यांचे नांव किसन माळी यांनी सुचविले व दिनकर देशमुख यांनी अनुमोदन दिले. यावेळी राजगोपाल झंवर यांनी माजी अध्यक्ष अशोक लुणावत यांनी केलेल्या कामकाजाचे अभिनंदन केले. बँक्स असोसिएशनच्या प्रगतीकामी सहकार्य करण्याचे आवाहन केले व आज बँकिग इंडस्ट्री संक्रमणाच्या अवस्थेतून जात असून अशा वेळेस मिळालेले हे अध्यक्ष पद ही संधी आहे असे मी समजतो. सोलापूर जिल्हयातील नागरी सहकारी बँकेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी आपण सदैव तत्पर राहिन असे वाले यांनी निवडीनंतर सांगितले. यावेळी अस्मिता गायकवाड व मुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी ढवळे उपस्थित होते.



## अरविंद धाम पोलीस वसाहतीत संभाजी महाराज जयंती

**सोलापूर** : अरविंद धाम पोलीस वसाहत मुरारजी पेठ येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे आमदार विजयकुमार देशमुख, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, ज्ञानेश्वर सपाटे, बापू वाडेकर, सोमनाथ राऊत, किरण पवार, सौदागर सावंत, माजी नगरसेवक शिवानंद पाटील, संजय सरवदे, राहुल दहीहंडे, योगेश भोसले, पैलवान सुरवसे, महेश सोनके आदी उपस्थित होते. यावेळी शिवकन्या समृद्धी अनिल शिंदे हिचे व्याख्यान पार पडले. कार्यक्रमासाठी उमेश माने, निशांत सावळे, सौरभ कनेरी, प्रसाद कवडे, समर्थ पेठकर, अमोल सोनके, अरविंद सोनके, हर्षद भोसले, सुमित सोनके, रितेश सोनके, प्रथमेश माने, यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अतुल सोनके यांनी मानले.

---

## फुकट प्रवास करणाऱ्यांवर कारवाई, अडीच लाखांचा दंड वसूल

**सोलापूर** : मध्य रेल्वे सोलापूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक . नीरज कुमार दोहारे यांच्या मार्गदर्शनाखाली रेल्वेत फुकट प्रवास करणारे प्रवासी आणि इतर विविध प्रकारचे मिळून तब्बल दोन लाख ५४ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील, विभागीय सुरक्षा आयुक्त आदित्य आणि सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक श्रीमती कल्पना बनसोडे यांच्या संयुक्त देखरेखी खाली सोलापूर रेल्वे विभागात दिनांक ११ मे रोजी विशेष तिकिट तपासणी मोहीम घेण्यात आली होती. विशेष तिकीट तपासणीची ही मोहीम सोलापूर रेल्वे विभागातील वाडी, कलबुर्गी, सोलापूर, कुर्डुवाडी, लातूर, पंढरपूर या रेल्वे स्थानकांवर तर वाडी-सोलापूर-दौंड आणि मिरज-कुर्डुवाडी-लातूर सेक्शन येथे धावत्या ट्रेन मध्ये एकूण ७२ तिकीट तपासणी कर्मचारी आणि आरपीएफ कर्मचारी यांनी संयुक्तरित्या ही मोहीम पार पाडली. एकूण ५२१ प्रवाश्यांकडून २ लाख ५४ हजारांचा दंड वसूल करण्यात आला.

---

## शिवगंगा नगर येथे फायटरने मारहाण

**सोलापूर** : पारशी विहीर येथील शिवगंगा नगर भाग ४ येथे तलवार आणि फायटरने केलेल्या मारहाणीत विनायक लक्ष्मण म्हत्रे (वय ३०) रा. शिवगंगानगर भाग ४ हा तरुण जखमी झाला. ही घटना रविवारी रात्री घडली. विनायक हा घराजवळ थांबला होता . त्यावेळी सुनील परदेशी आणि इतर तीन जणांनी मिळून विनाकारण त्याला फायटर आणि तलवारीने मारहाण केली. त्यात तो जखमी झाला अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

# लिपिकाच्या हातूनच फाईल माझ्याकडे आली पाहिजे

## माध्यमिकच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी भरला दम

**सोलापूर/प्रतिनिधी**

प्रलंबित फायलींवर सह्या करून घ्यायचे असतील तर संबंधित लीपिकाच्या हातूनच माझ्याकडे फायलीआल्या पाहिजेत असा सज्जड दम माध्यमिकच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी कार्यालयातील कर्मचाऱ्याला दिला. माध्यमिक शिक्षण विभागाला पूर्ण वेळ लागलेले शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी शिस्त लावण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. कार्यालयातील विस्कटलेली घडी ते बसवत असून प्रलंबित कामांचा निपटारा करण्यास त्यांनी प्राधान्य दिले आहे.

मागील दोन वर्षापासून जिल्हा परिषदेतील माध्यमिक विभाग हा संपूर्ण राज्यभरात चर्चेचा विषय झाला. बोगस दिलेल्या मान्यतांमुळे चौकशी लागली. त्यातच दोन वर्षात या विभागाला किमान चार ते पाच शिक्षणाधिकारी लाभले.

### कर्मचाऱ्यांना शिस्त लावण्याचा प्रयत्न सुरू

सचिन जगताप यांनी माध्यमिक शिक्षण विभागाच्या कामकाजाची पद्धत पाहिली असता फारच गोंधळ आणि कामांमध्ये अनियमितता दिसून येत असल्याने ते कार्यालयीन कर्मचाऱ्यांना शिस्त लावण्याचा प्रयत्न करत आहेत. शिक्षकांचे प्रश्न, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न त्यासोबतच शिक्षक संघटनांशी सकारात्मक चर्चा करून कामकाज करताना दिसत आहेत. या लावलेल्या षष्ठीतून शिस्तीतून किती कार्यालयीन कर्मचाऱ्यांना आणि शिक्षकांना फायदा होतो हेच येत्या काळात दिसून येईल.



यामध्ये अनेकांना अतिरिक्त पदभार देण्यात आला. मारुती फडके हे पूर्ण वेळ शिक्षणाधिकारी म्हणून आले होते. परंतु ते दबकत दबकत काम करत असल्याने त्यांचा या ठिकाणी इंटरेस्ट दिसून आला नाही. काही महिन्यातच त्यांनी झेडपीतून काढता पाय घेतला. यामुळे माध्यमिक शिक्षण विभागाची घडी पूर्णपणे विस्कटली.

अनेक कर्मचारी बदलून गेले आणि आले. त्यामुळे कामकाजात गोंधळ उडत आहे. यातच मागील दोन महिन्यापूर्वी वर्धा येथून शिक्षणाधिकारी सचिन जगताप हे सोलापुरात आले आहेत.

# जि.प.मध्ये स्त्री परिचर ढसाढसा रडली

## आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या तक्रारींवर तक्रारी

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला असून आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्याच तक्रारींवर तक्रारी येत असून याकडे जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे पूर्ण दुर्लक्ष होत आहे.



एक अर्धवेळ स्त्री परिचर सोमवारी जिल्हा परिषदेत येऊन माध्यमांसमोर रडली. तिने आपले गाऱ्हाणे मांडले.

जि.प.च्या आरोग्य केंद्रात सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे महिला कर्मचाऱ्यांची कुचंबणा होत आहे. या गोष्टी सांगाव्या कोणाला असा प्रश्न आहे.

जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे याबाबत तक्रा केली असता त्यांनीही याकडे दुर्लक्ष आहे. या सर्व बाबी जिल्हा परिषदेची प्रतिमा मलिन करणाऱ्या आहेत, असे त्या महिलेने सांगितले.

यावेळी सोबत शिवस्वराज्य संघटनेचे प्रतापसिंह कांचन पाटील, जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे राजेश देशपांडे, दिनेश बनसोडे, चेतन भोसले हे उपस्थित होते.

# मंगळवेढ्यात वीज गायब होण्याचे प्रमाण वाढले

## नागरिकांनी वीज वितरणच्या अधिकाऱ्याला धरले धारेवर

**मंगळवेढा/प्रतिनिधी**



मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात वीज गायब होण्याची मालिका सुरु असल्याने संतापलेल्या नागरिक व पक्षाच्या विविध कार्यकर्त्यांनी सोमवारी वीज वितरणच्या अधिकाऱ्याला चांगलेच धारेवर धरले. यापुढे वीज पुरवठा सुरळीत न केल्यास अधिकाऱ्यांना फिरु देणार नसल्याचा इशारा मनसेचे जिल्हा समन्वयक अध्यक्ष नारायण गोवे यांनी लेखी निवेदनाव्दारे वीज वितरण प्रशासनास दिला आहे.

ग्रामीण भागात बुधवार वगळता अन्य दिवशीही सतत वीज पुरवठा अधून मधून खंडित केला जात आहे. त्यामुळे बोअरला पाणी असून पिकांना पाणी देणे मुश्किल बनले आहे. वीज वितरणच्या अकार्यक्षमतेमुळे पिके करपत असल्याचा आरोप विविध पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. वीज खंडीत झाल्यानंतर बठाण, ब्रह्मपुरी ३३ के.व्ही मधून ऑपरेटर मंगळवेढ्यातून वीज खंडीत झाल्याचा मेसेज टाकून शेतकऱ्यांची दिशाभूल करीत आहेत. शहराचे कामकाज पाहणारे अभियंता अकार्यक्षम असल्यामुळे ही वेळ आल्याचा आरोप नागरिकांचा आहे. त्यांना तात्काळ हटवून अन्य कार्यक्षम व तत्पर अधिकारी नेमावा अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी नारायण गोवे, प्रहार संघटनेचे तालुकाध्यक्ष राजकुमार स्वामी, दिलीप पाटील,काकासाहेब पुजारी,ॲड. विष्णू बेदरे, मारुती शिंदे, दत्तात्रय पाटील, महावीर जैन, चंद्रकांत पवार, देवदत्त पवार, विनायक मायदेव आदी उपस्थित होते.

## नरसिंहपूरमध्ये नवरात्र उत्सवास सुरुवात

**सोलापूर** : सोलापूर-पुणे जिल्ह्याच्या सीमेवरील श्री क्षेत्र नीरा नरसिंहपूर येथील नृसिंह मंदिरात सोमवारपासून नवरात्र उत्सवास सुरुवात झाली. २१ मे रोजी नृसिंह जयंती आहे. त्या निमित्ताने मंदिरात विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजिले आहेत. नीरा-भीमा नदीच्या संगमावर श्री नृसिंहाचे पुरातन मंदिर आहे. ज्येष्ठ कीर्तनकार चारूदत्त आफळे, मोहनबुवा रामदासी, संत तुकाराम महाराजांचे वंशज बाळासाहेब देहूकर, राणा महाराज वासकर, वैद्य प्रशांत सुरु यांच्यासह विविध भाविकांचे कार्यक्रम होणार आहेत. नवरात्र उत्सवाच्या मार निमित्ताने दररोज मूर्तीच्या सभोवताली आकर्षक आरास करण्यात येणार आहे.

# रेल्वे पोर्टर चाळीत बंद घर फोडले

## दीड लाखांचे दागिने लंपास

**सोलापूर/प्रतिनिधी**




डी आर एम ऑफिस जवळील रेल्वे पोर्टर चाळीतील सुभाष गुराखे यांचे घर फोडून चोरट्यांनी सुमोर १ लाख ५३ हजारांचे दागिने लंपास केले. याप्रकरणी सदर बझार पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. १२ मे रोजी रेल्वे पोर्टर चाळीत राहणारे सुभाष गुराखे घरास कुलूप लावून बाहेर गेले होते. बंद घराचा फायदा चोरट्यांनी घेतला. दुपारी चोरट्याने त्यांच्या बंद घराचा कडी-कोयंडा तोडून घरात प्रवेश केला. बेडरूममधील कपाट उचकटून कपाटातील १ लाख ५३ हजाराचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले.याबाबत सुभाष गुराखे (वय ४४) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. तपास महिला फौजदार व्हट्टे या करित आहेत.

### धुळदेव यात्रेनिमित्त कुस्ती स्पर्धा

# राजू खरे यांच्याकडून १ लाख ५१ हजारांचे बक्षीस

**पंढरपूर/प्रतिनिधी**

यशस्वी उद्योजक राजू खरे यांनी नजीक पिंपरी (ता.म होळ) येथील धुळदेव यात्रेनिमित्त कुस्ती स्पर्धेसाठी एक लाख एकावन्न हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले. नजीक पिंपरी येथील श्री धूळदेव यात्रा कमिटी व हनुमान यात्रा कमिटी व ग्रामपंचायतीतर्फे श्री धूळदेव केसरी २०२४ च्या कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले आहे.

तरुणांनी चांगल्या मार्गावर यावे व नवीन पैलवान तयार होऊन समृद्ध युवक संपत्ती निर्माण व्हावी या उदात्त हेतूने प्रेरणा म्हणून बक्षीस जाहीर करीत असल्याचे राजू खरे यांनी यावेळी बोलताना सांगितले. नजीकपिंपरी या गावात कुस्तीच्या आखाड्यात खरे दाखल होताच हलगीच्या तालावर कुस्ती वस्ताद मंडळी व पंचकमिटीपे त्यांचे स्वागत केले. पंढरपूर नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष वामन बंदपट्टे यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी राजू खरे यांच्या हस्ते महिला कुस्तीगिरांचीही कुस्ती लावण्यात आली तर प्रथम क्रमांकाच्या पैलवानांची कुस्ती राजू खरे यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी गावातील सरपंचासह ग्रामपंचायत सदस्य यांनीही राजू खरे यांचा सत्कार केला.

### विरोधकांचा घेतला समाचार

यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी आपल्या गावावर कशा पद्धतीने अन्याय झाला. याचा पाढा खरे यांच्यासमोर वाचला. त्यावेळी त्यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेतला. आपल्या शैलीत खरे यांनी मोहोळ तालुक्यातील जनतेच्या माध्यमातून हुकूमशाहीची राजवट मुळापासून उखडून फेकण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



# ब्रह्मपुरी परिसराला गारा व वादळी वाऱ्याने झोडपले

**मंगळवेढा/प्रतिनिधी**

मंगळवेढा शहरातील कांही भागात व तालुक्यात रविवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या. दरम्यान ब्रह्मपुरी परिसरात वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस पडल्याचे वृत्त असून विजेचे पोल व तारा तुटल्याने विज पुरवठा खंडीत झाला आहे.

रविवारी सायंकाळी ६ वाजता अचानक आकाशात काळे ढग येवून सोसाट्याचा वारा सुटला. हे वादळ बेगमपूरच्या दिशेने आल्याने बेगमपूर,माचणूर, ब्रह्मपुरी व परिसरात मुसळधार पाऊस झाल्याने ऐन उष्णतेत पिकांना काही अंशी दिलासा मिळाला आहे. याचबरोबर गाराही मोठ्या प्रमाणात पडल्याने काहींनी त्याचा व्हिडीओ काढून व्हायरल केल्याचे चित्र आहे. पाऊस पडल्यानंतर उष्णतेने त्रस्त झालेल्या मुलांनी पावसात भिजण्याचा आनंद घेतला. मंगळवेढा शहरात काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या तर काही ठिकाणी काहीच नाही अशी निसर्गाची व्दिधावस्था दिसून आली.



मरवडे, तळसंगी येथे पाणी वाहिले आहे तर भाळवणी,खोमनाळ या परिसरात हलक्या सरी कोसळल्या.

### उकाड्यापासून नागरिकांची सुटका

गेली चार दिवस मंगळवेढ्याचा पारा ४२,४३ अंश सतत राहत असल्याने नागरिक उकाड्याने त्रस्त झाले होते. रविवारी पडलेल्या पावसामुळे हवेतील तापमान ३० अंशावर खाली आले आहे. परिणामी हवेतील उष्णता कमी होवून उकाड्यापासून नागरिकांची थोडी मुक्तता झाली आहे.

# हंजगीच्या श्री बमलिंगेश्वर यात्रेस शुक्रवारपासून प्रारंभ

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

अक्कलकोट तालुक्यातील हंजगी येथील ग्रामदैवत श्री बमलिंगेश्वरांच्या यात्रेस शुक्रवार १७ मे पासून विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाने सुरुवात होणार आहे. १९ मे रोजी सामाजिक कन्नड नाट्य कार्यक्रमाने यात्रेची सांगता होणार आहे.




हंजगी येथे सातशे वर्षांपूर्वी बांधण्यात आलेले हेमाडपंथी श्री बमलिंगेश्वर मंदिर हे कर्नाटक व महाराष्ट्रातील भाविकांचे भक्तीस्थान म्हणून प्रसिध्द आहे. अशा प्रसिध्द देवस्थान यात्रेचे औचित्य साधून १० ते १६ मे २०२४ पर्यंत दररोज रात्री नुरंदेश्वर मठासमोर सायंकाळी ७ ते ९.३० वाजेपर्यंत श्री वे मु धानय्या स्वामी यांचे 'महादासोही कलबुर्गी शरणबसवेश्वर पुराण' कार्यक्रम होणार आहे. १७ मे रोजी पहाटे ४ वाजता श्री बमलिंगेश्वर लिंगास रुद्राभिषेक आणि सायंकाळी ६ वाजता यण्णीभजन, महापूजा व नंदीध्वज यांचे आगमन होणार आहे.तर रात्री ठीक १० वाजता पौराणिक 'युध्दखंड' बैलाट सादर होणार आहे. शनिवार १८ मे रोजी पहाटे ४ वाजता आरती कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर श्री भक्तांचा दिवसभर दंडवत कार्यक्रम पार पडणार आहे. रात्री ८ वाजता श्री बमलिंगेश्वर मंदिरपासून पालखी नंदीध्वजासह मिरवणूक निघणार आहे. रात्री ९.३० वाजता शोभेचे दारुकाम होणार आहे.त्यानंतर १९ मे रोजी संपूर्ण दिवसभर डफावरील गीत गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सायंकाळी ५ वाजता जंगी पैलवान कुस्त्या होणार आहे.तर रात्री ठीक १० वाजता श्री बमलिंगेश्वर नाट्य संघातर्फे ' समाज के शिक्षे ' हे कन्नड नाटक सादर होणार आहे. सर्व श्री बमलिंगेश्वर भक्तगणांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन यात्रा पंचकमिटीतर्फे करण्यात आले आहे.

# तिरंगा ध्वज फडकलेल्या इमारत परिसरात सुलभ शौचालय बांधण्यास विरोध

## नागरिकांचा तीव्र विरोध, पावित्र्य राखण्याची मागणी

**सोलापूर/प्रतिनिधी**

पारतंत्र्यातही तिरंगा ध्वज फडकलेल्या ऐतिहासिक अशा नवी पेठेतील हेरिटेज इमारत परिसरात सुलभ शौचालय बांधण्यास नागरिकांतून कडाडून विरोध होत आहे. या परिसराचे पावित्र्य राखावे आणि इतरत्र शौचालय बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी होत आहे. यामुळे महापालिके विरोधात संताप व्यक्त होत आहे.



### ऐतिहासिक इमारतीचे पावित्र्य राखा : जामगुंडे

नवी पेठ येथील या ऐतिहासिक इमारतीला क्रांतिकारी असा इतिहास आहे. ही इमारत येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरक अशी ठरणार आहे. अशा या इमारतीच्या आवारात सुलभ शौचालय बांधणे चुकीचे आहे. तातडीने येथील बांधकाम थांबवावे आणि इतर ठिकाणी हे सुलभ शौचालय बांधण्यात यावे, अशी मागणी भाजपचे माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडे यांनी केली आहे.

### शौचालय बांधणे चुकीचेच : कामगार नेते शिंदे

सोलापुरात मार्शल लॉ पुकारण्यात आला. त्यावेळी या इमारतीवर तिरंगा ध्वज फडकवण्यात आला. अशी ही प्रेरणादायी इमारत आहे. या इमारतीच्या आवारात अशा पद्धतीने सुलभ शौचालय बांधकाम करणे गंभीर आणि चुकीची बाब आहे. महापालिका प्रशासनाची ही गंभीर चूक आहे. तेव्हा तात्काळ हे बांधकाम थांबावे. इतर ठिकाणी याची सोय करावी, अशी मागणी कामगार नेते जनार्दन शिंदे यांनी केले आहे.

सोलापूर शहरातील मुख्य बाजारपेठ समजल्या जाणाऱ्या नवी पेठेत महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाची हेरिटेज इमारत आहे. या ठिकाणी जुन्या नगरपालिकेचा कारभार चालत होता.

पारतंत्र्यातही तिरंगा ध्वज फडकवलेल्या ऐतिहासिक इमारत परिसरात महापालिकेच्या माध्यमातून वातानुकूलित सुलभ शौचालयाचे बांधकाम सुरू आहे. पायाचे खोदकाम केले आहे. याबद्दल नागरिक व माजी नगरसेवकांनी याबद्दल तीव्र संताप व्यक्त केला आहे.

स्वातंत्र्याच्या इतिहासाची प्रेरणा देणाऱ्या या इमारतीचे पावित्र्य राखणे गरजेचे असताना अशा पद्धतीने सुलभ शौचालयाचे बांधकाम सुरू करणे गंभीर बाब आहे. तत्काळ हे बांधकाम थांबून इतर ठिकाणी ही सोय करावी, अशी अशी मागणी जोर धरत आहे.